# सुवर्ण झेप

## सुवर्ण महोत्सवी
## विशेषांक


महाबीज®

**महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित, अकोला**

महाबीज भवन, कृषी नगर, अकोला - ४४४१०४

# महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित, अकोला

## महाबीज कार्यालय विस्तार



# सुवर्ण झेप

## सुवर्ण महोत्सवी विशेषांक


प्रकाशक

**श्री. योगेश कुंभेजकर** भा. प्र. से.

व्यवस्थापकीय संचालक

संपादक

**डॉ. प्रफुल्ल लहाने**

महाव्यवस्थापक (गुनि व संशोधन)

प्रकाशन : २८ एप्रिल, २०२५



कार्यकारी मंडळ

अध्यक्ष

**श्री. योगेश कुंभेजकर** भा. प्र. से.

व्यवस्थापकीय संचालक

कोषाध्यक्ष

**श्री. मनिष यादव**

महाव्यवस्थापक (वित्त)

सदस्य

**श्री. विवेक ठाकरे**

महाव्यवस्थापक (उत्पादन)

सदस्य

**श्री. प्रशांत पागृत**

महाव्यवस्थापक (प्रक्रिया व अभि.)

सदस्य

**डॉ. प्रफुल्ल लहाने**

महाव्यवस्थापक (प्रशासन)

सदस्य

**श्री. प्रकाश तातर**

उप-महाव्यवस्थापक (विपणन)

सदस्य

**श्री. विनय वर्मा**

कंपनी सचिव तथा उपमहा. (अं.अं)



मुद्रक-मांडणी-सजावट

**गणराया ग्राफीक्स**, अकोला

हा विशेषांक प्रकाशक श्री. योगेश कुंभेजकर (भा.प्र.से) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित, अकोला संपादक डॉ. प्रफुल्ल लहाने, महाव्यवस्थापक (गुनि व संशोधन) यांनी मालक महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित, करिता मुद्रक गणराया ग्राफीक्स, अकोला येथे छापून महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित, महाबीज भवन, कृषी नगर, अकोला येथून प्रसिद्ध केला आहे.

# महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळास
# प्राप्त पुरस्कार

महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ (महाबीज) राष्ट्रीय स्तरावर सार्वजनिक क्षेत्रात नामांकित बियाणे उद्योग म्हणून ओळखले जाते. शेतकऱ्यांप्रती कटिबद्ध असलेल्या महामंडळास आजपर्यंत केलेल्या उल्लेखनीय कार्यामुळे राष्ट्रीय तथा राज्य स्तरावर अनेक पुरस्कार प्राप्त झाले आहेत. त्यांची माहिती खालीलप्रमाणे आहे:



**राष्ट्रीय उत्पादकता पुरस्कार :** महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळास भारत सरकारच्या वाणिज्य व उद्योग मंत्रालय अधिनस्थ राष्ट्रीय उत्पादकता परिषद यांचेकडून १९८५ ते २००६ या कालावधीत एकूण १६ वेळा राष्ट्रीय उत्पादकता पुरस्कार प्राप्त झाले आहेत ही अतिशय अभिमानाची व गौरवाची बाब आहे.

**डीएसआयआर पुरस्कार :** सन २००५ साली केंद्र शासनाच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालयाचे अधिनस्त वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन विभागामार्फत महाबीजला ड्रायगॅस डिलींटींग प्रक्रिया केंद्राचे संशोधन आणि विकासाकरीता राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झाला आहे. तसेच या तंत्रज्ञाना करीता महामंडळास पेटंट (क्रमांक २०११६८) प्राप्त झाले आहे.





**स्कॉच ब्लू इकॉनॉमी अवार्ड :** सन २०१७ मध्ये, सोयाबीन बियाणे गुणवत्ता वाढीसाठी केलेल्या विविध उपक्रमांसाठी "ऑर्डर ऑफ मेरीट" पुरस्काराने २० डिसेंबर, २०१७ रोजी स्कॉच ग्रुप, नवी दिल्लीतर्फे सन्मानित करण्यात आले आहे. या स्पर्धेत देशातील २०० पेक्षा जास्त शासकीय आणि खाजगी संस्था सहभागी झाल्या होत्या.

# महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळास
# प्राप्त पुरस्कार

**इक्रीसॅट प्रशंसा प्रमाणपत्र :** मानवी आहारात सकस अन्न धान्याचा समावेश करण्याच्या उद्देशाने हार्वेस्ट प्लस अंतर्गत प्रथम अधिक लोहयुक्त सुधारित बाजरी वाण धनशक्ती हे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी उपलब्ध करुन दिल्याबद्दल ICRISAT, हैदराबाद या आंतरराष्ट्रीय संस्थेमार्फत २५ फेब्रुवारी २०१९ रोजी महाबीजने केलेल्या कार्याची दखल घेऊन सन्मानित करण्यात आले आहे.





**सर्वोकृष्ट बीज परिक्षण प्रयोगशाळा :** ॲग्रीकल्चर टुडे, नवी दिल्ली या संस्थेने महाबीजच्या अकोला येथील बीज परिक्षण प्रयोगशाळेस **'सार्वजनिक क्षेत्रातील सर्वोकृष्ट बीज परिक्षण प्रयोगशाळा'** या पुरस्काराने गौरविले आहे.

**कृषीरत्न सन्मान :** महाबीज संस्थेचे कृषी क्षेत्रातील भरीव योगदान, शेतकऱ्यांच्या हितासाठी राबविलेले उपक्रम, दर्जेदार तसेच बियाण्यांचे उत्पादन व वितरण याची दखल घेत लोकमत समूहातर्फे सन २०२३ व २०२४ चा "कृषीरत्न" हा प्रतिष्ठेचा सन्मान महाबीजला प्रदान करण्यात आला. या गौरवामुळे महाबीजच्या कार्याची सार्वजनिक पातळीवर प्रशंसा झाली आहे.






**चॅम्पियन्स ट्रॉफी :** अकोला गार्डन क्लब यांचेमार्फत आयोजित वार्षिक पुष्प प्रदर्शनी दरम्यान दरवर्षी देण्यात येणारी चॅम्पियन्स ट्रॉफी ही बहुतांश वेळी महाबीज रोपवाटीकेस प्राप्त झाली आहे. तसेच नॅशनल सोसायटी ऑफ द फ्रेंड्स ऑफ ट्री, मुंबई संस्थेमार्फत ८-९ फेब्रुवारी, २०२५ कालावधीत आयोजित वार्षिक पुष्प प्रदर्शनीमध्ये महाबीज रोपवाटीकेस द्वितीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

सुवर्ण झेप

सुवर्ण महोत्सवी विशेषांक

# अं । त । रं । ग


| | |
|---|---|
| **शुभेच्छा संदेश** - श्री. विकास चंद्र रस्तोगी | ११ |
| **शुभेच्छा संदेश** - डॉ. शरद गडाख | १२ |
| **शुभेच्छा संदेश** - डॉ. इंद्रा मणी | १३ |
| **शुभेच्छा संदेश** - श्री. सुरज मांढरे | १४ |
| **महाबीज एक दृष्टीक्षेप** - श्री. योगेश कुंभेजकर | १५ |
| **शेतकरी कल्याणार्थ समर्पित धोरण** - श्री. संजयजी धोत्रे | ३० |
| **बिजोत्पादनातून आर्थिक विकास** - श्री. वल्लभराव टी. देशमुख | ३१ |
| **शेतकरी हाच केंद्रबिंदू** - डॉ. रणजित एन. सपकाळ | ३२ |
| **विश्वासाचं बियाणं महाबीज** - श्री. व्ही. एस. धुमाळ | ३४ |
| **खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांची कंपनी** - श्री. जे. पी. डांगे | ३५ |
| **कृषी क्षेत्रातील उत्कृष्ट कार्याचा वारसा** - श्री. अजितकुमार जैन | ३६ |
| **कृषी क्षेत्रातील विश्वासार्ह मित्र** - श्री. सुधीर कुमार गोयल | ३७ |
| **आव्हानातून यशस्वीतेचा सुवर्णप्रवास** - श्री. संजय उबाळे | ३८ |
| **शेतकऱ्यांच्या प्रगतीचा भागीदार** - श्री. बिजयकुमार सिन्हा | ३९ |
| **गुणवत्तेच्या आधारावर अग्रगण्य संस्था** - श्री. शिवाजीराव देशमुख | ४० |
| **शेतकरी सेवेचे पाच दशक** - श्री. प्रदीप व्यास | ४१ |
| **आयुष्यातील अविस्मरणीय कालखंड** - श्री. अनूप कुमार | ४२ |
| **गुणवत्तेचे प्रतीक महाबीज** - श्री. एकनाथ डवले | ४३ |
| **विश्वासार्हता व सर्वोत्कृष्ट सेवा** - श्री. सौरभ विजय | ४४ |
| **शेतकरीभीमुख बियाणे उद्योग** - डॉ. शा. द. वानखेडे | ४५ |
| **सामाजिक बांधिलकी जपणारी संस्था** - श्री. परिमल सिंह | ४६ |
| **शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी भरीव योगदान** - ॲड. अरुण उन्हाळे | ४७ |
| **शेतकरीहितास सर्वोच्च प्राधान्य** - श्री. ओमप्रकाश देशमुख | ४८ |
| **शेतकऱ्यांच्या प्रगतीस कटीबद्ध** - श्री. आर. व्ही. गमे | ४९ |
| **शेतकरी बांधवांना सर्वोत्तम सेवा** - श्री. अनिल भंडारी | ५० |
| **शेतकऱ्यांच्या समृद्धीचा सुवर्णपथ** - श्री. सचिन कलंत्रे | ५१ |
| **अमूल्य योगदानाची अनुभूती** - श्री. अंकुशराव माने | ५२ |
| **भागधारकांचे मनोगत** | ५५ |
| **महाबीज विक्रेता मनोगत** | ६१ |
| **बिजोत्पादकांचे मनोगत** | ७१ |
| **शेतकऱ्यांचे मनोगत** | ७७ |
| **ऋणनिर्देश** | ८० |



**डॉ. प्रफुल्ल लहाने**
महाव्यवस्थापक (गुनि व संशोधन)

# संपादकीय

महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ, अर्थात महाबीज, आपल्या स्थापनेची ५० वर्षे पूर्ण करीत असून ही सुवर्ण झेप केवळ महाबीजसाठीच नव्हे, तर महाराष्ट्रातील कृषी क्षेत्रासाठीही अत्यंत महत्त्वाची आणि गौरवास्पद आहे. पाच दशकांच्या यशस्वी कालखंडाचा प्रवास हे केवळ एका संस्थेचे यश नाही, तर ती एक कृषि विकासाच्या प्रवासाची प्रेरणादायी यशोगाथा आहे. सुवर्ण महोत्सवी उत्सव हा केवळ एका संस्थेचा नाही, तर राज्यातील कोट्यवधी शेतकऱ्यांच्या आशा-अपेक्षांचा, त्यांच्या अथक परिश्रमाचा आणि समृद्ध भविष्याच्या स्वप्नांचा उत्सव आहे. राज्यातील शेतकरी बांधवांना दर्जेदार बियाण्यांची उपलब्धता सुनिश्चित करण्याच्या उद्देशाने 'राष्ट्रीय बियाणे प्रकल्प' अंतर्गत दिनांक २८ एप्रिल, १९७६ रोजी स्थापन झालेल्या महाबीजने गेल्या पाच दशकांत, आपल्या अविरत व समर्पित सेवेच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या मनात विश्वासाचं स्थान निर्माण केले आहे. गुणवत्तेबाबत कोणतीही तडजोड न करता आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, पारदर्शक कार्यपद्धती, शेतकरी हिताचा दृष्टिकोन या वैशिष्ट्यांमुळे आज महाबीज खऱ्या अर्थाने "शेतकऱ्यांची बियाणे कंपनी" म्हणून उदयास आले आहे.

आजपर्यंतच्या वाटचालीत हवामानातील अनिश्चितता, कृषीक्षेत्रातील बदलते तंत्रज्ञान, अधिक उत्पादनशील वाणांची वाढती मागणी, स्पर्धात्मक बाजारपेठ यासारखे आव्हाने महाबीजसमोर होती. महाबीजने प्रत्येक आव्हानाला सकारात्मक दृष्टिकोनाने सामोरे जात, सातत्याने दर्जेदार कृषि निविष्ठा शेतकऱ्यांपर्यंत पोहचविल्या. परिणामी, उत्पादकतेत लक्षणीय वाढ होऊन शेतकऱ्यांचे उत्पन्नही वाढीस लागले. बियाणेसोबतच राज्यातील शेतकरी बांधवांची वाढती मागणी लक्षात घेऊन महाबीजव्दारे द्रवरुप जैविक खते, जैविक खतांचे संघ (महाजैविक व पिके) व जैविक बुरशीनाशक ट्रायकोडर्मा, यासारखी दर्जेदार जैविक उत्पादने तसेच ऊती संवर्धित केळी व बांबू रोपे, संकरित पपई रोपे, शोभीवंत फुलझाडे व फळझाडांची रोपे शेतकरी बांधवांना वाजवी दरात उपलब्ध करुन आपल्या व्यवसायाच्या सीमा विस्तारल्या आहेत. राज्यातील शेतकऱ्यांकडून महाबीज जैविक उत्पादनांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून त्यांची उच्च गुणवत्ता, रास्त दर आणि योग्य मार्गदर्शनामुळे या उत्पादनांच्या मागणीत दरवर्षी लक्षणीय वाढ होत आहे. शासनाचे बहुमोल सहकार्य, शेतकऱ्यांच्या अतूट विश्वास, भागधारकांचा भक्कम पाठींबा, महाबीज अधिकृत विक्रेत्यांची साथ आणि कर्मचाऱ्यांचे समर्पण या पंचसूत्रीमुळेच हे यश प्राप्त झाले आहे. प्रस्तूत अंकात मान्यवरांचे लेखनीतून महामंडळाच्या सुवर्ण महोत्सवी वाटचालीतील महत्त्वपूर्ण घटनांचा मागोवा घेण्याचा प्रयत्न आहे. महाबीज सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने सन्माननीय महाबीज भागधारक, बिजोत्पादक, शेतकरी बंधू-भगिनी, विक्रेते बांधव, तसेच महाबीजचे कर्मचारी आणि या प्रवासात साथ देणाऱ्या प्रत्येकाला मनःपूर्वक शुभेच्छा! येणाऱ्या काळात महाबीज आपल्या उत्कृष्ट कार्याची परंपरा कायम राखून आणि महाराष्ट्राच्या कृषी विकासात महत्त्वपूर्ण योगदान देत राहील यात शंका नाही.

# विद्यमान संचालक मंडळ



**श्री. विकास चंद्र रस्तोगी** भा.प्र.से.
प्रधान सचिव (कृषी) तथा
अध्यक्ष, महाबीज



**श्री. सुरज मांढरे** भा.प्र.से.
कृषी आयुक्त तथा
संचालक महाबीज



**श्री. योगेश कुंभेजकर** भा.प्र.से.
व्यवस्थापकीय संचालक
महाबीज



**डॉ. मनींदर कौर द्विवेदी** भा.प्र.से.
सी.एम.डी., एन.एस.सी. तथा
संचालिका, महाबीज



**श्री. वल्लभराव टी. देशमुख**
संचालक, महाबीज



**डॉ. रणजित एन. सपकाळ**
संचालक, महाबीज



**श्री. पी. के. पटनाईक**
महाव्यवस्थापक, एन.एस.सी. तथा
संचालक, महाबीज



**श्री. हेमंत चिमुरकर**
वि. व्यवस्थापक, एन.एस.सी. तथा
संचालक, महाबीज

# महाबीज व्यवस्थापन



**श्री. योगेश कुंभेजकर** भा.प्र.से.
व्यवस्थापकीय संचालक



**डॉ. प्रफुल्ल लहाने**
महाव्यवस्थापक
(गु.नि. व संशोधन तथा प्रशासन)



**श्री. मनिष यादव**
महाव्यवस्थापक (वित्त)



**श्री. विवेक ठाकरे**
महाव्यवस्थापक (उत्पादन)



**श्री. प्रकाश ताटर**
उप-महाव्यवस्थापक (विपणन)



**श्री. प्रशांत पागृत**
महाव्यवस्थापक (प्र व अ)



**श्री. विनय वर्मा**
कंपनी सचिव



# मा. अध्यक्ष, महाबीज

| अ.क्र. | अध्यक्ष | कार्यकाल | |
|---|---|---|---|
| | | पासून | पर्यंत |
| १ | श्री. निळकंठ श्रीधरराव सपकाळ | २८.०४.१९७६ | २८.०८.१९७६ |
| २ | श्री. बी. के. चौगुले | २९.०८.१९७६ | ०४.०५.१९७७ |
| ३ | श्री. एन. रघुनाथन | ०४.०५.१९७७ | १०.०६.१९७७ |
| ४ | श्री.जे. जी. कांगा | १०.०६.१९७७ | २३.०४.१९७८ |
| ५ | श्री. एन. रघुनाथन | २४.०४.१९७८ | २९.०९.१९७८ |
| ६ | श्री. व्ही. वेंकटेशन | ३०.०९.१९७८ | १४.०९.१९८३ |
| ७ | श्री. के. राजन | १४.०९.१९८३ | ३०.०४.१९८९ |
| ८ | श्री. टी. बलराम | ०१.०५.१९८९ | ०३.०२.१९९२ |
| ९ | श्री. ए. व्ही. गोकाक | ०४.०२.१९९२ | २०.०८.१९९२ |
| १० | श्री. अक्कापेद्दी सूर्यप्रकाश राव | २६.०८.१९९२ | ०७.१०.१९९२ |
| ११ | श्री. अजितकुमार डी.जाधव | ०८.१०.१९९२ | ०३.०२.१९९४ |
| १२ | श्री. टी. बलराम | ०४.०२.१९९४ | १४.०२.१९९४ |
| १३ | श्री. अशोक बसक | १४.०२.१९९४ | ०५.११.१९९५ |
| १४ | श्री. सुरेश कुमार | ०६.११.१९९५ | ०६.०७.१९९७ |
| १५ | श्री. उमेशचंद्र सारंगी | ०७.०७.१९९७ | १७.०१.१९९९ |
| १६ | श्री. सुरेश विनायकराव जोशी | १८.०१.१९९९ | १७.०६.१९९९ |
| १७ | श्री. शिवाजीराव देशमुख | १८.०६.१९९९ | १७.०६.२००२ |
| १८ | श्री. जे. एस. सहारिया | १८.०६.२००२ | ०८.०३.२००६ |
| १९ | श्री. मुकेश खुल्लर | ०८.०३.२००६ | ३०.०६.२००६ |
| २० | श्री. व्ही. गिरीराज | ३०.०६.२००६ | २७.०७.२००६ |
| २१ | श्री. नानासाहेब पाटील | २७.०७.२००६ | ३०.०९.२०१० |
| २२ | श्री. सुनील पोरवाल | ३०.०९.२०१० | ०१.०३.२०११ |
| २३ | श्री. सुधीर कुमार गोयल | ०१.०३.२०११ | ३०.०६.२०१५ |
| २४ | श्री. दिनेश के. जैन | ३०.०६.२०१५ | ०३.०५.२०१६ |
| २५ | श्री. भगवान सहाय | ०३.०५.२०१६ | १९.०८.२०१६ |
| २६ | श्री. दिनेश के. जैन | १९.०८.२०१६ | ०७.०९.२०१६ |
| २७ | श्री. बिजय कुमार | ०७.०९.२०१६ | ३१.०८.२०१८ |
| २८ | श्री. एकनाथ राजाराम डवले | ०१.०९.२०१८ | १२.०६.२०२३ |
| २९ | श्री. अनूप कुमार | १२.०६.२०२३ | १९.०३.२०२४ |
| ३० | श्रीमती इडजेस अंगमो कुंदन | १९.०३.२०२४ | २४.०६.२०२४ |
| ३१ | श्रीमती व्ही. राधा | २४.०६.२०२४ | १३.०८.२०२४ |
| ३२ | श्रीमती जयश्री भोज | १३.०८.२०२४ | ०२.०१.२०२५ |
| ३३ | श्री. विकास चंद्र रस्तोगी | ०२.०१.२०२५ | - |

# मा. व्यवस्थापकीय संचालक

| अ.क्र. | व्यवस्थापकीय संचालक | कार्यकाळ | |
|---|---|---|---|
| | | पासून | पर्यंत |
| १ | श्री. टी. बलरामन | २६.०७.१९७६ | १६.०६.१९७८ |
| २ | श्री. व्ही. रंगनाथन | १७.०६.१९७८ | ३०.०९.१९८० |
| ३ | श्री. व्ही. एस. धुमाळ | १०.१०.१९८० | ०९.११.१९८४ |
| ४ | श्री. सुबोध कुमार | १०.११.१९८४ | १०.०८.१९८६ |
| ५ | श्री. जे. पी. डांगे | १०.११.१९८६ | १९.०६.१९८८ |
| ६ | श्री. राहूल अस्थाना | २०.०६.१९८८ | ०५.०९.१९८९ |
| ७ | श्री. अजित कुमार जैन | ०६.०९.१९८९ | २२.०७.१९९१ |
| ८ | श्री. संजय उबाळे | २६.०७.१९९१ | ०६.०६.१९९४ |
| ९ | श्री. विजय कुमार | ०६.०६.१९९४ | ३०.०६.१९९६ |
| १० | श्री. बलदेव सिंह | ०६.०७.१९९६ | २२.०४.१९९८ |
| ११ | डॉ. प्रदीप व्यास | १०.०५.१९९८ | ०८.०७.२००२ |
| १२ | डॉ. महेश शुक्ला | ०८.०७.२००२ | ०१.०८.२००२ |
| १३ | श्री. अश्वनी कुमार | ०१.०८.२००२ | २६.०८.२००४ |
| १४ | श्री. अनूप कुमार | २६.०५.२००४ | १८.०८.२००६ |
| १५ | श्री. सौरभ विजय | १८.०८.२००६ | २३.०६.२०१० |
| १६ | श्री. परिमल सिंह | २४.०६.२०१० | ३१.१२.२०११ |
| १७ | श्री. डी. आर. बन्सोड | ०१.०१.२०१२ | २२.०७.२०१३ |
| १८ | श्री. एस डी वानखेडे | २२.०७.२०१३ | ३१.०८.२०१४ |
| १९ | श्री. अरुण बी. उन्हाळे | १७.०१.२०१५ | १०.०५.२०१६ |
| २० | श्री. आर.व्ही.गमे | ०६.०६.२०१६ | ०२.०५.२०१७ |
| २१ | श्री. ओम प्रकाश बकोरिया | ०२.०५.२०१७ | २९.०५.२०१७ |
| २२ | श्री. ओमप्रकाश एन. देशमुख | २९.०५.२०१७ | ०२.१२.२०१८ |
| २३ | श्री. अनिल भंडारी | ०१.१२.२०१८ | ०८.१२.२०२० |
| २४ | श्री. जितेंद्र पापळकर | ०९.१२.२०२० | १६.०२.२०२१ |
| २५ | श्री. जी. श्रीकांत | १७.०२.२०२१ | ०७.०४.२०२१ |
| २६ | श्री. राहूल अशोक रेखावार | ०८.०४.२०२१ | ०४.१०.२०२१ |
| २७ | श्री. रुचेश जयवंशी | ०४.१०.२०२१ | २७.०७.२०२२ |
| २८ | श्री. संतोष आळसे | २७.०७.२०२२ | १५.१२.२०२२ |
| २९ | श्री. सचिन कलंत्रे | १६.१२.२०२२ | १७.०९.२०२४ |
| ३० | श्री. योगेश कुंभेजकर | १७.०९.२०२४ | - |

| अ.क्र. | भागधारकामार्फत निवडून दिलेले संचालक | कार्यकाळ | |
|---|---|---|---|
| | | पासून | पर्यंत |
| १ | श्री. डब्ल्यू. के. घुले | २९.०९.१९७८ | २७.०६.१९८४ |
| २ | श्री. व्ही. एच. देशमुख | २८.०६.१९८४ | १७.१२.१९८७ |
| ३ | श्री. एस. एन. खवले | २८.०६.१९८४ | २८.१२.१९९२ |
| ४ | श्री. दिवाकरराव श्यामराव धोत्रे | २९.१२.१९९२ | २८.१२.१९९६ |
| ५ | श्री. उत्तमराव दाजीसाहेब कदम | २९.१२.१९९२ | २९.१२.१९९५ |
| ६ | डॉ. संजय प्रकाश लोळगे | ३१.१२.१९९६ | २८.१२.१९९६ |
| ७ | श्री. दिवाकरराव श्यामराव धोत्रे | २९.१२.२००२ | २६.१२.२००३ |
| ८ | श्री. संजयभाऊ एस. धोत्रे | २७.१२.२००३ | २९.०५.२०१९ |
| ९ | श्री. वल्लभराव टी. देशमुख | २७.१२.२००३ | - |
| १० | डॉ. रणजीत एन. सपकाळ | २२.०९.२०२२ | - |





**श्री. विकास चंद्र रस्तोगी** (भा.प्र.से.)
प्रधान सचिव (कृषी) तथा
अध्यक्ष, महाबीज

## शुभेच्छा संदेश

राज्यातील शेतकरी बांधवांना गुणवत्तापूर्ण बियाणे रास्त दरात उपलब्ध व्हावे या उदात्त हेतूने दिनांक २८ एप्रिल, १९७६ रोजी स्थापन झालेले महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ अर्थात महाबीज सुवर्ण महोत्सवी वर्षात पदार्पण करीत आहे. महाबीजचा मागिल पाच दशकांचा हा प्रवास कृषि क्षेत्रात उल्लेखनिय योगदान तसेच शेतकऱ्यांच्या अतूट विश्वासाचा साक्षीदार राहिलेला आहे. या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त महाबीज भागधारक, बिजोत्पादक/शेतकरी बंधू-भगिनी, महाबीज विक्रेते तसेच महाबीज अधिकारी/कर्मचारी या सर्वांना हार्दिक शुभेच्छा...!

कृषि अर्थव्यवस्थेमध्ये दर्जेदार बियाण्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून उच्च प्रतीच्या गुणवत्तापूर्ण बियाण्यांमुळे पीक व्यवस्थापन खर्चात बचत होऊन शेतकरी बांधवांच्या उत्पन्नात वाढ होते. सन २०२४-२५ वर्षात महामंडळामार्फत भारतीय बीज प्रमाणिकरणाचे किमान मानकानुसार पात्र असलेले विविध पिकांच्या १३० वाणांचे एकुण ५,५६,४६१ क्विं. दर्जेदार बियाणे राज्यातील शेतकरी बांधवांना रास्त दरात उपलब्ध करुन दिले आहे. भारत सरकारने बियाण्यांची गुणवत्ता, पारदर्शकता आणि ट्रेसिबिलीटी सुनिश्चित करून संपूर्ण बियाणे जीवनचक्राचे डिजिटल व्यवस्थापन करण्याचे उद्देशाने साथी पोर्टल विकसित केले आहे. त्या अंतर्गत बियाणे पिशव्यांवर युनिक क्यूआर कोड दिला जातो, ज्यामुळे शेतकरी मोबाईलद्वारे बियाण्याची गुणवत्ता, उत्पादक, उत्पादन तारीख, वैधता तसेच वंशावळ तपासू शकतात. साथी पोर्टलवरील नोंदणीमुळे महाबीजमार्फत पुरवठा होणाऱ्या बियाण्यांची गुणवत्ता अधोरेखित होत असून, त्यामुळे शेतकरी बंधू-भगिनींचा महाबीजवरील विश्वास अधिक दृढ होत आहे.

महामंडळाव्दारे गुणवत्तापूर्ण वियाण्यांसोबतच दर्जेदार जैविक उत्पादने, ऊती संवर्धित केळी व बांबू रोपे, संकरीत पपई रोपे तसेच शोभीवंत फुलझाडे व फळझाडांची रोपे शेतकरी बांधवांना उपलब्ध करुन दिल्या जात आहेत. शेतकरी केंद्रबिंदू मानून उच्च गुणवत्तेच्या कृषि निविष्ठा रास्त दरात शेतकरी बांधवांना उपलब्ध होत असल्यामुळे महाबीजने खऱ्या अर्थाने "शेतकऱ्यांची बियाणे कंपनी" म्हणून नावलौकिक मिळविला आहे. तसेच केंद्र शासन व महाराष्ट्र शासनाच्या नवीन संकल्पना व विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणीव्दारे राज्यातील शेतकरी बांधवांना महाबीजने सर्वोत्तम सेवा प्रदान केली आहे. राज्यातील शेतकरी बांधवांच्या उन्नतीसाठी आणि प्रगतीसाठी दिलेल्या भरीव योगदानाबद्दल महामंडळाचे मन:पूर्वक अभिनंदन...!

महाबीजची उत्तरोत्तर प्रगती होऊन या संस्थेच्या माध्यमातून शेतकरी बंधू-भगिनींचे जीवनात संपन्नता येवो, हीच सदिच्छा...!




**डॉ. शरद गडाख**
कुलगुरु, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

## शुभेच्छा संदेश

महाबीज आपल्या सुवर्ण महोत्सवी वर्षात पदार्पण करीत आहे, ही अत्यंत अभिमानास्पद बाब आहे. गेल्या ५० वर्षांपासून महाबीजने देशातील तसेच राज्यातील शेतकऱ्यांना उच्च प्रतीच्या बियाण्याचा पुरवठा करुन कृषी क्षेत्रात महत्वपूर्ण योगदान दिले आहे. तसेच बिजोत्पादन आणि वितरणासोबतच जैविक उत्पादने, ऊती संवर्धन आणि फळझाडे-रोपवाटिका यासारख्या कृषी क्षेत्राशी निगडीत विविध उपक्रमांमध्येही आपली एक वेगळी ओळख निर्माण केली आहे.

डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ आणि महाबीज यांचे नाते अतिशय जुने आणि दृढ आहे. विद्यापीठामार्फत विकसित करण्यात आलेल्या विविध पीक वाणांचा प्रसार व लोकप्रियता वाढविण्यात महाबीजने अत्यंत मोलाची भूमिका बजावली आहे. विद्यापीठ आणि महाबीज यांच्यातील हे सहकार्य भविष्यात अधिक वृद्धिंगत होईल, असा मला विश्वास आहे.

या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त प्रकाशित होणा-या विशेषांकात महाबीजच्या वाटचालीचा मागोवा घेत शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी महामंडळाने केलेल्या कार्याचा गौरव होणे अत्यंत उचित ठरेल. महाबीजच्या या प्रेरणादायी प्रवासासाठी आणि भविष्यातील यशस्वी वाटचालीसाठी मन:पूर्वक शुभेच्छा.




महाबीज वर्धापन दिनाचे औचित्य साधून महाबीज उत्पादीत जैविक खतांचा संघ महाजैविकचे लोकार्पण ना. श्री. अब्दुल सत्तार कृषी राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, श्री. सचिन कलंत्रे, डॉ. शरद गडाख व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले.



**डॉ. इंद्रा मणी**
कुलगुरु, डॉ. व. ना. म. कृ. वि., परभणी

# शुभेच्छा संदेश

महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ (महाबीज), अकोला आपल्या ५० व्या वर्धापन दिनाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षात पदार्पण करत आहे, ही महाराष्ट्राच्या कृषी क्षेत्रासाठी अत्यंत अभिमानास्पद बाब आहे. महाबीजने गेल्या पाच दशकामध्ये रास्त दरात विविध पीक/वाणांचे गुणवत्तापूर्ण, संशोधित आणि प्रमाणित बियाणे निर्मीती व वितरणाच्या माध्यमातून राज्यातील शेतक-यांचे उत्पादन आणि उत्पन्न वाढविण्यास मोलाचे योगदान दिले आहे. तसेच राज्यातील चारही कृषी विद्यापीठाने विकसित केलेल्या विविध पिकांच्या वाणांचे बियाणे शेतकरी बांधवांपर्यंत पोहचविण्यास मोलाचा हातभार लावला आहे.

महाबीजने बियाणे व्यवसायाबरोबरच जैविक उत्पादने, ऊती संवर्धित रोपांची निर्मीती व पुरवठा, शोभीवंत तसेच फळझाडांच्या रोपवाटिका यासारख्या विविध कृषी सेवा पुरवून आपल्या कार्यक्षेत्राचा विस्तार संपुर्ण राज्यात केला आहे. शेतकरी बांधवांच्या आर्थिक विकासात योगदान देण्याच्या आपल्या ध्येयाशी संस्थेने सातत्याने बांधिलकी जोपासली आहे.

महाबीजच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त प्रकाशित करण्यात येत असलेल्या महाबीज वार्ता विशेषांक शेतकरी बांधवाना व कृषी विस्तारकांना निश्चितच उपयुक्त ठरेल.

महाबीज परिवाराच्या या यशस्वी वाटचालीस तसेच भविष्यात महाबीज नव्या उंचीवर पोहोचेल ही अपेक्षा ठेवून पुढील कार्यासाठी हार्दिक शुभेच्छा!



गोदावरी वाणाच्या प्रक्षेत्रास डॉ. इंद्रा मनी, कुलगुरू, डॉ. व.ना. म. कृ. वि. यांची भेट



**श्री. सुरज मांढरे (भा.प्र.से.)**
कृषी आयुक्त तथा
संचालक महाबीज

## शुभेच्छा संदेश

राज्यातील शेतकरी बांधवांना विविध पिक/वाणांचे गुणवत्तापूर्ण प्रमाणित बियाणे रास्त दरात पुरवठा करण्याचे कार्य महाबीज मागील ५ दशकांपासुन सचोटीने पार पाडत आहे, त्यामुळे महाबीज राज्यातील शेतकरी बांधवांमध्ये विश्वासाचे प्रतिक बनले आहे.

लवकरच महाबीज सुवर्ण महोत्सवी वर्षात पदार्पण करीत असून ही सुवर्णमयी वाटचाल महामंडळाव्दारे राज्यातील शेतकरी बांधवांना दिलेल्या अविरत सेवेची साक्ष देणारी आहे. त्यानिमित्ताने राज्यातील सर्व शेतकरी बांधवांना महाबीज सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा.

महाबीजद्वारे राज्यातील शेतकऱ्यांना दर्जेदार बियाण्यासोबतच जैविक उत्पादने, ऊती संवर्धित केळी व बांबू रोपे तसेच शोभीवंत व फळझाडांची गुणवत्तापूर्ण रोपे/कलमा रास्त दरात पुरविल्या जातात. उच्च गुणवत्तेची दर्जेदार उत्पादने, माफक दर व विक्री पश्चात सेवा यामुळे शेतकरी बांधवांचा महाबीजवरील विश्वास अधिक दृढ झाला आहे.

महाबीजव्दारे केंद्र तसेच राज्य शासनाच्या शेतकरी हिताच्या कल्याणकारी योजना यशस्वीपणे राबविण्यात येत आहेत.

उच्च गुणवत्तेच्या प्रमाणित बियाण्यांमुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होण्यास निश्चितच मदत झाली असून ही बाब कृषी विभाग तसेच महाबीज या दोन्ही संस्थांसाठी गौरवास्पद आहे.

याप्रसंगी महाबीजमार्फत राज्यातील शेतकरी बांधवांना दर्जेदार कृषि निविष्ठांचा पुरवठा निरंतर होऊन त्यांच्या उत्कर्षात अधिकाधिक भर पडो हीच सदिच्छा व्यक्त करतो.





श्री. विकास चंद्र रस्तोगी (भा.प्र. से.), प्रधान सचिव (कृषी) तथा अध्यक्ष, महाबीज व श्री. सुरज मांढरे (भा.प्र.से.) कृषी आयुक्त तथा संचालक, महाबीज यांची महाबीज कार्यालयास भेट



**श्री. योगेश कुंभेजकर (भा.प्र.से.)**
व्यवस्थापकीय संचालक
महाबीज

# महाबीज एक दृष्टीक्षेप

सर्वप्रथम शेतकरी बांधव व भगिनींच्या महाबीजवरील अतूट विश्वासाच्या सुवर्ण महोत्सवी पर्वानिमित्त सर्वांना हार्दिक शुभेच्छा. या आनंदोत्सवाच्या क्षणी, महामंडळाच्या सुवर्णमयी वाटचालीतील काही ठळक व मोलाच्या घडामोडींचा मागोवा घेणारा हा एक संक्षिप्त दृष्टिक्षेप...

जागतिक बँकेच्या आर्थिक सहाय्याने "राष्ट्रीय बियाणे प्रकल्प" अंतर्गत चांगल्या प्रतीचे बियाणे शेतकऱ्यांना योग्य दरात व योग्य वेळी उत्पादन तसेच प्रक्रिया करुन उपलब्ध करण्याचे उद्देशाने विविध राज्य बियाणे महामंडळांची सुरुवात करण्यात आली. त्यानुसार महाराष्ट्रासाठी दिनांक २८ एप्रिल, १९७६ रोजी अकोला येथे महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळाची स्थापना झाली. आज महाबीज भारतातील सार्वजनिक क्षेत्रातील एक प्रमुख बियाणे कंपनी म्हणून नावारुपास आलेली आहे व महाबीजची गणना देशातील अग्रगण्य राज्य बियाणे महामंडळ म्हणून होते. महामंडळाची स्थापना ही कंपनी कायदा १९५६ नुसार झालेली आहे.

आतापर्यंत महामंडळाने ४२ पिकांच्या जवळपास १९३ सुधारीत तसेच संकरीत वाणांना उत्पादन आणि प्रक्रिया करून शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविले आहे. यामध्ये तृणधान्य, कडधान्य, तेलवर्गीय, तंतूवर्गीय पिके, भाजीपाला, वैरण पिके, हिरवळीचे पिके, इत्यादी बियाण्यांचा समावेश आहे. गेल्या अनेक वर्षापासून महाबीज हे सर्वोत्कृष्ट दर्जा व उत्पादकता राखणारी देशातील अग्रगण्य संस्था असून, राष्ट्रीय उत्पादकता परिषदेकडून १६ वेळा राष्ट्रीय उत्पादकता पारितोषिकाने गौरवान्वीत देशातील एकमेव बियाणे महामंडळ आहे. सन २००५ साली केंद्र शासनाच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालयाचे अधिनस्त वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन विभागामार्फत महाबीजला ड्रायगॅस डिलींटींग प्रक्रिया केंद्राचे संशोधन आणि विकासाकरीता राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झाला आहे.

महामंडळातर्फे मागील वर्षी विविध वाणांचे ६.६४ लक्ष क्विंटल प्रमाणित बियाणेचा १०२१ अधिकृत बियाणे विक्रेत्यांमार्फत संपूर्ण राज्यामध्ये दुर्गम व अतिदुर्गम भागात सुध्दा पुरवठा केला आहे. यामध्ये १४४ विविध सहकारी संस्थांचा सुद्धा समावेश आहे. याचप्रमाणे परिस्थितीनुरूप इतर ६ राज्यांमध्ये सुध्दा महामंडळामार्फत बियाणे उपलब्ध करुन देण्यात येते. अनुवंशिक व भौतीक दृष्ट्या शुध्द, उत्तम उगवणशक्ती व जोमदार पायाभूत, प्रमाणित तसेच सत्यप्रत बियाणे महामंडळ तयार करुन शेतकऱ्यांना सातत्याने उपलब्ध करीत असते. शेतकऱ्यांमध्ये महाबीज हे गुणवत्तेचे व विश्वासाचे प्रतिक बनले आहे. महाबीजमार्फत सक्षम व तांत्रीक अधिका-यांच्या देखरेखीत विविध भौगोलीक परिस्थतीमध्ये बियाणे तयार करुन पेरणीपासून ते मळणीपर्यंत आणि प्रक्रियेपासून ते वितरणा पर्यंत शास्त्रोक्त पध्दतीने हाताळणी करुन बियाण्याची गुणवत्ता राखण्यात येते.


महाबीजची स्थापना पश्चिम विदर्भातील मध्यवर्ती ठिकाण अकोला येथे करण्यात आली. अकोला येथे डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या रुपाने कृषी शिक्षणाचे केंद्र असून राज्य बीज प्रमाणिकरण यंत्रणेचे मुख्यालयसुद्धा आहे व त्याअर्थी अकोला ही राज्याची बियाणे राजधानी बनली आहे. सुरुवातीस अकोला, बुलढाणा, परभणी व नांदेड येथे बिजोत्पादन कार्यक्रम असल्यामूळे महामंडळाचा कारभार होता. तदनंतर महाबीजचा विस्तार संपूर्ण राज्यात झालेला आहे. राष्ट्रीय कृषी विकास योजने अंतर्गत अद्ययावत बीज प्रक्रिया केंद्र तसेच गोदामाची निर्मितीसुद्धा महामंडळाने राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये केलेली आहे.

### प्रशासन

महाबीजच्या संचालक मंडळाची घडण ही ११ नियुक्त संचालक आणि भागधारक शेतकऱ्यांमधून निवडून आलेले २ संचालक अशा १३ सदस्यांनी पूर्ण होते. भारतीय प्रशासन सेवेतील वरिष्ठ सनदी अधिकारी तथा राज्याचे कृषी सचिव हे महाबीजचे पदसिध्द अध्यक्ष असून, दैनंदिन कामकाम महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक (भारतीय प्रशासन सेवेतील अधिकारी) यांचेव्दारे नियंत्रित करण्यात येते. महाबीजचे मुख्य कार्यालय महाराष्ट्रातील अकोला येथे असून राज्यात अकोला, नागपूर, जळगांव, जालना, परभणी व पुणे असे एकुण ६ विभागीय कार्यालय तसेच २५ जिल्हा कार्यालय आणि अद्यावत २३ बीज प्रक्रिया केंद्र कार्यरत आहेत. तद्वतच मध्यप्रदेश, गुजरात, तेलंगणा / आंध्रप्रदेश, पश्चिम बंगाल, बिहार व छत्तीसगड या बाहेर राज्यात सुध्दा महामंडळाचे बिजोत्पादन तथा विपणनाचे जाळे विस्तारले आहे. महामंडळाचे दैनंदिन कामकाज सक्षमपणे चालवणे म्हणजे राज्यातील लाखो शेतकऱ्यांना दर्जेदार बियाण्यांचा वेळेत व रास्त दरात पुरवठा करणे आणि पर्यायाने कृषी उत्पादनवाढ सुनिश्चित करणे. यासाठी सक्षम व कार्यकुशल मनुष्यबळ अत्यावश्यक आहे. सद्यस्थितीत मंजूर ६८१ पदांपैकी ३४७ पदे कार्यरत असून २०२५ मध्ये आकृतीबंध सुधारित करून पदभरती करण्याचे नियोजन आहे. बिजोत्पादन, प्रक्रिया, गुणवत्ता नियंत्रण, विपणन व वित्त या प्रमुख बाबींचा सर्वंकष विचार करुन महामंडळाचे दैनंदिन कामकाजात सीड फ्लो, ई-ऑफिस, लीगल सॉफ्टवेअर, पे-रोल, SATHI पोर्टल, तसेच सोशल मीडियाचा वापर वाढला आहे.

महामंडळाचे अधिकृत भागभांडवल रु.१० कोटी असून प्रती भागाची किंमत रु. १००/- असून विक्री व भरणा केलेले भागभांडवल रु ४.१८ कोटी आहे. भागधारकांनी खालील प्रमाणे भागरक्कम धारण केलेली आहे.

| | | |
|---|---|---|
| ■ | महाराष्ट्र शासन | - ४९.०० % |
| ■ | राष्ट्रीय बीज निगम | - ३५.४४ % |
| ■ | शेतकरी व बिजोत्पादक | - १२.७० % |
| ■ | कृषी विद्यापीठे | - ०२.८६ % |




### बीजोत्पादन

सुरुवातीला महामंडळाचा बिजोत्पादन कार्यक्रम केवळ अकोला, बुलढाणा, परभणी व नांदेड या चार जिल्ह्यांपुरताच मर्यादित होता. परंतू काही पिकांच्या बिजोत्पादनास लागणारे अनुकूल हवामान व राज्यातील बिजोत्पादन कार्यक्रमातून

प्राप्त बियाण्यामधील तूट भरुन काढण्याचे उद्देशाने शासन मान्यतेने असलेले निर्बंध शिथिल करुन बिजोत्पादन कार्यक्रमाचा विस्तार संपूर्ण महाराष्ट्र राज्य व बाहेर राज्यात करण्यात आला. राज्यातील शेतकऱ्यांची गरज व बदलत्या हवामानाचा विचार करून महामंडळामार्फत संकरीत व सुधारीत वाणांचा बिजोत्पादन कार्यक्रम राबवून शेतकऱ्यांना उच्च प्रतीचे प्रमाणित बियाणे उपलब्ध करून देणे हे महाबीजचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

दरवर्षी महाबीजमार्फत ४२ पिकांच्या १९३ संकरीत व सुधारीत वाणांचे बियाणे उपलब्ध करण्यात येते. यामध्ये कृषी विद्यापीठे, भारतीय कृषी अनुसंधान परिषदेच्या अंतर्गत संशोधन केंद्र व महाबीज संशोधीत नविन वाणांचा बिजोत्पादन कार्यक्रमात अंतर्भाव असतो. राज्यातील ३१ जिल्ह्यांमध्ये साधारणत: ६० ते ६५ हजार हेक्टर क्षेत्रावर ४०,००० बिजोत्पादकांचा महाबीज बिजोत्पादन कार्यक्रमामध्ये सहभाग असतो. राज्यातील अनुभवी बिजोत्पादकांमार्फत ९० ते ९५ टक्के पायाभूत बियाणे उत्पादित होउन प्रमाणित बियाणे निर्मितीसाठी वापरले जाते.

शेतकऱ्यांना आधुनिक लागवड पध्दती व पिक व्यवस्थापन याबाबत तांत्रिक माहिती देण्यासाठी नियमीतपणे कार्यशाळा, शेती दिन व ग्रामसभा आयोजित केल्या जातात. याशिवाय बिजोत्पादन कार्यक्रम आयोजीत केलेल्या जिल्ह्यांमध्ये कार्यरत महाबीज कृषी क्षेत्र अधिकारी तसेच बीज प्रमाणीकरण यंत्रणेचे अधिकारी यांचेमार्फत पिकांच्या महत्वाचे अवस्थेत क्षेत्र तपासणी करण्यात येउन संबंधीत बिजोत्पादकांना उत्पादीत बियाणे पात्र होण्याचे दृष्टीने आवश्यक सूचना देण्यात येतात.

**महाबीजच्या बिजोत्पादन कार्यक्रमाची ठळक वैशिष्ट्ये**

- सद्यस्थितीत एकूण ९ ते १० लक्ष क्विंटल कच्चे बियाण्याचे उत्पादन होत असून भविष्यात १२ लक्ष क्विंटलपर्यंत वाढविण्याचे उद्दिष्ट आहे.
- कृषी विद्यापीठे, ICAR अंतर्गत संस्था, BARC, ICRISAT, ICGEB व महाबीज संशोधीत अधिक उत्पादनशिल वाणांचे महाराष्ट्राबरोबरच आवश्यकतेनुसार बाह्य राज्यांतही बिजोत्पादन.
- आर्थिकदृष्ट्या परवडणाऱ्या भौगोलीक क्षेत्रांमध्ये बिजोत्पादन नियोजन.
- ग्राम बिजोत्पादन तसेच महाबीज पुरस्कृत योजनांद्वारे एकाच गावात एकाच वाणाचे जास्तीत जास्त बिजोत्पादन कार्यक्रम राबविण्यास बिजोत्पादकांना प्रोत्साहन.
- बिजोत्पादन कार्यक्रमातून अनुवंशीक दृष्ट्या शुध्द, उच्च उगवणशक्ती तथा कमी निम्नस्तर बियाणे प्राप्त होण्याचे उद्येशार्थ प्रोत्साहनपर योजनांचा समावेश.

**साथी पोर्टल**

भारत सरकारने बियाण्यांची गुणवत्ता, पारदर्शकता आणि ट्रेसेबिलीटी सुनिश्चित करुन संपूर्ण बियाणे जीवनचक्राचे डिजिटल व्यवस्थापन करण्याचे उद्येशाने साथी पोर्टल (Seed Authenticity Traceability and Holistic Inventory Seedtrace.gov.in) प्रणाली विकसीत केली आहे. या प्रणालीचे माध्यमातून बियाणे पिशव्यांवर युनिक QR कोड दिला जातो, ज्यामूळे शेतकरी मोबाईलद्वारे बियाण्याची गुणवत्ता, उत्पादक, उत्पादन तारीख, वैधता तसेच बियाणे वंशावळ तपासू शकतात. महाराष्ट्रात सर्व प्रथम महाबीजने साथी प्रणालीची अंमलबजावणी खरीप-२०२२

हंगामात सुरु केली व आजमितीस देशपातळीवर साथी प्रणालीद्वारे सर्वात जास्त बिजोत्पादन कार्यक्रम नोंदविणारी संस्था म्हणून महाबीज ओळखल्या जात आहे. साथी पोर्टलवरील नोंदणीमूळे महाबीजमार्फत पुरवठा होणाऱ्या बियाणेची गुणवत्ता अधोरेखीत होत असून त्यामूळे शेतकरी बंधू भगिनींचा महाबीजवरील विश्वास अधिक दृढ होत आहे.

**नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प (Project for Climate Resilient Agriculture) टप्पा-२**

नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पा अंतर्गत सन २०२५ पासुन राज्यातील एकुण २१ जिल्हयातील ६९५९ गावांमध्ये ना.दे.कृ.सं.प्रकल्प टप्पा-२ अंतर्गत विविध कार्यक्रम राबविण्यात येत असुन हवामान अनुकुल विविध पिक वाणांचा बिजोत्पादन कार्यक्रम या घटकाचा सुध्दा अंतर्भाव करण्याचा प्रकल्पाचा मानस आहे. ज्यामुळे राज्यातील बिजोत्पादन कार्यक्रम वृध्दिंगत होण्यास व बिजोत्पादकांचे आर्थिक उत्पन्न वाढविण्यास निश्चितच मदत होईल. तद्वतच महाबीज उत्पादीत जैविक बुरशीनाशक ट्रायकोडर्मा, जैविक खतांचा संघ महाजैविक (रायझोबियम/अॅझोटोबॅक्टर, पीएसबी आणि केएमबी) या २१ जिल्ह्यातील शेतक-यांना उपलब्ध करुन देण्याचे नियोजन असून त्यासाठी दोन्ही संस्थांमध्ये सामंजस्य करार देखील एप्रिल २०२५ मध्ये करण्यात आला आहे.

**प्रक्रिया**

प्रक्रिया विभागाव्दारे अत्याधुनिक यंत्रसामुग्रीचा वापर करुन बिजोत्पादन कार्यक्रमाव्दारे उपलब्ध झालेल्या कच्च्या बियाण्याची बीज प्रमाणीकरण यंत्रणेच्या देखरेखीखाली बीज प्रक्रिया केंद्रावर प्रक्रिया करुन व शासकिय बीज परीक्षण प्रयोगशाळेत चाचणी करुन बियाणे कायदा १९८६ व बियाणे नियम १९६८ च्या मापदंडानुसार उगणशक्ती, भौतिक शुद्धता इ. मध्ये पात्र झालेले बियाणे राज्यातील शेतकरी बांधवांकरिता उपलब्ध करुन दिल्या जाते. राज्यात विभागवार एकुण २३ बीज प्रक्रिया केंद्रे तसेच एमआयडीसी, अकोला येथे १०,००० क्विं. साठवूणक क्षमतेचे सौर उर्जेवर चालणारे वातानुकूलीत गोदाम उभारण्यात आले आहे. याशिवाय बियाणे साठवणूकीसाठी उच्च साठवणूक क्षमता असलेले एकुण ४ गोदामे कार्यरत आहेत. ह्याशिवाय आवश्यकतेनुसार अतिरिक्त बियाणे साठवणूकीकरिता जिल्हा पातळीवर भाडे तत्त्वावर चांगल्या प्रतीचे गोदामे अधिगृहीत करण्यात येतात. प्रक्रिया विभागाव्दारे आजपर्यंत राबविलेले महत्त्वपूर्ण उपक्रम पुढीलप्रमाणे आहेत.

**अ) ड्रायगॅस डिलीटींग प्रक्रिया**

ड्रायगॅस डिलीटींग बीज प्रक्रिया केंद्र, शिवणी व परभणी येथे सन १९८५ पासून सुरु करण्यात आले. या प्रकल्पाचा भारतातील सर्वात मोठ्या प्रकल्पामध्ये समावेश होता. ड्रायगॅस डिलीटींग तंत्रज्ञानामध्ये अतिशय वेगाने कापूस बियाण्याचे तंतूविरहण होऊन तंतूविरहीत बियाणे कमी वेळात बॅगींग-टॅगींग करीता उपलब्ध होते. ड्रायगॅस तंत्रज्ञानामध्ये HCL गॅसचा वापर सरकीचे तंतूविरहणाकरीता करण्यात येतो. बीज प्रक्रिया केंद्र, शिवणी व परभणी येथे प्रत्येकी ६०० क्विं. प्रति दिन क्षमतेने प्रत्येक हंगामात अंदाजे ७०,००० क्विं. कापूस बियाण्याची तंतूविरहण प्रक्रिया करण्यात आली.

### ब) वेट ॲसीड डिलींटीग प्रक्रिया

संकरीत कापुस बियाणे लॉट अतिशय लहान अंदाजे ८० ते १२० किलो वजनाचे असतात तसेच प्रत्येक लॉटची क्षेत्र चाचणी घेणे अनिवार्य असते. बियाणे विपणनाकरीता विहीत कालावधीमध्ये उपलब्ध होणे करीता क्षेत्र चाचणीचे निकाल प्राप्त होणेपूर्वी लॉटनिहाय तंतुविरहण करणे गरजेचे ठरते याकरीता वेट ॲसीड डिलींटीग तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येतो. यामध्ये $H_2SO_4$ आम्लाद्वारे तंतुविरहण करून तातडीने त्या बियाण्यास चुन्याचे निवळीने ($CaSO_4$) न्युट्रलाइझ केलेनंतर तंतुविरहीत बियाणे पुढील बॅगींग टॅगींग करीता उपलब्ध होते. महामंडळाने १९९४ ते १९९९ या कालावधीत हिंगणघाट, धनेगाव व खामगाव या ठिकाणी वेट ॲसीड डिलींटीग प्रक्रिया केंद्राची उभारणी करण्यात आली. प्रति हंगाम ५ ते ७ लाख पाकीट संकरीत कापुस बियाण्याचे तंतुविरहण या केंद्रावर करण्यात आले. यामध्ये कापसाचे H4, H6, PKV Hy-2, CAHH-468, NHH-44 व DCH-32 आदी वाणांचा समावेश होता.

### क) राष्ट्रीय फलोत्पादन अभियान (NHM) भाजीपाला बीज प्रक्रिया केंद्र उभारणी

राष्ट्रीय फलोत्पादन अभियान (NHM) अंतर्गत तथा महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळ, पुणे यांचेमार्फत अनुदानीत प्रकल्पा अंतर्गत एमआयडीसी शिवणी, अकोला येथे सन २००५ मध्ये भाजीपाला बीज प्रक्रिया केंद्राची उभारणी करण्यात आली. या योजनेअंतर्गत रू.१२५ लाख रूपयाचा निधी महामंडळास प्राप्त झाला. या अंतर्गत भाजीपाला प्रक्रिया संयंत्र सिडक्लीनर ग्रॅव्हेटी सेप्रेटर, सिड ट्रीटर, सिड काऊंटर तथा ५०० क्विंटल क्षमतेचे आर्द्रतारहीत वातानुकुलित गोदाम उभारणी या कामाचा समावेश आहे.

### ड) सौरऊर्जाचलित आर्द्रताविरहीत वातानुकूलित गोदाम उभारणी

राष्ट्रीय कृषी विकास योजना (RKVY) अंतर्गत भाजीपाला बीज प्रक्रिया केंद्र, शिवणी येथे २०,००० स्के.फुट क्षेत्रफळाचे सौर उर्जेवर चालणारे आर्द्रता विरहीत वातानुकूलित गोदामाची उभारणी सन २०१८-१९ या कालावधीत करण्यात आली. सदर गोदाम पुर्णपणे सौरउर्जा चलीत असून यामध्ये गरजेनूसार विविध पिकाचे पायाभूत, मुलभूत व पैदासकार बियाणे, नरवाण, मादीवाण तथा संकरीत भाजीपाला बियाण्याची शास्त्रोक्त पध्दतीने साठवणुक करण्यात येते.

### इ) प्रक्रिया कामामध्ये अपारंपरीक उर्जा स्त्रोताचा वापर

महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळाने महाराष्ट्र शासन तथा भारत सरकारने केलेले आवहानानूसार प्रक्रिया कामामध्ये अपारंपरीक उर्जा स्त्रोताचा वापर मोठया प्रमाणावर केला असून या अंतर्गत खालील ठिकाणी सौरउर्जा निर्मीती प्रकल्प कार्यान्वित झाले असून या उर्जेचा वापर प्रक्रिया कामाकरीता करण्यात येत आहे.

| अ.क्र | विवरण | क्षमता (केडब्ल्यूपी) |
|---|---|---|
| १ | मुख्य कार्यालय , महाबीज भवन, अकोला | ३० |
| २ | भाजीपाला बीज प्रक्रिया केंद्र, अकोला | १०० |
| ३ | बीज प्रक्रिया केंद्र, शिवणी | १५० |
| ४ | बीज प्रक्रिया केंद्र, चिखली | १२० |

## विपणन

राज्यातील शेतकरी बांधवांना महाबीज बियाणेचा वेळेत व रास्त दरात पुरवठा करण्याचे उद्देशाने वितरण व विपणन कार्यात निपूण अशा १००० पेक्षा जास्त अधिकृत विक्रेत्यांचे जाळे राज्यात सर्वदूर पसरविले आहे. महाबीज विक्रेत्यांना बियाणे विक्रीवर माफक सूट व सवलती देण्यात येतात. महामंडळाव्दारे राज्य व केंद्र सरकारच्या बियाणे पुरवठा विषयक योजनांमध्ये प्राधान्याने बियाणे पुरवठा करुन शासकिय योजनांमध्ये सक्रिय सहभाग घेण्यात येतो.

## गुणवत्ता नियंत्रण व संशोधन

बियाणे गुणवत्तेविषयीचे महत्व लक्षात घेउन महामंडळाने सन १९८२ मध्ये स्वतंत्र गुणवत्ता नियंत्रण विभागाची स्थापना करुन बियाणे गुणवत्तेस सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. या विभागांर्तगत कार्यरत असलेल्या गुणवत्ता नियंत्रण पथकामार्फत बिजोत्पादन, प्रक्रिया, साठवणूक व विपणन या सर्व स्तरावर बियाण्याची गुणवत्ता तपासण्यात येते. संकरीत व सुधारीत वाणांच्या बियाण्यातील मुळ गुणधर्म, बियाण्यातील जोम, भौतिक शुध्दता, अनुवंशीक शुध्दता व बियाणे दर्जा जोपासण्याच्या कार्यास गुणवत्ता व्यवस्थापनामध्ये महत्वाचे स्थान दिले आहे. सोबतच महामंडळाने अकोला, परभणी व जालना येथे अत्याधुनिक उपकरणांनी सुसज्ज अशा बीज परीक्षण प्रयोगशाळा स्थापीत केलेल्या आहेत. बीज परीक्षण प्रयोगशाळेच्या दैनंदिन कामकाजामध्ये सुसूत्रता, गतीमानता, विश्वासार्हता व अचूकता आणण्याकरिता स्वतंत्र सॉफ्टवेअर कार्यान्वित होत आहे. बियाणे कायदा १९६६ अंतर्गत अकोला, परभणी व जालना येथील बीज परीक्षण प्रयोगशाळा शासनाने राज्य बियाणे प्रयोगशाळा म्हणून अधिसूचित केलेल्या असून अकोला प्रयोगशाळेकरीता National Accreditation Board for Testing and Calibration Laboratories (NABL) संस्थेचे मानांकनाची संपूर्णप्रक्रिया पूर्ण झालेली आहे आणि यासंदर्भातील लेखापरिक्षण देखील पूर्ण झाले आहे. ॲग्रीकल्चर टुडे, नवी दिल्ली या संस्थेने महाबीजच्या अकोला येथील बीज परीक्षण प्रयोगशाळेस "सार्वजनिक क्षेत्रातील सर्वोत्कृष्ट बीज परीक्षण प्रयोगशाळा" या पुरस्काराने गौरविले आहे.



बीज परीक्षण प्रयोगशाळा, अकोला

## संशोधन व विकास

हवामान बदल व राज्यातील शेतकऱ्यांच्या गरजेनुसार अधिक उत्पादनशील संकरीत आणि सुधारित वाण विकसीत करुन उपलब्ध् करण्याचे उद्देशाने सन १९९२ मध्ये महाबीजमार्फत संशोधनात्मक कार्याची सुरुवात करण्यात आली असून या संशोधनात्मक कार्यास केंद्र शासनाच्या वैज्ञानिक व औद्योगिक संशोधन विभाग, नवी दिल्ली (DSIR) यांची

मान्यता प्राप्त आहे. महामंडळाचे संशोधन कार्य प्रामुख्याने संकरीत कापूस, संकरीत ज्वारी, संकरीत मका, संकरीत बाजरी, मुग, उडीद, तुर, संकरीत सुर्यफूल, हरभरा, धान व भाजीपाला या पिकांवर केंद्रीत आहे.

आजतागायत महाबीज संशोधीत संकरीत ज्वारी महाबीज-७, संकरीत मका उदय, संकरीत बाजरी महाबीज-१००५, संकरीत कपाशी महाबीज-१२४ बीजी-२, मुग उत्कर्षा, तुर एमपीव्ही १०६ (राणी) इत्यादी वाण अधिसूचित झाले आहेत. याशिवाय उडीद विजय व एम.यु.-४४, संकरीत ज्वारी महाबीज-७०४, संकरीत मका महाबीज-१७०८, मुग उन्नती, संकरीत भेंडी तन्वी, संकरीत वांगे जयंत व यशवंत, संकरीत चोपडा दोडका दिव्यांका, संकरीत शिरी दोडका ऐश्वर्या, संकरीत दुधी भोपळा ईश्वर, चवळी पार्वती, गवार गौरी इत्यादी वाण शेतकऱ्यांमध्ये लोकप्रिय आहेत. उन्हाळी हंगामात मुग व ज्वारी पिकांच्या लागवडीकडे शेतकऱ्यांचे झुकते माप लक्षात घेऊन महाबीजमार्फत या पिकांमध्ये उन्हाळी हंगामात लागवडीस योग्य अधिक उत्पादनशिल वाण तसेच संकरीत कपाशी, संकरीत मका व संकरीत भाजीपाला पिकांमध्ये बाजारामध्ये उपलब्ध लोकप्रिय वाणाच्या तुलनेत सरस वाण विकसीत करण्याचे संशोधनात्मक कार्य प्रगती पथावर आहे. महाबीज संशोधित मूग उत्कर्षा, संकरीत मका उदय, संकरीत बाजरी महाबीज-१००५ व उडीद एम.यु.-४४ या वाणांची PPV & FRA (Protection of Plant Varieties and Farmers' Rights Authority) अंतर्गत नोंदणी झाली असून याबाबतचे प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे.

### संकरित बीटी कपाशी

महाराष्ट्रातील शेतकरी बांधवांना राज्यातील कृषि विद्यापीठांचे लोकप्रिय व अधिक उत्पादनशील संकरीत कपाशी वाणांमध्ये बी.टी. तंत्रज्ञानाचा अंतर्भाव करुन उपलब्ध करुन देण्याकरीता महामंडळाने सन २०२४ मध्ये राज्यातील डॉ.पं.दे.कृ.वि. अकोला, म.फु.कृ.वि., राहुरी आणि व.ना.म.कृ.वि. परभणी या तिन्ही कृषि विद्यापीठांसोबत सामंजस्य करार केले आहेत. सदर विद्यापीठांचे तथा महाबीज संशोधित अधिक उत्पादनशील कपाशी वाणांमधे बीटी जनुकांचा अंतर्भाव करणेकरीता महिको मॉन्सेन्टो बायोटेक इंडिया लिमिटेड यांचेसोबत आवश्यक करार करण्यात आला आहे.

महाराष्ट्रातील शेतकरी बांधवांच्या मागणीनुसार डॉ.पं.दे.कृ.वि. अकोला आणि व.ना.म.कृ.वि. परभणी यांचे लोकप्रिय वाण अनुक्रमे संकरीत कपाशी पिकेव्ही हाय-२ व एन. एच. एच-४४ या दोन्ही वाणांमध्ये बी.टी. तंत्रज्ञान अंतर्भूत करुन केंद्र शासनाचे मान्यतेनंतर (GEAC) सदर वाण शेतकरी बांधवांना उपलब्ध करुन दिले आहेत. परंतु आता बहुतांश शेतकऱ्यांची पसंती ही मोठे बोंडे असलेल्या अधिक उत्पादनक्षम वाणास असल्यामुळे सदर वाणांच्या विक्रीची मर्यादा लक्षात घेऊन महामंडळाने त्यांचे उत्पादन व विक्री नियंत्रित केली आहे.

महाबीज संशोधीत सं. कपाशी महाबीज-१२४ बीजी-२ या संकरित बीटी कपाशी वाणास सन २०२२ मध्ये DAC, ICAR यांचेकडून व्यावसायिक मंजुरात प्राप्त झालेली असून हे वाण शेतकरी बांधवांच्या पसंतीत उतरले आहे. शेतकरी बांधवांच्या मागणीनुसार या वाणाचे बियाणे उपलब्ध करण्याचे नियोजन आहे.

सद्यस्थितीत महामंडळ व विद्यापीठांच्या संयुक्त प्रयत्नातुन ५ संकरित बीटी कपाशी वाण तसेच २ सुधारित बीटी कपाशी वाण अखिल भारतीय समन्वित संशोधन प्रकल्पा अंतर्गत प्रथम वर्षीय चाचणीकरिता समाविष्ट करण्यात आलेले आहेत. संशोधन व विकास विभाग महाबीज, अकोला येथे मोठे बोंडे व अधिक उत्पादनक्षम वाण विकसीत करणेबाबत संशोधन व चाचण्या प्रगतीपथावर आहेत.

### ऊती संवर्धन

ऊती संवर्धन ही एक आधुनिक जैवतांत्रिक प्रक्रिया आहे, ज्याद्वारे वनस्पतीच्या विशिष्ट ऊतींपासून प्रयोगशाळेत निर्जंतुक व विशिष्ट पोषक माध्यमात तथा नियंत्रित वातावरणात रोगमुक्त, उच्च गुणवत्तेची आणि एकसमान ऊती संवर्धीत रोपे तयार केली जातात. पारंपरिक पद्धतीने तयार केलेल्या केळी रोपांमध्ये अनेकदा रोगप्रतिकार क्षमतेचा अभाव, गुणवत्तेतील असमानता व उत्पादनातील चढउतार दिसून येतो. तसेच या झाडांची निसवण एकाच वेळी होत नाही.



जैव तंत्रज्ञान प्रयोगशाळा

महामंडळाने २०२५-२६ या वर्षात ४ लक्ष ऊती संवर्धित केळी रोपांचा वाजवी दरात पुरवठा करण्याचे नियोजन केले आहे. यासोबतच ऊती संवर्धन तंत्राद्वारे विकसीत पपई, बांबू, स्ट्रॉबेरी, डाळींब आणि हळद रोपांचे व्यावसायीक स्तरावर मोठया प्रमाणात वितरण करण्याचे नियोजीत आहे. तसेच पिवळा पळस, क्रोटॉन गिब्सोनियनस यासारख्या काही नामशेष होणा-या वनस्पतींच्या ऊती संवर्धनाद्वारे रोपांची निर्मिती करण्याचे प्रयत्न सुरु आहेत. दर्जेदार ऊती संवर्धीत रोपांच्या उपलब्धतेमुळे उत्पादनक्षमता आणि उत्पन्नवाढीस निश्चितच हातभार लागणार आहे.

### महाबीज रोपवाटीका

महामंडळाव्दारे सन १९९६ पासुन राज्यातील शेतकरी बांधवांना संकरित पपई, फळझाडे, फुलझाडे, शोभिवंत झाडे, कुंपणासाठी लागणारी झाडे, भाजीपाला इ. प्रकारची अनुवंशिकदृष्ट्या शुद्ध रोपे रास्त दरात मिळावी हया उद्देशाने महाबीज रोपवाटीकेची शिवणी, अकोला येथे स्थापना करण्यात आली. शेतक-यांची मागणी लक्षात घेऊन कालांतराने नागपूर व खामगाव येथे सुद्धा महाबीज रोपवाटिका सुरु करण्यात आल्या. या रोपवाटीकांमार्फत विविध रोपांची विक्री व उद्यान विकासाशिवाय व्हर्टिकल गार्डन, आकर्षक झुले व लोखंडी स्टॅन्ड, जैविक उत्पादने, गांडूळखत, विविध कुंड्या व परसबाग बियाणे सुद्धा विक्रीस उपलब्ध आहेत. प्रत्येक आनंदाच्या क्षणी शुभेच्छा देण्याकरिता आकर्षक रोपटे देण्याची संकल्पना महाबीज रोपवाटिकेने सुरु केली असून या संकल्पनेस ग्राहकांकडून उस्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. महाबीज रोपवाटीकांची वार्षिक उलाढाल रु. १ ते १.२५ कोटी इतकी असून त्यामध्ये दिवसागणीक वाढ होत आहे.



मा. व्यवस्थापकीय संचालक व मा. संचालक, महाबीज यांची रोपवाटिकेस भेट

महामंडळाचे रोपवाटीकांव्दारे शासकिय, निमशासकिय, खाजगी तसेच स्वयंसेवी संस्था यांना वृक्षारोपण तसेच उद्यान विकसीत करण्यासाठी लागणारी रोपे सवलतीच्या दरात पुरवठा करण्यात येतात. सद्यस्थितीत अकोला, पैलपाडा, खामगाव व नागपूर येथे महाबीज रोपवाटीका कार्यरत असून भविष्यात अमरावती, जळगाव, जालना, नाशिक, पुणे,

परभणी इ. ठिकाणी महाबीज रोपवाटीकेचा विस्तार करण्याचे नियोजन आहे.महामंडळाच्या अकोला रोपवाटीका अंतर्गत पैलपाडा जि. अकोला येथील मातृवृक्ष रोपवाटीकेस कृषि विभागाचा फळ रोपवाटीका परवाना (नोंदणी प्रमाणपत्र) प्राप्त झाला आहे. महामंडळाच्या रोपवाटीकेतील गुणवत्तापूर्ण व अनुवंशिकदृष्ट्या शुद्ध रोपांचे उत्पादन व विक्रीमध्ये वाढ करुन रास्त दरात जास्तीत जास्त ग्राहकांना उपलब्ध करुन देण्याकरिता अत्याधुनिक व उच्च तंत्रज्ञानयुक्त संसाधनांनी सुसज्ज नवीन रोपवाटीका स्थापन करण्याचा महामंडळाचा मानस आहे.

सद्यस्थितीत महाबीज रोपवाटिका, पैलपाडा, अकोला येथे मातृवृक्ष लागवड करण्यात आलेली असून गुलाबाचा बगीचा व बांबूवन सुद्धा तयार केलेले आहे. महाबीज रोपवाटिका पैलपाडा येथे नव्याने औषधी वनस्पती उद्यान देखील तयार करण्यात आलेले आहे. महाबीज रोपवाटिकेमार्फत दरवर्षी वार्षिक पुष्प प्रदर्शनींमध्ये सहभाग घेण्यात येतो. सन २०२४-२५ मध्ये महाबीज रोपवाटिकेस गार्डन क्लब, अकोला यांचेद्वारा आयोजित वार्षिक पुष्पप्रदर्शनीमध्ये ४० पुरस्कारांसहित चॅम्पियन्स ट्रॉफी, क्वीन ऑफ रोझ, प्रिन्स ऑफ रोझ हे मानाचे पारितोषिके प्राप्त झालेले आहेत. जिल्ह्यापुरतेच मर्यादित न राहता महाबीज रोपवाटिकेने सन २०२४-२५ मध्ये माहीम, मुंबई येथे नॅशनल सोसायटी ऑफ फ्रेंड्स ऑफ ट्रीस द्वारा आयोजित वार्षिक पुष्पप्रदर्शनी मध्ये सहभाग घेतला असता सदर प्रदर्शनीमध्ये महाबीज रोपवाटिकेस द्वितीय क्रमांकाचा पुरस्कार प्राप्त झाला आहे.

**जैविक उत्पादने**

शाश्वत व अवशेषमुक्त शेती ही पर्यावरणपूरक असून ती नैसर्गिक संसाधनांचा समतोल वापर करते आणि जैवविविधतेचे रक्षण करते. सेंद्रिय शेतीमुळे उत्पादन खर्चात बचत होते, जमिनीची सुपिकता व उत्पादन क्षमता वाढते, तसेच मातीतील सूक्ष्म जीव व गांडुळे सक्रिय राहून जलधारण क्षमताही सुधारते. जैविक उत्पादनांच्या वापरामुळे प्रदूषण कमी होते आणि नैसर्गिक संतुलन व जैवविविधता टिकून राहते. सेंद्रिय अन्न हे रसायनमुक्त व पौष्टिक असल्यामुळे ते आरोग्यासाठी अत्यंत लाभदायक असते, त्यामुळे जैविक उत्पादनांना दिवसेंदिवस अधिक महत्त्व प्राप्त होत आहे. तथापि, बाजारात उपलब्ध असलेल्या जैविक उत्पादनांच्या गुणवत्तेबाबत शेतकरी बांधवांमध्ये नेहमीच साशंकता असते आणि हीच बाब लक्षात घेऊन महामंडळाने सन २०१७ पासून गुणवत्तापूर्ण जैविक उत्पादने शेतकऱ्यांना माफक दरात उपलब्ध करून देण्यास सुरुवात केली आहे. निसर्गतः जमिनीत जिवाणू, बुरशीसारखे असंख्य उपयुक्त सूक्ष्म जीव आढळतात जे पिकांना आवश्यक अन्नद्रव्ये व उपयुक्त घटक उपलब्ध करून देतात आणि अशा मातीला "जिवंत माती" असे संबोधले जाते. जमिनीची सुपिकता व उत्पादकता वाढविण्यासाठी या उपयुक्त जिवाणूंची संख्या वाढविणे गरजेचे असते.


महाबीज ट्रायकोडर्मा प्रयोगशाळा, खामगाव जि. बुलढाणा

प्रयोगशाळेत उपयुक्त व कार्यक्षम जिवाणूंना स्वतंत्रपणे वाढवून त्यात योग्य वाहक मिसळून तयार केलेले मिश्रण म्हणजे जैविक खते होय. नत्र, स्फुरद, पालाश व इतर सूक्ष्म मूलद्रव्ये पिकांना उपलब्ध करून देण्यासाठी तसेच शेतीतील सेंद्रिय

पदार्थांचे जलद विघटन साध्य करण्यासाठी हे जिवाणू अत्यंत उपयुक्त ठरतात. तसेच राज्यातील शेतकरी बांधवांची मागणी विचारात घेता महाबीज जैविक खते प्रयोगशाळा, पैलपाडामार्फत नवनिर्मित महाजैविक (रायझो) व महाजैविक (अॅझोटो) या द्रवरुप जिवाणू संघाचे महाबीज वर्धापन दिनानिमित्त तत्कालीन मा. कृषि मंत्री यांचे हस्ते दिनांक २८ एप्रिल २०२३ रोजी लोकार्पण करण्यात आले आहे. याशिवाय महाजैविक जिवाणू संघाच्या धर्तीवर शेतकरी बांधवांच्या मागणीनुसार पीके (पीएसबी+केएमबी) जिवाणू संघाचे लाकार्पण शिवार फेरी रब्बी २०२४-२०२५ दरम्यान दिनांक २८ जानेवारी २०२५ रोजी व्यवस्थापकीय संचालक यांचे हस्ते मा. संचालक श्री. वल्लभराव देशमुख व डॉ. रणजित सपकाळ यांचे प्रमुख उपस्थितीत करण्यात आले आहे. सद्यस्थितीत महाबीजमार्फत गुणवत्तापूर्ण जैविक बुरशीनाशक ट्रायकोडर्मा आणि द्रवरूप जैविक खते रायझोबियम, अॅझोटोबॅक्टर, पीएसबी व केएमबी यासोबतच तीन जिवाणूंचा समावेश असलेले महाजैविक (रायझोबियम/अॅझाटोबॅक्टर, पीएसबी व केएमबी) आणि दोन जिवाणूंचा समावेश असलेले पीके (पीएसबी + केएमबी) हे द्रवरूप जैविक संघ शेतकऱ्यांना उपलब्ध करून दिली जात आहेत.



महाबीज जैविक खते प्रयोगशाळा, पैलपाडा

महाबीजकडून पुरविण्यात येणाऱ्या जैविक उत्पादनांची परिणामकारकता शेतकऱ्यांनी प्रत्यक्ष अनुभवली असल्यामुळे ही उत्पादने शेतकऱ्यांच्या पसंतीस उतरली असून त्यांची मागणी दिवसेंदिवस वाढत आहे. सन २०२५-२६ मध्ये महामंडळामार्फत राज्यातील शेतकरी बांधवांकरीता २.०० लक्ष लीटर जैविक खते व ४५०० क्विंटल ट्रायकोडर्मा उपलब्ध करण्याचे नियोजन आहे. भविष्यात महाबीजमार्फत मायकोरायझा, सुडोमोनास, द्रवरूप ट्रायकोडर्मा, गोमूत्र व निंबोळी आधारित कीटकनाशके तसेच जैविक नॅनो कॅप्सूलसारखी उत्पादने शेतकऱ्यांना उपलब्ध करण्याचे नियोजन आहे. यासाठी महाबीजकडून सातत्याने संशोधन सुरू असून या क्षेत्रात आघाडीच्या कृषी संस्थांबरोबर सामंजस्य करार करण्याचे नियोजित आहे.

**महाबीज उत्कृष्टता केंद्र**

पैलपाडा, जिल्हा अकोला येथे महामंडळाची ५७ एकर जमीन असून या प्रक्षेत्रावर शेतकरी बांधवांच्या मागणीनुसार तसेच बदलत्या हवामानास अनुकूल अधिक उत्पादनक्षम वाणांचे संशोधनात्मक कार्य सुरु आहे. या प्रक्षेत्रावर राज्यातील शेतकरी बांधवांना अनुवंशिकदृष्ट्या शुद्ध व अधिक जोम असलेले दर्जेदार बियाणे उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने प्रमुख पिकांच्या विविध वाणांची क्षेत्र चाचणी व क्षेत्रिय




संशोधन व विकास विभाग, पैलपाडा

उगवण चाचणी आयोजित केली जाते.

याशिवाय, द्रवरुप जैविक खतांची निर्मिती, शोभिवंत व फळ झाडांची अनुवंशिकदृष्ट्या शुद्ध रोपे तयार करण्यासाठी विविध प्रकारच्या मातृवृक्षांची लागवड, महत्त्वाच्या पिकांचा बिजोत्पादन कार्यक्रम व गांडूळ खत निर्मिती यांसारखी अनेक उपयुक्त कार्येही या प्रक्षेत्रावर राबविली जातात. खरीप व रब्बी हंगामात येथे भव्य शिवार फेरीचे आयोजन केले जाते, ज्यामध्ये शेतकरी बांधवांना पारंपारिक पिकांबरोबरच विविध प्रकारचे बांबू, गुलाब आणि औषधी वनस्पतीही बघायला मिळतात. या प्रक्षेत्रावर चालणाऱ्या बहुविध व गुणवत्तापूर्ण कार्याची दखल घेत व्यवस्थापनाने पैलपाडा येथील महाबीज प्रक्षेत्रास "महाबीज सेंटर ऑफ एक्सलंस" (महाबीज उत्कृष्टता केंद्र) असे नामकरण केले आहे.

## शिवार फेरी

राज्यातील शेतकरी बांधवांकरिता, महाबीजव्दारे सन २०२१ पासून दरवर्षी महाबीज उत्कृष्टता केंद्र, पैलपाडा, जिल्हा



महाबीज उत्कृष्टता केंद्र पैलपाडा द्वारा आयोजित 'शिवारफेरी रब्बी २०२४-२५'

अकोला येथे सप्टेंबर महिन्यात खरीप तर जानेवारी महिन्यात रब्बी शिवार फेरीचे भव्य आयोजन करण्यात येत असून शेतकरी बाधवांचा यास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. या शिवारफेरीमध्ये महाबीज विपणन साखळीतील मुख्य पिकांच्या सर्व वाणांचे तसेच बाजारात उपलब्ध इतर लोकप्रिय वाणांचे गुणधर्म व लागवड तंत्रज्ञान शेतकरी बांधवाना पीक प्रात्यक्षिकाद्वारे प्रत्यक्ष अनुभवता येते आणि त्याचा तुलनात्मक अभ्यास करून त्यांना अनुकूल वाणांची निवड करण्यास मदत होते. हाच या शिवार फेरीचा मुख्य उद्देश आहे. याशिवाय सदर प्रक्षेत्रावर महाबीज उत्पादित दर्जेदार द्रवरूप जैविक खते व जैविक बुरशीनाशक या उत्पादनांची बीज प्रक्रिया केल्यामुळे त्यांचा पिकांवर होणारा सकारात्मक परिणाम प्रत्यक्ष अनुभवता येतो. या कार्यक्रमास शेतकरी बांधवांसोबतच सन्माननीय भागधारक, बीजोत्पादक, महाबीज अधिकृत विक्रेते तसेच कृषी



'शिवारफेरी रब्बी २०२४-२५' उपस्थितांना मार्गदर्शन करतांना मा. व्यवस्थापकीय संचालक, महाबीज

विभाग, बीज प्रमाणीकरण यंत्रणा, कृषी विद्यापीठातील अधिकारी व महाबीज अधिकारी यांना वेगवेगळ्या वाणांच्या गुणधर्मांचा एकाच ठिकाणी तुलनात्मक अभ्यास करता येतो. यांसारख्या शिवारफेरीचे आयोजन महाबीजद्वारे प्रत्येक विभागात करण्याचे नियोजीत आहे.

### महाबीज वार्ता




महामंडळामार्फत राज्यातील बिजोत्पादक, शेतकरी बांधव, महाबीज विक्रेते तसेच कृषि क्षेत्राशी निगडीत सर्वांना कृषीविषयक महत्त्वपूर्ण माहिती सुलभरित्या उपलब्ध करुन देण्यास प्रसिध्द असलेलं महाबीज वार्ता त्रैमासिक, सामाजिक माध्यमांचा कृषी क्षेत्रातील वाढता प्रभाव व वापर लक्षात घेऊन नोव्हेंबर-२०२२ पासुन डिजीटल स्वरुपात महाबीजच्या वेब ॲप्लीकेशन व महाबीज संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात येत आहे.

महाबीज वार्ताचे डिजीटल स्वरुपातील अंकाव्दारे महाराष्ट्रामध्ये लागवडीसाठी शिफारस केलेल्या अधिसूचित/ प्रसारित/संशोधित पिक/वाणांची माहिती, कृषि तज्ज्ञांकडून प्राप्त शास्त्रीय व महत्त्वपूर्ण कृषीविषयक लेख, अद्ययावत पिक लागवड तंत्रज्ञान व व्यवस्थापन, काढणी पश्चात तंत्रज्ञान, शेती उपयोगी कृषि अवजारे यांची माहिती, प्रगतीशील व कल्पक शेतकरी बांधवांच्या यशोगाथा व मनोगत, कृषी क्षेत्रातील महत्त्वाचे घडामोडी यासह इतर महत्त्वपूर्ण माहिती शेतकरी बांधवांना उपलब्ध करुन देण्यात येते. जेणेकरुन त्यांना त्यांचे जमीनीस व स्थानिक वातावरणास अनुकूल वाणांची निवड करुन तसेच अद्यावत कृषीविषयक तंत्रज्ञानाचा अवलंब करुन त्यांच्या उत्पन्नामध्ये निश्चितच भर पडेल. यासोबतच महाबीजमार्फत फेसबुक (https://tinyurl.com/MahabeejFB) व युट्यूब (https://tinyurl.com/MahabeejYoutube) सारख्या सामाजिक माध्यमांचा उपयोग करुन शेतकरी बांधवांना कृषी क्षेत्रातील महत्वपूर्ण माहिती देण्यात येत आहे.

### वित्त

महामंडळाची आर्थिक वाटचाल अत्यंत सकारात्मक आणि प्रगतीशील दिशेने होत आहे. सुरुवातीच्या काळात महामंडळाची आर्थिक उलाढाल अतिशय मर्यादित होती. मात्र, कालांतराने ही उलाढाल सातत्याने वाढत गेली. आजपर्यंतची सर्वाधिक वार्षिक आर्थिक उलाढाल सुमारे रु. ७२० कोटी इतकी झाली आहे, तर महामंडळाने मिळवलेला सर्वाधिक वार्षिक नफा रु. ४६ कोटी इतका आहे. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे, शेतकऱ्यांना योग्य दरात उच्च दर्जाची बियाणे उपलब्ध करून देताना महामंडळाने अत्यल्प नफ्यातही आर्थिक शाश्वतता राखत नफ्यातील सातत्य यशस्वीरित्या राखले आहे.

महाबीजच्या स्थापनेपासुन ते आजतागायत महाबीज उत्पादित बियाणे शेतकऱ्यांसाठी एका विश्वासू कृषी घटकाची भुमिका पार पाडत आहे. राज्यातील बिजोत्पादकांच्या अपरिमित श्रमाने व तज्ञ अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली उत्पादित

केलेले बियाणे "शुध्द बिजापोटी फळे रसाळ गोमटी" या उक्तीस शतप्रतिशत पात्र ठरले आहे. परिणामी महाबीज म्हणजे राज्यातील शेतकऱ्यांच्या कुटूंबातील एक अविभाज्य घटक म्हणून प्रसिध्दीस पावले आहे.

सुवर्ण महोत्सवी वर्षात विविध कार्यक्रमांसोबत महामंडळाच्या सेवा, कार्यप्रणाली आणि भविष्यातील योजनांवर विशेष लक्ष देण्यात येत आहे, ज्यामुळे संस्था अधिक सक्षम, तत्पर व प्रभावी बनेल. पाच दशकांच्या या गौरवशाली व प्रेरणादायक वाटचालीत शेतकरीबांधव व महाबीजच्या उत्कर्षास कारणीभूत असणाऱ्या सर्व घटकांचे मन:पूर्वक अभिनंदन व आभार.

***

## महाबीज गौरव पुरस्कार

महामंडळाच्या प्रगतीमध्ये व उत्कर्षामध्ये मोलाचे योगदान देणा-या बिजोत्पादक, शेतकरी, अधिकृत बियाणे विक्रेते, शास्त्रज्ञ तसेच महाबीज कर्मचारी वृंद यांना मानाचा महाबीज गौरव पुरस्कार दरवर्षी महामंडळाच्या वर्धापन दिनी देवून सन्मानीत करण्याचे नियोजीत आहे.

जेणेकरुन उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना प्रोत्साहन मिळून भविष्यात अधिक जोमाने काम करण्यास उत्साह निर्माण होईल.

त्यानुसार प्रथम महाबीज गौरव पुरस्कार महामंडळाचे ४९ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून महाबीज, मुख्यालय, अकोला येथे मान्यवरांचे शुभहस्ते दिनांक २८ एप्रिल २०२५ रोजी वितरीत करण्यात येत आहेत. सर्व पुरस्कार्थींना महाबीज परीवाराकडून हार्दीक शुभेच्छा.

# उजाळा आठवणींचा...






















महाबीज
रोपवाटीका
नातं निसर्गाशी
नातं आपलं, रुजवूया पक्क
आपल्या निसर्गाशी
। फुलझाडे, फळझाडे
। शोभीवंत झाडांची रोपे
। आकर्षक झुले व स्टँड
। लॅन्डस्केप, व्हर्टीकल गार्डन
। लागवड साहित्य
। परसबाग बियाणे
। जैविक खते व बुरशीनाशक
। गांडूळखत, टेरेरीयम
। ऊत्तीसंवर्धीत केळी व बांबू रोपे
। पपई व भाजीपाला रोपे
महाबीज
महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित
रोपवाटीका संपर्क : अकोला 9860154644 । नागपूर 8669642748 । खामगाव 8669642742



**श्री. संजयजी धोत्रे**
माजी केन्द्रीय राज्यमंत्री तथा
महाबीज संचालक (२००३-२०१९)

# शेतकरी कल्याणार्थ समर्पित धोरण ...

दर्जेदार बियाणे हा कृषी उत्पन्न वाढीसाठी मूलभूत घटक आहे व नेमकी हीच गरज विचारात घेउन केंद्र शासनाच्या सहकार्यातून आणि जागतिक बँकेच्या आर्थिक सहकार्याने राज्यातील शेतकऱ्यांना वाजवी दरात दर्जेदार बियाणे उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाने 'राष्ट्रीय बियाणे प्रकल्प' अंतर्गत तत्कालीन कृषी मंत्री तथा महाबीजचे प्रथम अध्यक्ष कै. नानासाहेब सपकाळ यांच्या पुढाकाराने, २८ एप्रिल, १९७६ रोजी महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळाची अकोला येथे स्थापना केली.

राज्यातील शेतकरी बांधवांना १९७६ पासून आजपर्यंत दर्जेदार कृषी निविष्ठा वाजवी दरात पुरवून, महामंडळाने खाजगी कंपन्यांच्या मक्तेदारीवर मर्यादा आणली. यामुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीस हातभार लागला आणि त्यांच्या विश्वासास पात्र ठरून महामंडळाने शेतकऱ्यांप्रती आपली सामाजिक बांधिलकी कायम राखली. महाबीज या नावाने ओळखले जाणारे हे महामंडळ आता सुवर्ण महोत्सवी वर्षात पदार्पण करत असून ही महाराष्ट्रासाठी अभिमानास्पद बाब आहे.

सुरुवातीपासूनच आमचा परिवार महामंडळाचे भागधारक असून, शेतकरी भागधारकांचा आग्रह आणि विश्वास यामुळे मी महामंडळाच्या संचालक पदावर, शेतकरी भागधारकांचा प्रतिनिधी म्हणून सन २००३ ते २०१९ दरम्यान कार्यरत राहिलो व नंतर केंद्रीय मंत्री म्हणून नियुक्ती झाल्याने संचालक पदाची जबाबदारी नविन नेतृत्वाकडे सोपविण्याकरीता या पदाचा राजीनामा दिला. परंतू संचालक म्हणून कार्यरत असतांना महाबीजचा पारदर्शक कारभार आणि कर्मचाऱ्यांचे संस्थेबद्दलचे समर्पण मला अत्यंत जवळून अनुभवता आले. महामंडळाच्या निर्णय प्रक्रियेत सहभाग असल्यामुळे, बिजोत्पादक शेतकऱ्यांना आकर्षक बियाणे खरेदी दर देताना राज्यातील अन्य शेतकऱ्यांना कोणतीही आर्थिक झळ बसू नये, यासाठी सर्वसमावेशक व शेतकरी हिताचे संतुलित निर्णय घेतले गेले. यामध्ये महाबीजच्या संकरीत बिटी कापूस एनएचएच-४४ बीजी-२ आणि पीकेव्ही हाय-२ बीजी-२ या वाणांचे लोकार्पण, जालना येथे नवीन बीज परीक्षण प्रयोगशाळेची स्थापना, भाजीपाला बीज प्रक्रिया केंद्राची उभारणी करुन सौर ऊर्जा संचालित वातानुकूलित व आर्द्रता विरहित गोदामांची सुविधा, राष्ट्रीय कृषी विकासयोजने अंतर्गत नवीन बिज प्रक्रिया केंद्राची उभारणी व आधुनिकीकरण, कृषी उत्पन्न बाजार समितीचे दर व आधारभूत किंमत यामधील तफावतीची रक्कम बिजोत्पादकांना शासनामार्फत अदा करणे इत्यादी निर्णयाचा समावेश आहे. या सर्व उपक्रमांबरोबरच महाबीजने जैविक खते, ऊती संवर्धन व रोपवाटिका व्यवसायातही उल्लेखनीय प्रगती साधली आहे. महाबीजच्या सुवर्णमहोत्सवी वाटचालीस हार्दिक शुभेच्छा!



श्री. वल्लभराव टी. देशमुख
संचालक, महाबीज

# बिजोत्पादनातून आर्थिक विकास ...

मागिल ५० वर्षापूर्वी राज्यातील शेतकऱ्यांना दर्जेदार बियाणे रास्त दरात व वेळेत कसे उपलब्ध होईल असा प्रश्न निर्माण झालेला असतांना जागतिक बँकेच्या आर्थिक सहकार्यातून "राष्ट्रीय बियाणे प्रकल्प" अंतर्गत राज्य शासनाने दिनांक २८ एप्रिल, १९७६ मध्ये अकोला येथे महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळाची स्थापना करुन शेतक-यांची चागंल्या बियाण्याची गरज पूर्ण केली.

राज्यातील बियाणे उद्योगासाठी महत्वपूर्ण असलेल्या विदर्भातील अकोला येथे मुख्यालय स्थापित झालेल्या महाबीजचा मागिल ४९ वर्षातील कार्यकाळ हा कृषि क्षेत्रातील उल्लेखनिय योगदानास तसेच शेतकऱ्यांच्या विश्वासास पात्र ठरलेला आहे. महामंडळामार्फत दरवर्षी राज्यातील शेतक-यांमार्फत विविध पिक व वाणांचा बिजोत्पादन कार्यक्रम राबवून शेतकरी बांधवांना दर्जेदार व गुणवत्तापूर्ण प्रमाणित बियाणे उपलब्ध करुन देत असल्यामूळे शेतकरी बांधवांच्या उत्पन्नात निश्चितच वाढ झाली आहे व पर्यायाने कृषि अर्थव्यवस्थेत चालना मिळाली आहे. त्यामुळे शेतकरी बंधू-भगिनींचा महाबीजवरील विश्वास दिवसेंदिवस अधिक दृढ झाला आहे. बियाणे व्यवसायासोबत महामंडळाने गुणवत्तापूर्ण दर्जेदार जैविक खते, जैविक बुरशीनाशक, ऊती संवर्धित केळी, बांबू व संकरित पपई रोपे तसेच शोभीवंत फुलझाडे व फळझाडांची रोपे शेतकरी बांधवांना रास्त दरात उपलब्ध करुन देण्यात आघाडी घेतली आहे. शेतक-यांच्या गरजेला प्रथम प्राधान्य देऊन उच्च गुणवत्तेच्या कृषि निविष्ठा रास्त दरात शेतकरी बांधवांना उपलब्ध करुन दिल्यामुळे महाबीजने शेतकऱ्यांचा विश्वास संपादन करुन एक वेगळ अस्तित्व निर्माण केलेलं आहे. याशिवाय महामंडळामार्फत केंद्र शासन व राज्य शासनाच्या विविध योजनांचा प्रत्यक्ष लाभ राज्यातील शेतकरी व बिजोत्पादकांना देउन महाबीजने सर्वोत्तम सेवा प्रदान केली आहे. राज्यातील शेतक-यांची गरज लक्षात घेता महामंडळामार्फत विशेषत: राज्यात स्त्रोत बियाणे वापरुन जास्तीत जास्त बिजोत्पादकांमार्फत गुणवत्तापुर्ण बियाणे उत्पादीत करुन पूरवठा करण्यात येतो. पर्यायाने बिजोत्पादन कार्यक्रमा अंतर्गत वाढीव दर मिळत असल्यामूळे त्यांचा सर्व समावेशक विकास होण्यास निश्चितच मदत झालेली आहे. सोबतच भागधारक, शेतकरी व महाबीज विक्रेते यांच्या उन्नतीसाठी आणि प्रगतीसाठी दिलेल्या भरीव योगदानाबद्दल महामंडळ खरोखर अभिनंदनास पात्र आहे. महाबीजची उत्तरोत्तर प्रगती होऊन या संस्थेच्या माध्यमातून शेतकरी बंधू-भगिनींचे जीवनात संपन्नता येवो, हीच सदिच्छा...!



राष्ट्रीय उत्पादकता परिषद, नवी दिल्ली यांचेतर्फे देण्यात येणारा राष्ट्रीय उत्पादकता पुरस्कार स्वीकारतांना मा. सचिव (कृषी) तथा अध्यक्ष, महाबीज श्री. जे. एस. सहारिया (भा.प्र.से.), मा. व्यवस्थापकीय संचालक श्री. अश्वनी कुमार (भा.प्र.से.), महाबीज संचालक श्री. वल्लभराव देशमुख व श्री. नानासाहेब देशमुख



डॉ. रणजित एन. सपकाळ
संचालक, महाबीज

# शेतकरी हाच केंद्रबिंदू ...

राज्याचे तत्कालीन कृषीमंत्री तथा महाबीजचे प्रथम अध्यक्ष कै. नानासाहेब सपकाळ यांचे पुढाकाराने महाबीजचे मुख्यालय राज्यातील बियाणे उद्योगासाठी महत्वपूर्ण असलेल्या विदर्भातील अकोला येथे जागतिक बँकेच्या आर्थिक सहकार्यातून "राष्ट्रीय बियाणे प्रकल्प" अंतर्गत दिनांक २८ एप्रिल, १९७६ रोजी स्थापीत करण्यात आले. महाबीज उत्पादीत दर्जेदार कृषी निविष्ठा रास्त दरात उपलब्ध झाल्यामुळे राज्यातील शेतकरी बांधवांच्या उत्पन्नात निश्चितच वाढ झाली आहे. त्यामूळे महाबीजचा मागिल पाच दशकांचा हा सुवर्ण महोत्सवी प्रवास कृषि क्षेत्रात उल्लेखनिय योगदान तसेच शेतकऱ्यांच्या अतूट विश्वासाचा साक्षीदार राहिलेला आहे. मा. विश्वासराव धुमाळ साहेब व्यवस्थापकीय संचालक असतांना त्यांच्या दूरदृष्टीमूळे महाबीजच्या व्यवसायात फार मोठया प्रमाणात वाढ होवून राज्यातील शेतकरी बांधवांत त्यांचे नाव तुमच्या विश्वासाचं बियाणं या ब्रिद वाक्यामध्ये रुढ झाले आहे.

कोरोना काळात महामंडळाचा राज्यातील शेतकरी बांधव, बिजोत्पादक, विक्रेते तसेच सन्माननीय भागधारक यांचेसोबत संपर्क कमी होवून समन्वयाचा अभाव दिसत होता. यावर उपाय म्हणून महामंडळामार्फत "महाबीज आपल्या दारी" या अभिनव संकल्पनेतून प्रत्येक जिल्हयात विशेष कार्यशाळा आयोजीत करुन त्यांच्या समस्या जाणून घेवून त्यांना तांत्रिक मार्गदर्शन करुन त्यांच्या समस्यांचे निराकरण करण्यात आले. याशिवाय ज्या भागधारकांचे भाग भारत सरकारकडे वर्ग झालेले आहे, त्यांचे भाग त्यांना अथवा वारसांना परत मिळण्याकरीता सुलभ पध्दत कार्यान्वीत करण्यात आली. त्यामूळे सन्माननीय भागधारक, शेतकरी/बिजोत्पादक व विक्रेते, यांच्या मनात महामंडळाविषयी सकारात्मकता व आस्था निर्माण होवून महाबीजची यशस्वी धौडदौड पून्हा जोमाने सुरु झाली. मागील तिन वर्षापासून केंद्र शासनाकडे प्रलंबित असलेले विविध योजनेतील अनुदान बिजोत्पादकांना मिळाल्यामुळे बिजोत्पादकांचा उत्साह जोमाने वाढून बिजोत्पादन कार्यक्रमास चालना मिळाली आहे. महाबीजने बियाण्यांशिवाय दर्जेदार जैविक खते, ऊती संवर्धन व रोपवाटीका या व्यवसायामध्ये झेप घेउन महामंडळाची आर्थिक उलाढाल वाढविण्यास भरीव मदत झाली आहे. शेतकरी केंद्रबिंदू मानून केंद्र शासन व महाराष्ट्र शासनाच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करुन राज्यातील शेतकरी बांधवांना महाबीजने सर्वोत्तम सेवा प्रदान करुन त्यांच्या उन्नतीसाठी आणि प्रगतीसाठी दिलेल्या भरीव योगदान दिल्यामुळे महाबीजने खऱ्या अर्थाने "शेतकऱ्यांची कंपनी" म्हणून नावलौकिक मिळविला आहे. महाबीजची उत्तरोत्तर प्रगती होऊन या संस्थेच्या माध्यमातून शेतकरी बंधू-भगिनींचे जीवनात संपन्नता येवो, हीच सदिच्छा...!



ग्रामबिजोत्पादन कार्यक्रम अंतर्गत आयोजित शेतकरी प्रशिक्षण व चर्चासत्रा दरम्यान मार्गदर्शन करतांना मा. संचालक, महाबीज मा. डॉ. रणजित सपकाळ आणि यावेळी मंचावर उपस्थित मा. आमदार रणधीरभाऊ सावरकर व इतर मान्यवर

# महाबीज सोयाबीन

## सोयाबीन वाणांचे पर्याय विपूल...
## निवडा बियाणं शेतीस अनुकूल...

**उपलब्ध वाण**

| | | |
|---|---|---|
| फुले किमया | एमएयुएस-७१ | एमएयुएस-७२५ |
| जेएस-३३५ (जवाहर) | एमएयुएस-१५८ | सुवर्ण सोया |
| एमएयुएस-६१२ | जेएस-२०-११६ | एमएसीएस-१२८१ |
| फुले संगम | जेएस-९३-०५ | एनआरसी-१३० |
| फुले दुर्वा | एमएसीएस-१४६० | जेएस-९५-६० |
| पीडीकेव्ही अंबा | डीएस-२२८ | एमएयुएस-१६२ |



आमच्या अधिकाऱ्यांशी
संपर्क करुन योग्य वाण निवडा

जिल्हा निहाय
संपर्क क्रमांक





श्री. व्ही. एस. धुमाळ भा.प्र.से.
व्यवस्थापकीय संचालक (१९८०-१९८४)

# विश्वासाचं बियाणं महाबीज ...

२८ एप्रिल १९७६ रोजी, भारताच्या इतिहासात पहिल्यांदाच शेतकरी, कृषी विद्यापीठे, राज्य आणि केंद्र सरकार यांना एकत्र आणून बियाणे उद्योगाचे आधुनिकीकरण करण्याच्या उद्देशातून महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ उदयास आली. अकोला, बुलढाणा, परभणी आणि नांदेड जिल्ह्यांच्या मर्यादित प्रकल्प क्षेत्रातून ही सुरुवात झाली. गेल्या ५० वर्षांत महाबीज शेतकऱ्यांमध्ये एक विश्वासार्ह ब्रँड बनला आहे. हे केवळ बीजोत्पादक, कृषी विद्यापीठे, महाबीजचे कर्मचारी आणि व्यवस्थापन यांच्या अथक प्रयत्नांमुळे साध्य झाले.१९८० मध्ये जेव्हा मी संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक म्हणून जबाबदारी स्वीकारली. तेव्हा राज्य सरकारने बियाणे उत्पादनाचा एक महत्त्वाकांक्षी कार्यक्रम हाती घेण्याचा निर्णय घेतला. महाबीजने बियाण्यांच्या गरजेच्या १५०% तसेच कृषी विद्यापीठांना अनुक्रमे २००% आणि ३००% पटीत पायाभूत बियाणे आणि पैदासकार बियाणे उत्पादन करणे आवश्यक होते.मात्र जर मागणीत घट झाली त्याची जबाबदारी कोणाकडे असणार हा महत्वाचा प्रश्न होता. कृषीमंत्री श्री. भगवंतराव गायकवाड आणि महाबीजचे अध्यक्ष डॉ. वेंकटेशन यांनी महाबीज आणि विद्यापीठ यांचे कोणतेही आर्थिक नुकसान होऊ नये यासाठी बफर स्टॉकचा खर्च उचलण्याचा धाडसी निर्णय घेतला.जागतिक बँकेने लादलेल्या काही निर्बंधांवर मात करणे हे दुसरे मुख्य आव्हान होते. भारत सरकारचे कृषी सचिव डॉ. पुरी यांनी बँकेशी सल्लामसलत करून त्या निर्बंधांमध्ये शिथिलता मिळवून दिली.यानंतर महाबीजने राज्यभर बियाणे उत्पादन कार्यक्रम सुरू केला. त्यासाठी शेतकऱ्यांना सुलभ अंतरावर बीजप्रक्रिया केंद्र उभारणे आवश्यक होते. याकरिता राज्य सरकारने कृषी संचालक श्री सुरेश कुमार यांचेमार्फत काही तालुका सीड फार्म महाबीजकडे हस्तांतरित केले. एनएसपी अंतर्गत बियाणे महामंडळासाठी उपकरणे खरेदी करण्याची जबाबदारी असलेल्या राष्ट्रीय बियाणे महामंडळाला जेएनपीटी बंदरावर प्राप्त झालेली उपकरणे महाबीजकडे हस्तांतरित करण्यात आली. महाबीजने हे देखील सुनिश्चित केले की नवीन संशोधन कमीत कमी वेळेत शेतकऱ्यांना उपलब्ध करून दिले जाईल. महाबीजने विविध तंत्रज्ञान आणि उपलब्ध पर्यायांचा अभ्यास करून एक अत्याधुनिक कापूस डिलिंटिंग प्लांट देखील उभारला होता. देशात स्थापन होणारा हा अशा प्रकारचा पहिला प्रकल्प होता. या प्रकल्पात सहभागी असलेल्या कर्मचाऱ्यांनी आपल्या कामांच्या सिमेपलीकडे जाऊन मेहनत घेतली आणि हे सिद्ध केले की महाबीज नवीनतम तंत्रज्ञान आत्मसात करण्यास आणि ते यशस्वीरित्या अंमलात आणण्यास सक्षम आहे. महाबीज अनेक बाबतीत अग्रणी स्थानावर होते आणि त्यामुळे हा ब्रँड विश्वासू बनला.खाजगी क्षेत्रातील बियाणे कंपन्या बियाणे संशोधनात उतरल्यापासून आणि त्यांच्या उत्पादनांचे मार्केटिंग प्रभावीपणे करणे सुरु झाल्यापासून महाबीजला स्पर्धा वाढली आहे. शेती, फलोत्पादन आणि दुग्धव्यवसायात महामंडळास उपलब्ध असलेल्या नवीन संधींचे परीक्षण करण्याची आवश्यकता आहे जेणेकरून महबीजची वाढ टिकून राहील आणि राज्यातील शेतकऱ्यांना सर्वोत्तम बियाणे उपलब्ध करून देता येईल.महाबीजच्या या दमदार टीमसाठी ही आव्हाने काही नवीन नाहीत आणि त्यामुळेच हा संघ या आव्हानांवर मात करेल असा मला विश्वास आहे. येत्या काळात महाबीजला भरघोस यश मिळावे अशी मी मनःपूर्वक शुभेच्छा देतो.



श्री. जे. पी. डांगे भा.प्र.से.
व्यवस्थापकीय संचालक (१९८६-१९८८)

# खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांची कंपनी ...

महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ अर्थात महाबीजची स्थापना दिनांक २८ एप्रिल, १९७६ रोजी शेतकरी बांधवांना बियाणे रास्त दरात व वेळेत उपलब्ध करण्याच्या उद्देशाने कंपनी कायदा, १९५६ अंतर्गत झाली असून महामंडळाच्या भाग भांडवलामध्ये महाराष्ट्र शासनाचा ४९%, राष्ट्रीय बीज निगम लिमिटेड यांचा ३५%, बिजोत्पादक शेतकरी यांचा १३% व कृषी विद्यापीठांचा ३% सहभाग आहे त्यामुळे महामंडळ खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांची बियाणे कंपनी म्हणून यथार्थ ठरते.


मी महाबीज संस्थेमध्ये दि. १० नोव्हेंबर, १९८६ ते १९ जून, १९८८ या कालावधीत व्यवस्थापकीय संचालक या पदाची धुरा समर्थपणे सांभाळून शेतकरी बांधव, भागधारक, बिजोत्पादक, महाबीज विक्रेते यांचे संबंधित योग्य निर्णय घेऊन या संस्थेचा आलेख वाढविण्याचा प्रयत्न केला. महाबीज आपले सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे करत असून या संस्थेमध्ये कार्य करण्याची संधी मला मिळाली हे मी माझे भाग्य समजतो.

या कालावधीत संकरित ज्वारी व सुधारित कापूस, भूईमुग, हरभरा, सुधारित सूर्यफुल या पिकांचे विविध वाणांचा बिजोत्पादन कार्यक्रम मोठ्या प्रमाणात राबवून राज्यातील शेतकरी बांधवांना गुणवत्तापूर्ण व दर्जेदार बियाणे उपलब्ध करुन राज्यातील शेतकऱ्यांची बियाणेची गरज भागविण्यात येऊन याव्दारे कृषी विकासास चालना मिळाली. महाबीजव्दारे या कालावधीत १४०० विक्रेत्यांमार्फत २.५२ लाख मात्रेच्या बियाणेची विक्री करुन रु. ३२८१ लाखांची उलाढाल झाली.

कृषी क्षेत्रातील उत्कृष्ट कार्याची ही उज्ज्वल परंपरा पुढेही अशीच सुरू राहो. भविष्यात महामंडळाला यशाचे नवे मापदंड प्रस्थापित करण्याची संधी मिळो. महाबीज परिवाराला त्यांच्या पुढील वाटचालीस असीम यश आणि समृद्धी लाभो, यासाठी माझ्या शुभेच्छा!



राष्ट्रीय उत्पादकता पुरस्कारासोबत मा. व्यवस्थापकीय संचालक श्री. जे. पी. डांगे (भा.प्र.से.)



श्री. अजितकुमार जैन भा.प्र.से.
व्यवस्थापकीय संचालक
(१९८९-१९९१)

# कृषी क्षेत्रातील उत्कृष्ट कार्याचा वारसा ...

सुवर्णमहोत्सवी वर्षात पदार्पण करीत असल्याबद्दल मी महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळाचे मनःपूर्वक अभिनंदन करतो! मागील ४९ वर्षाच्या दैदिप्यमान प्रवासात, राज्यात तसेच राज्याबाहेर कृषी क्षेत्रात झालेल्या समृध्दीमध्ये, महामंडळाने केलेल्या उल्लेखनिय योगदानाचा साक्षिदार असल्याचा मला सार्थ अभिमान आहे.

या संस्थेत ३५ वर्षापूर्वी व्यवस्थापकीय संचालक म्हणून काम करण्याचा मला बहुमान मिळाला. संस्थेच्या यशाचे रहस्य असलेली निष्ठा, नाविन्यपूर्ण दृष्टिकोन आणि समर्पित कार्यशैली पाहून मी प्रभावित झालो होतो आणि ती आठवण आजही माझ्या स्मरणात आहे. शेतकरी बांधवांना दर्जेदार आणि उच्च गुणवत्तेचे प्रमाणित बियाणे पुरवण्यासाठी महामंडळाने केलेले अथक प्रयत्न, कृषी उत्पादकता वाढविण्यात आणि अन्न सुरक्षा सुनिश्चित करण्यात अत्यंत महत्त्वाचे ठरले आहेत.

कृषी क्षेत्रातील उत्कृष्ट कार्याचा हा वारसा असाच वृद्धिंगत होत राहो आणि येणाऱ्या वर्षांमध्ये महामंडळाला अधिकाधिक यश मिळो, ही सदिच्छा व्यक्त करुन महाबीज परिवाराला भविष्यातील वाटचालीमध्ये निरंतर यश आणि समृद्धी प्राप्त होवो या शुभेच्छा देतो.



श्री. सुधीर कुमार गोयल भा.प्र.से.
अध्यक्ष, महाबीज (२०११-२०१५)

# कृषी क्षेत्रातील विश्वासार्ह मित्र ...

महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ एक सार्वजनिक उपक्रम म्हणून यशस्वी कामकाजाची पन्नास वर्षे पूर्ण करत असून हे आपल्या राज्याच्या इतिहासातील एक महत्त्वाचा टप्पा आहे. जेव्हा आपल्या देशातील बियाणे क्षेत्र अगदी प्राथमिक अवस्थेत होते, तेव्हा या महामंडळाची स्थापना झाली. या कालावधीत बियाणे क्षेत्रामध्ये खाजगी कंपन्या संघर्ष करत होत्या तर सार्वजनिक क्षेत्रातील बियाणे कंपन्या जवळपास अस्तित्वातच नव्हत्या.

महामंडळास स्थापनेपासून अत्यंत सक्षम व कार्य तत्पर व्यवस्थापकीय संचालक लाभल्याने महाबीज बाजारामध्ये शेतकऱ्यांसाठी एक अत्यंत विश्वासार्ह ब्रँड म्हणून स्थापित झाला आणि यातूनच महामंडळाशी एकनिष्ठ, प्रामाणिक व बियाणे गुणवत्तेची जाण असलेले बिजोत्पादक शेतकरी तयार झाले. यासोबतच गुणवत्तापूर्ण बियाणे निर्मितीमध्ये महाराष्ट्र राज्य बीज प्रमाणिकरण यंत्रणेने आपली नियामक व महत्वपूर्ण भूमिका पार पाडली. परिणामी, आजही महाबीज राज्यात आणि इतर राज्यांमध्ये बियाणे क्षेत्रात महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे.

महामंडळासमोर आगामी पंचवीस वर्षांचा अमृत काळ हा अत्यंत आव्हानात्मक असणार आहे. त्यामुळे महाबीजला शेतकऱ्यांच्या विविध अपेक्षांची पूर्तता करण्यासाठी डिजिटलायझेशन, परिशुद्ध शेती (Precision Farming), गट साखळी, माहिती तंत्रज्ञान, कृत्रिम बुध्दिमत्ता यांचा उपयोग करुन या क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर नाविन्य घडवणाऱ्या खाजगी क्षेत्रासोबत स्पर्धेत राहणे आवश्यक आहे.

महाबीज सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे करत असतांना आत्मपरिक्षण करण्याची आणि पुढील २५ वर्षांची योजना आखण्यासाठी एक योग्य वळण असून, याव्दारे ही संस्था उज्वल शिखरावर पोहोचेल आणि शेतकरी बांधव महाबीजकडे कृषी क्षेत्रातील सर्वात विश्वासार्ह मित्र म्हणून पाहत राहतील.

महामंडळाशी संबंधित सर्वांना वर्षभराच्या उत्सवांसाठी आणि आपल्या अत्यंत मेहनत करणाऱ्या शेतकऱ्यांच्या सेवेत नवे प्रयत्न करण्यासाठी माझ्या शुभेच्छा!



श्री. संजय उबाळे भा.प्र.से.
व्यवस्थापकीय संचालक (१९९१-१९९४)

# आव्हानातून यशस्वीतेचा सुवर्णप्रवास ...

महाबीज २०२६ मध्ये आपले सुवर्णमहोत्सवी वर्ष साजरे करत आहे ही माझ्यासाठी आणि महाबीज परिवारासाठी खरोखरच आनंदाची बाब आहे.

मी १९९१ ते १९९४ या काळात, सुमारे साडेतीन वर्षे या संस्थेचा व्यवस्थापकीय संचालक म्हणून कार्यभार पाहिला. माझ्या प्रशासकीय कारकिर्दीतील हा सर्वाधिक समाधान देणारा काळ होता. त्या वेळी महामंडळाची आर्थिक स्थिती अत्यंत बिकट होती आणि या परिस्थितीतून संस्थेला बाहेर काढणे हे माझ्यासमोरचे मोठे आव्हान होते. सन १९९०-९१ मध्ये महामंडळाची आर्थिक उलाढाल केवळ रु. २७५८ लाख होती ही उलाढाल सन १९९४-९५ मध्ये रु. ८८८४ लाख झाली असून यामध्ये जवळ-जवळ तिप्पट वाढ या कालावधीत झाली. या काळात आव्हानाचा समर्थपणे सामना करत महामंडळ उच्च गुणवत्तेच्या संकरित (Hybrid) आणि सरळ वाणांच्या (Straight variety) बियाण्यांच्या विक्री व्यवसायात मोठ्या प्रमाणावर वाढ करुन एक प्रमुख उत्पादक आणि वितरक बनले.

महाबीज परिवारातील सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे कामाप्रती असलेले समर्पण आणि निष्ठा खरोखरच अतुलनीय होती. माझ्या कार्यकाळात अनेक उल्लेखनीय व्यक्ती कार्यरत होत्या, जे आज आपल्यात नाहीत, परंतु त्यांनी एक समृद्ध आणि प्रेरणादायी वारसा मागे ठेवला आहे. महामंडळाच्या प्रगतीमध्ये श्री. आनंद मोरे, श्री. बळवंत खुळे, श्री. संजय खरे, डॉ. रमेश राऊत, श्री. आय. निकोलस आणि इतर अनेक सहकाऱ्यांचे मोलाचे योगदान मला आजही स्पष्टपणे आठवते.

मला महाबीजचे व्यवस्थापकीय संचालक म्हणून सेवा करण्याची संधी मिळाली, याबद्दल मी संस्थेचा मनःपूर्वक आभारी आहे.

महाबीज पुढीलवर्षी आपले सुवर्णमहोत्सवी वर्ष साजरे करत आहे, त्यानिमित्ताने या संस्थेला भविष्यात निरंतर यश मिळत राहो आणि शेतकरी बांधवांची समृद्धी वाढवण्याच्या त्यांच्या प्रयत्नांना माझ्या हार्दिक शुभेच्छा!





राष्ट्रीय उत्पादकता पुरस्कार स्वीकारतांना मा. व्यवस्थापकीय संचालक श्री. संजय उबाळे (भा.प्र.से)



श्री. बिजयकुमार सिन्हा भा.प्र.से.
अध्यक्ष, महाबीज (२०१६-२०१८) तथा
व्यवस्थापकीय संचालक (१९९४-१९९६)

# शेतकऱ्यांच्या प्रगतीचा भागीदार ...

बियाणे उद्योगात मानाचे स्थान प्राप्त केलेल्या महाबीजने गेल्या ४९ वर्षात राज्याच्या कृषी क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिले आहे. गुणवत्ता, पारदर्शक कार्यपद्धती आणि शेतकरी हित सर्वोपरी ठेवल्यामूळे महामंडळाने शेतकऱ्यांचा भक्कम विश्वास संपादन केला. त्यामुळे ख-या अर्थाने शेतकऱ्यांची कंपनी म्हणून महाबीजची एक वेगळी ओळख आहे.

महाबीज राज्यात व आवश्यकतेनुसार बाहेर राज्यात विविध पिक व वाणांचे बिजोत्पादन कार्यक्रम राबवून राज्यातील शेतकऱ्यांना गुणवत्तापूर्ण बियाण्यांची उपलब्धता सुनिश्चित करत असते. याचा परिणाम शेतक-यांच्या उत्पन्न वाढीत होतो. यामुळे महाबीज शेतक-यांच्या प्रगतीचा भागीदार बनला आहे.

सन १९९४ ते १९९६ मध्ये व्यवस्थापकीय संचालक आणि २०१६ ते २०१८ मध्ये प्रधान सचिव तथा अध्यक्ष, महाबीज म्हणून कार्यरत असतांना महाबीज सारख्या संस्थेच्या माध्यमातून राज्यातील शेतक-यांची सेवा करण्याची संधी मिळाली हे माझ्यासाठी भुषणावह आहे.

राज्यभर विस्तारलेल्या या संस्थेचे स्वत:चे इमारतीमध्ये मुख्यालय असणे आवश्यक असल्यामूळे डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापिठाचे परीसरातच त्यांचेकडून जागा संपादीत करुन सन १९९५-९६ मध्ये भुमीपूजन करण्यात आले. याशिवाय राष्ट्रीय बिज प्रकल्प-३ अंतर्गत नविन गोदामाचे बांधकाम, यंत्रसामुग्री बसविणे तसेच महामंडळ अधिक सक्षम करण्यासाठी भारत सरकार यांचेकडून प्राप्त अनूदानामधून बिज प्रक्रिया केंद्राचे आधुनिकीकरण, ऊती संवर्धन प्रयोगशाळा स्थापीत करुन संशोधन व विकास केंद्र व भाजीपाला बिज प्रक्रिया केंद्र उभारणी करण्यात आली.

कृषी उत्पन्न बाजार समितीचे दर व आधारभुत किंमत यामधील फरकाची रक्कम शासनाकडून बिजोत्पादकांना २०१७-१८ पासून प्राप्त होणे सुरु झाल्यामूळे बिजोत्पादकांना फायदा होउन राज्यात बिजोत्पादनास चालना मिळाली आहे.महामंडळामध्ये मेहनती आणि प्रामाणिकपणे झोकून काम करणारे असे अधिकारी कर्मचारी नेहमी कार्यरत राहिले आहेत. राज्य शासनाचादेखील नेहमी सकारात्मक पाठिंबा असतो. यामुळे महाबीज ही संस्था राज्यातील शेतकऱ्यांसाठी विश्वासार्हता, गुणवत्ता आणि सेवा या मूल्यांचा आदर्श बनली असून, आज ती सर्वोत्कृष्ट सेवा पुरवणाऱ्या अग्रगण्य संस्थांपैकी एक म्हणून ओळखली जाते. या उल्लेखनीय कार्याबद्दल महामंडळाचे मनःपूर्वक अभिनंदन! सुवर्ण महोत्सवी वर्षाकरीता हार्दिक सदिच्छा!



श्री. शिवाजीराव देशमुख भा.प्र.से.
अध्यक्ष, महाबीज (१९९९-२००२)

# गुणवत्तेच्या आधारावर अग्रगण्य संस्था ...

शेतकऱ्यांना रास्त दरात व वेळेत दर्जेदार व गुणवत्तापूर्ण बियाणे उपलब्ध करुन देण्यासाठी स्थापन झालेले महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ अर्थात महाबीज सुवर्ण महोत्सवी वर्षात पदार्पण करीत आहे याचा मला विशेष आनंद आहे.

मी महामंडळाचा अध्यक्ष म्हणून दिनांक १८ जून, १९९९ ते १७ जून, २००२ या कालावधीत ३ वर्षाकरिता हे पद भुषविले. त्यावेळेस प्रामुख्याने खरीप हंगामात सोयाबीन, धान व कापूस आणि रब्बी हंगामात हरभरा व गहू या बियाण्याचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर घेण्यात आले व शेतकरी बांधवांना या पिकांचे विविध वाणांचे गुणवत्तापूर्ण बियाणे उपलब्ध करण्यात आले.

महाबीज संशोधित अधिक उत्पादनशील संकरित ज्वारी महाबीज-७, संकरित कापूस महाबीज-२ व महाबीज-१०६ या वाणाचे बियाणे शेतकरी बांधवांना उपलब्ध करण्यात आले. महामंडळाने बीटी कापसाची निर्मिती व ऊती संवर्धनाव्दारे विविध पिकाच्या रोपांची निर्मिती प्रक्रियेस चालना देण्याकरिता नागपूर येथे जैवतंत्रज्ञान केंद्राची स्थापना देखील तेव्हा करण्यात आली. तसेच श्रीरामपूर (अहमदनगर) व मूल (चंद्रपूर) येथील गोदामांचे काम पूर्ण करण्यात आले.

भारतामध्ये महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ ही संस्था या क्षेत्रामध्ये गुणवत्तेच्या आधारावर अग्रस्थानी आहे आणि शेतकऱ्यांना उच्च प्रतिचे बियाणे योग्य दरात मिळावे यासाठी कटीबद्ध आहे. राज्याच्या बीज प्रमाणिकरण यंत्रणेच्या विविध कठोर चाचण्यांद्वारे प्रमाणित केलेले गुणवत्तापूर्ण बीज शेतकऱ्यांना दिले जाते. अर्थात राज्याची बीज प्रमाणिकरण यंत्रणा सुद्धा अतिशय कार्यक्षम असून, देशात नावाजलेली आहे. याशिवाय महामंडळाचा आणि बीज उत्पादक शेतकरी यांचा समन्वयक अतिशय उच्च प्रतीचा आहे. बीज उत्पादक शेतकऱ्यांना या महामंडळाचा अभिमान वाटतो. अशा महामंडळाचे अध्यक्षपद भूषविण्याची संधी मला मिळाली याचा मला जरूर अभिमान आहे.

सद्यस्थितीत महामंडळामार्फत विविध पिकांच्या १३० वाणांचे ५.५० लाख मात्रेचे दर्जेदार बियाणे राज्यातील शेतकरी बांधवांना रास्त दरात उपलब्ध करण्यात येत आहे. तसेच मागील २ दशकात पडलेली लक्षणीय भर म्हणजे जैविक खते, जैविक बुरशीनाशक, ऊती संवर्धित केळी, संकरित पपई व रोपवाटीकेतील विक्रीत झालेली लक्षणीय वाढ. ही बाब महामंडळाकरिता अत्यंत कौतुकास्पद असून पर्यावरण रक्षणाच्या दृष्टीनेदेखील महत्त्वपूर्ण आहे. भविष्यातही महामंडळाची अशीच उत्तरोत्तर प्रगती होऊन यशाची नवी शिखरे महामंडळाने गाठावी यासाठी मी मनःपूर्वक शुभेच्छा देतो.



श्री. प्रदीप व्यास भा.प्र.से.
व्यवस्थापकीय संचालक (१९९८-२००२)

# शेतकरी सेवेचे पाच दशक ...

महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित (महाबीज) हे राज्यातील शेतकरी बांधवांकरीता अविरत कार्यरत असलेले शासन अंगीकृत उपक्रम लवकरच त्यांच्या स्थापनेची ५० वर्षे पूर्ण करीत असून, त्यानिमित्ताने सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरा करत आहे, हे जाणून मला खूप आनंद झाला.

महाबीजने गेल्या अनेक दशकांपासून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या जीवनात खूप महत्त्वाची भूमिका बजावली आहे. अनेक पिकांच्या बीजोत्पादनामध्ये त्यांचा मोठा वाटा होता आणि त्यामुळे बियाण्यांच्या किंमती नियंत्रित राहिल्यामुळे शेतकऱ्यांना फायदा झाला. महाबीजने कधीही केवळ नफा मिळवण्याचा हेतू ठेवला नाही आणि नेहमीच भात आणि भुईमूग यासारख्या पिकांसाठी योग्य वेळी आणि वाजवी दरात दर्जेदार बियाणे उपलब्ध करून दिले, जिथे जास्त साठवणूक क्षमतेची आवश्यकता आणि कमी नफ्यामुळे फार कमी कंपन्या व्यवहार करतात.

मी १९९८ ते २००२ या काळात ४ वर्षांहून अधिक काळ महाबीजचे व्यवस्थापकीय संचालक म्हणून काम केले. कदाचित महाबीजच्या इतिहासात सर्वात जास्त काळ व्यवस्थापकीय संचालक म्हणून काम केले. या कालावधीत अनेक नवीन पिकांचे बियाणे उत्पादन सुरू केले आणि वाढवले, टिश्यू कल्चर लॅबचा विस्तार करण्यात आला आणि राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा, पुणे आणि केंद्रीय कापूस संशोधन संस्था, नागपूर यांच्यासोबत नवीन संशोधन प्रकल्प हाती घेण्यात आले. त्यानंतर, यापैकी काही तंत्रज्ञानाचे व्यावसायिकीकरण देखील करण्यात आले. अकोला येथील ऐतिहासिक प्रशासकीय इमारत पूर्ण झाली आणि त्या काळात ती एक उत्तम आकर्षण होती.

महाबीजचे व्यवस्थापकीय संचालक म्हणून काम करण्याच्या माझ्या खूप आठवणी आहेत, ज्यामुळे मला महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात आणि जिल्ह्यांमध्ये प्रवास करण्याची आणि शेतकऱ्यांशी संवाद साधण्याची संधी मिळाली. महाबीजला त्यांच्या भविष्यातील कार्य व प्रयत्नांसाठी माझ्या खूप खूप मन:पूर्वक शुभेच्छा..






भात बिजोत्पादन कार्यक्रमाची पाहणी करतांना व शेती कार्यशाळा दरम्यान उपस्थित
व्यवस्थापकीय संचालक मा. श्री. प्रदीप व्यास (भा.प्र.से.)



**श्री. अनूप कुमार** भा.प्र.से.
अध्यक्ष, महाबीज (२०२३-२०२४) तथा
व्यवस्थापकीय संचालक (२००४-२००६)

# आयुष्यातील अविस्मरणीय कालखंड ...

महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ येत्या २८ एप्रिल, २०२५ रोजी आपल्या स्थापनाचे ४९ वर्ष पूर्ण करून सुवर्ण महोत्सवाकडे यशस्वी वाटचाल करीत आहे. ही बाब मला मनस्वी आनंद देणारी आहे. महाबीजमार्फत यावर्षीचे वर्धापन दिनापासून वर्षभर विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. याबाबत महाबीजचे अध्यक्ष, व्यवस्थापकीय संचालक, संचालक मंडळ, सर्व शेतकरी, भागधारक, बिजोत्पादक कुटुंब, महाबीज विक्रेते व सर्व अधिकारी/ कर्मचारी यांना मी मन:पूर्वक शुभेच्छा देतो.

मला आवर्जून आठवते की, मी महाबीजचा व्यस्थापकीय संचालक म्हणून वर्ष २००४ ते २००६ या कालावधीत कार्यरत असतांना महाबीज स्थापनाचे ३० वर्ष पूर्ण झाले होते आणि त्यावेळी तीन दशक विश्वासाचे हे ब्रीदवाक्य ठेऊन महाबीज ब्रँड नावाने राज्यभर मोठी मोहीम मी राबविली होती. व्यवस्थापकीय संचालक श्री. योगेश कुंभेजकर यांचेकडून माझी मोठी अपेक्षा आहे की, देशाचे सर्व सार्वजनिक बियाणे महामंडळमध्ये प्रथम क्रमांकावर असलेल्या आपल्या बियाणे महामंडळाची उलाढाल, बिजोत्पादन व विक्री व बाजार हिस्स्यात वृद्धी करून देशातील सर्वश्रेष्ठ राज्य बियाणे महामंडळचा लौकिक कायम ठेवावा. हवामान बदलामुळे शेती क्षेत्रात अनेक आव्हाने उभी असून त्याचे विपरीत प्रभावापासून शेतकऱ्यांचे संरक्षण करण्यासाठी महाबीज हवामान अनुकूल वाण प्रसारित करीत आहे. पर्जन्यमानाचे बदलते चक्र आणि पावसाचा अनिश्चितपणा दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे  विशेष करून कडधान्य पिकांमध्ये कृषी विद्यापीठांनी उपयुक्त संशोधन करून महाबीजचे माध्यमातून नवीन वाण प्रसारित करणे गरजेचे आहे. तसेच जागतिक कारणामुळे सोयाबीनला शेतकऱ्यांना अपेक्षित भाव मिळत नसल्यामुळे मका पिकाचे नवीन वाण प्रसारित करणे आवश्यक आहे. गळीत धान्यामध्ये देखील अपारंपरिक तेलबियांचे उदा. करडई, जवस, तीळ व एरंडी यासारख्या पिकांचे जास्त उत्पादन देणारे वाण शेतकऱ्यांना उपलब्ध करणे आवश्यक आहे .खाजगी कंपन्यानी बियाणे बाजारात कितीही प्रयत्न करून देखील शेतक-यांचा महाबीजविषयी आजही उत्साह व विश्वास कायम आहे व हा विश्वास व आपुलकी कायम टिकून ठेवणे महाबीजपूढे मोठे आव्हान आहे. या शताब्दीच्या सुरुवातीमध्ये महाबीजचे व्यवस्थापकीय संचालक पदावर असतांना महाबीजचे प्रशासकीय नेतृत्व करण्याची संधी मला मिळाली, त्याला मी माझे आयुष्यातील अविस्मरणीय कालखंड समजतो. त्याचवेळी महाबीजचा निव्वळ नफा वाढविण्यासाठी अनेक प्रयत्न केले. यामध्ये महाबीजचे अधिकारी आणि क्षेत्रीय यंत्रणांनी अत्यंत मोलाचे योगदान दिले. भाजीपाला व बीटी कापूस बियाण्यांमूळे महाबीजला राष्ट्रीय ओळख निर्माण झाली.  मागील वीस वर्षामध्ये अनेक बदल घडले आहेत. तरी महाबीजची शेतकऱ्यांमध्ये असलेली विश्वासार्हता अजूनही टिकून आहे.  महाबीज त्याचा पुरेपुर उपयोग करून पुढील वर्षी आपली चौफेर प्रगती करावी याची मी मनापासून शुभेच्छा देतो.



मा. श्री एकनाथराव डवले भा.प्र.से.
अध्यक्ष, महाबीज (२०१८-२०२३)

# गुणवत्तेचे प्रतीक महाबीज ...

राज्यातील शेतकऱ्यांना दर्जेदार बियाणे वाजवी दरात उपलब्ध करुन देण्याचे हेतूने जागतिक बँकेच्या आर्थ सहाय्याने "राष्ट्रीय बियाणे प्रकल्पा" अंतर्गत 28 एप्रिल 1976 रोजी अकोला येथे महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळाची स्थापना करण्यात आली. गेल्या 49 वर्षांमध्ये महाबीजने बियाणे उद्योगात आपले विशेष स्थान निर्माण करत राज्यातील कृषी क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. उच्च गुणवत्ता, पारदर्शक कार्यपद्धती आणि शेतकऱ्यांप्रती असलेली बांधीलकी यामूळे महाबीजने शेतकऱ्यांचा विश्वास सार्थ केला आहे. राज्यातील शेतकरी बांधवांची बियाणे गरज ही राज्यातच बिजोत्पादन कार्यक्रमाच्या माध्यमातून पूर्ण करण्यास महाबीजने नेहमीच प्राधान्य दिले आहे. यामूळे शेतक-यांची आर्थिक प्रगती होउन राज्याची कृषी अर्थव्यवस्था अधिक सक्षम बनण्यास मदत झाली आहे.

कोरोना महामारी यासारख्या आव्हानात्मक काळात सुध्दा बिजोत्पादन कार्यक्रमामतून प्राप्त बियाणे प्रक्रिया करुन राज्यातील शेतकरी बांधवांना महामंडळामार्फत वेळेत उपलब्ध करण्यात आले. याकरीता महाबीज व्यवस्थापन आणि कर्मचारी खरोखरच अभिनंदनास पात्र आहेत. लागोपाठ तिन वर्ष परतीच्या पावसामूळे सोयाबीन बियाणे गुणवत्तेवर विपरीत परीमाण होउन सोयाबीन बियाणे उपलब्धतेत लक्षणीय घट झाली. परंतू तरीसुध्दा महाबीजने बियाणे गुणवत्तेबाबत कोणत्याही प्रकारची तडजोड न करता राज्यातील शेतक-यांना गुणवत्तापूर्ण बियाणे उपलब्ध करुन दिले आहे. यावरुन महाबीज शेतक-याकरीता किती संवेदनशिल आहे याची प्रचिती येते. बियाण्यासोबतच महाबीजने जैविक उत्पादने, ऊती संवर्धन तसेच रोपवाटीका या क्षेत्रात सुध्दा व्यवसाय विस्तार केला असून ही अभिमानाची बाब आहे. महामंडळाच्या या आजपर्यंतच्या सुवर्ण महोत्सवी प्रवासात राज्यातील शेतकरी, बिजोत्पादक, महाबीज भागधारक, महाबीज अधिकृत विक्रेते व महाबीज कर्मचारी यांचे भरीव योगदान आहे. या संस्थेची अशीच उत्तोरोत्तर प्रगती होत राहो व त्यांचे माध्यमातून शेतक-यांची सुध्दा आर्थिक उन्नती होवो अशी सदिच्छा व्यक्त करुन महामंडळास सुवर्ण महोत्सवी वर्षानिमीत्त हार्दिक शुभेच्छा देतो.!





श्री. सौरभ विजय भा.प्र.से.
व्यवस्थापकीय संचालक (२००६-२०१०)

# विश्वासार्हता व सर्वोत्कृष्ट सेवा ...

राज्यातील शेतकऱ्यांची दर्जेदार बियाण्याची गरज लक्षात घेउन जागतिक बँकेच्या आर्थिक सहाय्याने "राष्ट्रीय बियाणे प्रकल्प" अंतर्गत महाराष्ट्र शासनाने २८ एप्रिल १९७६ रोजी अकोला येथे महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळाची स्थापना केली. बियाणे उद्योगात महत्त्वपूर्ण स्थान प्राप्त केलेल्या महाबीजने मागील ४९ वर्षांत कृषी क्षेत्रात लक्षणीय योगदान दिले असून दरवर्षी राज्यात तसेच इतर राज्यांमध्ये विविध पिक/वाणांचा बीजोत्पादन कार्यक्रम राबवून राज्यातील शेतकऱ्यांची प्रामुख्याने प्रमाणित बियाण्याची गरज पूर्ण करण्याचा सदैव प्रयत्न केला आहे. या दर्जेदार बियाण्यांच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होऊन राज्याच्या कृषी अर्थव्यवस्थेला बळकटी मिळाली आहे. या कार्यामुळे शेतकरी बांधवांचा महाबीजवरील विश्वास अधिक दृढ होउन अद्यापही कायम आहे.

महाबीजमध्ये व्यवस्थापकीय संचालक म्हणून कार्यरत असतांना केंद्र शासनाकडून प्राप्त अनुदानामधून वाशिम येथे अत्याधुनिक बिज प्रक्रिया केंद्राची उभारणी, जालना बिज प्रक्रिया केंद्राच्या प्रांगणात ८,००० क्विं. साठवणूक क्षमतेच्या व बुटीबोरी येथे १५,००० क्विं. क्षमतेच्या गोदामाचे बांधकाम तसेच राष्ट्रीय फलोत्पादन अभियाना अंतर्गत प्राप्त अनुदानामधून अत्याधुनिक भाजीपाला बिज प्रक्रिया केंद्राची उभारणी करण्यात आली. भारत सरकारच्या ग्रामीण बिजोत्पादन कार्यक्रमा अंतर्गत कृषी विभाग व महाराष्ट्र शासन यांना महामंडळाने राज्यात एकूण २० बिज गुणन केंद्रावर रु. ३० लक्ष अनुदानामधून छोटया बिज प्रक्रिया केंद्राची उभारणी करुन दिली. मा. पंतप्रधान पॅकेज अंतर्गत विदर्भातील ६ जिल्हयातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांना ३ वर्षाकरीता ५०% अनुदानावर बियाणे वाटप, बिजोत्पादकांना प्रोत्साहीत करण्याकरीता ग्राम बिजोत्पादन योजनेंतर्गत बिजोत्पादन ग्राम पुरस्कार योजना राबवून बिजोत्पादकांना मोठ्या प्रमाणात आर्थिक लाभ झाला. एकंदरीत महाबीजमार्फत राज्यातील शेतकरी बांधवांची सेवा करण्याची संधी मिळाली याचा मला सार्थ अभिमान आहे. सद्यस्थितीत, बियाणे व्यवसायाबरोबरच महाबीजने जैविक उत्पादने, ऊती संवर्धन, तसेच रोपवाटीका व्यवसायात आघाडी घेवून व्यवसाय विस्तार केला आहे. शेतकऱ्यांच्या गरजांना प्राधान्य देत उच्च गुणवत्तेच्या कृषी निविष्ठा पुरवण्याचे महाबीजचे कार्य आज राज्यात वेगळे स्थान निर्माण करणारे ठरले आहे. केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांचा लाभ थेट शेतकरी व बीजोत्पादकांपर्यंत पोहोचवून महाबीजने कृषी क्षेत्रात उत्तम सेवा प्रदान केली आहे. त्यामुळे महाबीज ही संस्था आज राज्यातील शेतकऱ्यांसाठी विश्वासार्ह आणि सर्वोत्कृष्ट सेवा पुरवणारी अग्रगण्य संस्था बनली आहे. महाबीजच्या या यशस्वी वाटचालीत राज्यातील शेतकरी बांधव, बिजोत्पादक, भागधारक, महाबीज अधिकृत विक्रेते तसेच महाबीज कर्मचारी यांचा मोलाचा वाटा असून भविष्यात सुध्दा महाबीजची अशीच उत्तरोत्तर प्रगती होऊन या संस्थेच्या माध्यमातून शेतकरी बांधवांचे जीवनात संपन्नता येवो, हीच महाबीज सुवर्ण महोत्सवानिमीत्त हार्दिक शुभेच्छा...!



डॉ. शा. द. वानखेडे भा.प्र.से.
व्यवस्थापकीय संचालक (२०१३-२०१४)

# शेतकरीभीमुख बियाणे उद्योग ...

आपल्या देशात बियाणे उद्योगाची सुरुवात झाल्यानंतर त्याचाच एक भाग म्हणून राष्ट्रीय बियाणे महामंडळाची स्थापना १९ मार्च, १९६३ रोजी झाली व त्या पाठोपाठ 'राष्ट्रीय बियाणे प्रकल्प' अंतर्गत महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळाची स्थापना दि. २८ एप्रिल, १९७६ रोजी झाली. आपले महामंडळाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे हे बाब खरोखरच अति आनंददायी आहे.

महाबीजने राज्यातील नव्हे तर देशातील विविध राज्यातील शेतकऱ्यांसोबत विश्वासाच्या नात्याची निर्मिती करून "विश्वासाचे बियाणे" हे ब्रीदवाक्य खरे करून दाखविले आहे. महामंडळाचा बियाणे उद्योग हा खऱ्या अर्थाने शेतकरी भिमुख आहे. "बियाणे उत्पादन करणारा" व "बियाणे चा वापर करणारा" अशा या उद्योगाच्या दोन्ही बाजूंनी शेतकरीच आहे. बियाणे उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्याला बियाणासाठी योग्य किंमत देणे व त्याचवेळी वापर करणाऱ्या शेतकऱ्यांना वाजवी दरात व वेळेत बियाणे उपलब्ध करून देण्याची कसरत महाबीजला करावी लागते. बियाण्याचे दर योग्य ठेऊन अप्रत्यक्षपणे खाजगी क्षेत्रातील बियाण्याच्या दरावरही काही प्रमाणात नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी महाबीज गेले ४९ वर्षापासून यशस्वीपणे पार पाडत आहे. राज्यातील सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांपैकी नफ्यामध्ये असणाऱ्या काही मोजक्या कंपन्यांमध्ये महाबीज ची गणना होते ही अभिमानाची बाब आहे.

अशा या प्रतिष्ठित महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक या पदावर कार्य करण्याचे भाग्य मला लाभले. या एका वर्षाच्या कालावधीत महामंडळाने आपले काही पिकाच्या बियाणेवरील अवलंबित्व कमी करून 'भाजीपाला पिके', 'चारा पिके' इत्यादी मधील वाटा वाढवण्याची गरज ओळखून त्या दृष्टीने नियोजन केले. कापूस पिकात बीटी तंत्रज्ञानाचा वापर सुरु झाल्यापासून बीटी कापूस पूर्णपणे खाजगी क्षेत्रातील बियाणे कंपन्यांच्या नियंत्रणात गेला ही बाब लक्षात ठेवून कृषी विद्यापीठे, शासकीय नियंत्रणातील कापूस संशोधन केंद्र यांनी विकसित केलेल्या संकरित कापसाच्या प्रसिद्ध जातीमध्ये "बी टी" जनुक अंतर्भूत करण्यासाठी लागणारी तांत्रिक, वैज्ञानिक, प्रशासकीय, आर्थिक व्यवस्था मी माझ्या कार्यकाळात महाबीज मध्ये सुरु करू शकलो यासाठी लागणाऱ्या विविध मान्यता मिळवणारी व प्रत्यक्षात सार्वजनिक क्षेत्रातील संशोधित "बीटी" संकरित वाण बाजारात आणणारी महाबीज देशातील सार्वजनिक क्षेत्रातील एकमेव कंपनी ठरली याचा मला आनंद वाटतो. या निमित्ताने निर्माण झालेल्या पायाभूत सुविधांचा वापर अद्यापही केल्या जात आहे. भविष्यातही महाबीज शेतकऱ्यांसाठी दर्जेदार बियाणे वाजवी दरात उपलब्ध करून व शेतकरी बांधवांना अनेक प्रकारच्या कृषी सेवा देऊन शेतकऱ्यांचे आर्थिकस्थिती उंचावेल अशी अपेक्षा करून महाबीजला, त्यांचे सन्माननीय भागीदार, शेतकरी बांधव, बीजोत्पादक, महाबीज अधिकृत विक्रेते व महाबीज कर्मचारी यांना पुढील वाटचाली साठी मनःपूर्वक शुभेच्छा....



श्री. परिमल सिंह भा.प्र.से.
व्यवस्थापकीय संचालक (२०१०-२०११)

# सामाजिक बांधिलकी जपणारी संस्था ...

महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळाचे सुवर्ण महोत्सवी वर्षात पदार्पण हा एक अत्यंत अभिमानास्पद क्षण आहे. या पाच दशकांमध्ये महामंडळाने शेतकरी बांधवांना दर्जेदार बियाणे रास्त दरात व वेळेत उपलब्ध केले आहे आणि खऱ्या अर्थाने ही एक सामाजिक बांधिलकी आहे. मला या संस्थेच्या माध्यमातून राज्यातील कृषी क्षेत्रात सेवा करण्याची संधी मिळाली ही माझ्याकरिता गौरवास्पद बाब आहे. या विशेष प्रसंगी मी महाबीज परिवारास मनःपूर्वक शुभेच्छा देतो. महाबीजच्या यशस्वी तसेच सुवर्ण महोत्सवी प्रवासात काही महत्त्वपूर्ण बाबींचा उल्लेख करणे आवश्यक आहे.

■ काळाची गरज, बदलते हवामान आणि शेतकरी बांधवांची गरज लक्षात घेऊन महाबीजने अधिक उत्पादनशिल वाणांचे दर्जेदार बियाणे नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करून वेळेत उपलब्ध केल्यामुळे शेतकऱ्यांना अधिक उत्पादन मिळण्यास मदत झाली आहे.

■ दर्जेदार बियाणे सोबतच महामंडळाने गुणवत्तापूर्ण जैविक उत्पादने, ऊती संवर्धित केळी व बांबू रोपे, रोपवाटिका यांचे व्यवसायातही विस्तार केला आहे.

■ शेतकरी आणि बिजोत्पादकांसोबतचे संबंध हे महाबीजच्या यशाचे मुख्य आधारस्तंभ आहेत. या संबंधांमुळे शेतकऱ्यांना विश्वासार्ह सेवा मिळाली आहे. महामंडळाने गुणवत्तापूर्ण बियाणे रास्त दरात उपलब्ध करून दिल्यामुळे बाजारातील दर नियंत्रणात ठेवण्यात यश मिळाले आहे.

■ महाबीजचे कर्मचारी प्रामाणिकपणे, निष्ठेने आणि पुर्ण कार्यक्षमतेने काम करत असल्यामुळे संस्थेचा आलेख सतत उंचावत आहे.

■ महामंडळाने आपल्या व्यवस्थापनात प्रामाणिकपणा आणि पारदर्शकतेचे पालन केले आहे, ज्यामुळे शेतकऱ्यांचा विश्वास जिंकण्यात यश मिळाले आहे. महाबीजच्या कार्यामुळे महाराष्ट्रातील कृषी विकासाला चालना मिळाली असून, ही संस्था सर्वांसाठी अभिमानाचा विषय बनली आहे. महामंडळाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त व पुढील वाटचालीसाठी माझ्या हार्दिक शुभेच्छा!







ॲड. अरुण उन्हाळे भा.प्र.से.
व्यवस्थापकीय संचालक (२०१५-२०१६)

# शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी भरीव योगदान ...

शासन सेवेत कार्यरत असतांना दि. १६ जानेवारी, २०१५ रोजी महाबीज या शेतक-यांसाठी काम करणा-या संस्थेत नेमणुक झाली व मी कृषी पदवीधर असल्याने मला शेतक-यांच्या कल्याणासाठी काम करण्याची सुवर्ण संधी प्राप्त झाली. महामंडळातील काम करण्याची पारदर्शक पध्दती व शेतक-यांकरीता अहोरात्र झटण्याची येथील कर्मचा-यांची वृत्ती या सर्व बाबी जास्तीत जास्त बियाणे उपलब्धतेसाठी विचारात घेवुन मी सुध्दा महामंडळाच्या कामात स्वत:ला झोकुन दिले. महामंडळाची स्थापना २८ एप्रिल, १९७६ रोजी झालेली असून, विविध पीकांचे बियाण्याचे मोठया प्रमाणात उत्पादन घेवुन खरीप/रब्बी हंगामात विहीत वेळेत शेतक-यांना त्यांच्या गरजेनुसार रास्त दरात बियाणे उपलब्ध करण्याचा कसोशीने प्रयत्न केला. तसेच राज्य व केंद्र शासनाच्या विविध संकल्पना, अनुदान योजना याचा जास्तीत जास्त फायदा बिजोत्पादक व शेतकरी वर्ग यांना मिळण्यासाठी नियमीत पाठपुरावा केला. जेणेकरुन बिजोत्पादकांना सुध्दा रास्त दर मिळाला तथा राज्यातील शेतक-यांना सुध्दा रास्त दरात बियाणे मिळाले. महाबीजमार्फत पहिल्यांदा राजस्थान राज्य बियाणे महामंडळाकडुन सोयाबीन बियाण्याची बारटर पध्दतीने (वस्तुची वस्तुसोबत अदलाबदल) महाराष्ट्रासाठी आवश्यक असणारे सोयाबीन जेएस- ९५६० बियाणे घेवुन, त्याबदलात त्यांना सोयाबीन जेएस-३३५ या वाणाचे महाबीजकडे असणारे अतिरिक्त बियाणे पुरवठा करुन उलाढाल वाढविली. तसेच पंजाब कृषी विद्यापीठ, लुधीयाना यांचेसोबत करारनामा करुन त्यांचे संशोधित संकरीत मक्याचे बिजोत्पादन करुन त्यांना पुरवठा केला व महाबीजच्या उलाढालीत हातभार लागला. तसेच ओरिसा राज्यात लागणारे भुईमुग TAG-२४ बियाणे आंध्र प्रदेश राज्यात उत्पादीत करुन ओडीसा शासनास पुरवठा केला. यामुळे बाहय राज्यातील बियाणे विक्रीमध्ये लक्षणीय वाढ झाली.

महामंडळाचे बियाणे व इतर उत्पादनांचा प्रचार व प्रसार करण्यासाठी आकाशवाणी, दुरदर्शन वाहीनी तसेच इतर सामाजिक माध्यमांचा प्रभावीपणे वापर केल्यामुळे बियाणे विक्री वाढण्यास मदत झाली. सन २०१६ मध्ये महामंडळात प्रथमच "महाराष्ट्र परीक्षा परीषद" मार्फत कर्मचाऱ्यांची भरती करुन प्रशासकीय सुधारणा करण्याचा प्रयत्न केला.

याशिवाय महामंडळामार्फत केंद्र शासन व राज्य शासनाच्या विविध योजनांचा प्रत्यक्ष लाभ राज्यातील शेतकरी व बिजोत्पाकांना देवून सर्वोत्तम सेवा प्रदान करण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यामूळे राज्यातील शेतक-यांचा महाबीज वरील विश्वास अधिकाधिक दृढ झालेला आहे. सोबतच महामंडळाचे बिजोत्पादक, शेतकरी, भागधारक व महाबीज विक्रेते यांच्या उन्नतीसाठी व प्रगतीसाठी केलेल्या भरीव योगदानाबद्दल महाबीज ही संस्था खरोखरच अभिनंदनास पात्र आहे. महाबीजची उत्तरोत्तर प्रगती होवुन या संस्थेच्या माध्यमातुन शेतकरी बांधवांच्या जीवनात संपन्नता येवो हिच सदीच्छा आणि संस्थेला सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा.



श्री. ओमप्रकाश देशमुख भा.प्र.से.
व्यवस्थापकीय संचालक (२०१७-२०१८)

# शेतकरीहितास सर्वोच्च प्राधान्य ...

राज्यातील शेतकऱ्यांना दर्जेदार बियाणे वेळेवर आणि वाजवी दरात उपलब्ध करुन देण्याकरीता जागतिक बँकेच्या आर्थिक सहाय्याने "राष्ट्रीय बियाणे प्रकल्प" अंतर्गत राज्य शासनाने २८ एप्रिल, १९७६ रोजी अकोला येथे महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळाची स्थापना केली. बियाणे उद्योगात महत्वाचे स्थान असलेल्या महाबीजने मागील ४९ वर्षात कृषी क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिले असून, शेतकऱ्यांचा विश्वास संपादन केला आहे. दरवर्षी महामंडळामार्फत राज्यात व बाहेर राज्यात विविध पिक/वाणांचा बिजोत्पादन कार्यक्रम राबवून शेतकऱ्यांची गुणवत्तापूर्ण बियाण्याची गरज भागविली जाते. दर्जेदार बियाण्यामुळे शेतकरी बांधवांच्या उत्पन्नात भर पडून कृषी अर्थव्यवस्थेला चालना मिळाली आहे. या कार्यामुळे शेतकरी बांधवांचा महाबीजवरील विश्वास अधिक दृढ झाला आहे.

बियाणे व्यवसायाबरोबरच महाबीजने जैविक खते, जैविक बुरशीनाशके, ऊती संवर्धीत केळी, बांबू, संकरित पपई रोपे, तसेच फुलझाडे व फळझाडांची रोपे शेतकऱ्यांना रास्त दरात उपलब्ध करून देण्यात आघाडी घेतली आहे. शेतकऱ्यांच्या गरजांना प्राधान्य देत उच्च गुणवत्तेच्या कृषी निविष्ठा पुरवण्याचे महाबीजचे कार्य आज राज्यात वेगळे स्थान निर्माण करणारे ठरले आहे. व्यवस्थापकीय संचालक असतांना एक प्रगतीचे पाउल म्हणून महाबीज मुख्यालय, अकोला येथे सौर उर्जा पॅनल तसेच भाजीपाला बिज प्रक्रिया केंद्र, एम.आय.डी.सी., शिवणी येथे पायाभूत, मुलभूत व भाजीपाला बियाणे साठवणुकीकरीता सौर उर्जेवर चालणारे वातानुकुलीत व आर्द्रता विरहीत गोदाम उभारणीच्या प्रकल्पाचे काम पूर्ण झाले.

महाबीज जैविक बुरशीनाशक ट्रायकोडर्मा उत्पादनाकरीता तात्पूरती असलेली मान्यता केंद्रीय किटकनाशक मंडळ (CIB) फरीदाबाद यांचेकडून कायमस्वरुपी मिळाली. अकोला येथील गुणवत्ता नियंत्रण प्रयोगशाळेस ISTA (International Seed Testing Association) या आंतरराष्ट्रीय संस्थेचे सदस्यत्व प्राप्त झाले. स्कॉच ग्रुप, नवी दिल्ली यांचे Skoch Blue Economy Awards 2017 चे "ऑर्डर ऑफ मेरीट" पारितोषीक महाबीजला प्राप्त झाले.

महामंडळामार्फत गुणवत्ता नियंत्रण व संशोधनाचे कार्यास्तव ६० एकर जमीन भाडे तत्वावर घेण्यात येत होती. परंतू महाबीजच्या पैलपाडा येथील ५७ एकर प्रक्षेत्रावर केंद्र शासनाकडून प्राप्त अनुदानामधून विविध पायाभुत सुविधा निर्माण करुन गुणवत्ता नियंत्रण व संशोधनाचे कार्य सदर प्रक्षेत्रावर सुरु करुन महाबीज सेंटर ऑफ एक्सलन्स ची मुहूर्तमेढ रोहण्यात आली. एकंदरीत धोरणात्मक निर्णयामुळे २०१७-१८ या आर्थिक वर्षात एकुण ५७० कोटी रकमेची आर्थिक उलाढाल झाली. भविष्यात सुध्दा महाबीजची अशीच उत्तरोत्तर प्रगती होऊन या संस्थेच्या माध्यमातून शेतकरी बंधू-भगिनींचे जीवनात संपन्नता येवो, हीच महाबीज सुवर्ण महोत्सवानिमीत्त हार्दिक शुभेच्छा...।



श्री. आर. व्ही. गमे भा.प्र.से.
व्यवस्थापकीय संचालक (२०१६-२०१७)

# शेतकऱ्यांच्या प्रगतीस कटीबद्ध ...

महाबीजच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या या ऐतिहासिक क्षणी, मी आपणा सर्वांना प्रथमः मनःपूर्वक शुभेच्छा देतो. शेतकरी बांधवांच्या समृद्धीसाठी दर्जेदार बियाणे पुरवठा करण्याच्या उदात्त हेतूने स्थापन झालेल्या महाबीजने गेल्या ५० वर्षात कृषी क्षेत्रात उल्लेखनिय योगदान दिले आहे. मी महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ अर्थात महाबीजच्या व्यवस्थापकीय संचालक या पदावर दिनांक ६ जून, २०१६ ते २ जून, २०१७ या कालावधीत कार्यरत होतो. माझ्या कार्यकाळात म्हणजेच सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात, महाबीजने रु. ७२४ कोटींची सर्वोच्च उलाढाल नोंदवली, ही कामगिरी महामंडळाच्या इतिहासातील एक महत्त्वपूर्ण आर्थिक यश असून अभिमानास्पद बाब आहे.

सन २०१६-२०१७ च्या खरीप हंगामात ७.५७ लाख क्विं. व रब्बी हंगामात ३.२४ क्विं. गुणवत्तापूर्ण व प्रमाणित बियाणे शेतकरी बांधवांना उपलब्ध करण्यात येऊन खरीप हंगामात सोयाबीनच्या १००% बियाणेची विक्रीही साध्य करण्यात आली. शेतकरी बांधवांना आधुनिक कृषी तंत्रज्ञानाची माहिती देण्यासाठी आणि त्यांच्या ज्ञानात भर घालण्यासाठी पंजाब कृषी विद्यापीठ, लुधियाना आणि अमृतसर येथे २५० शेतकऱ्यांसाठी शैक्षणिक सहलीचे यशस्वी आयोजन करण्यात आले. तसेच महाबीज संशोधित अधिक उत्पादनशील संकरित मका उदय, मूग उत्कर्षा आणि संकरित बाजरी महाबीज-१००५ यांसारख्या लोकप्रिय वाणांची निर्मिती करण्यात आली.

राष्ट्रीय कृषी विकास योजने अंतर्गत सौरऊर्जेवर आधारित वातानुकूलित गोदाम उभारणीसाठी पाठपुरावा केला, ज्यामुळे बियाणे साठवणूक क्षमता वाढली. महाबीज राज्याच्या कृषी विकासात मोलाची भूमिका बजावत असून या यशात राज्यातील शेतकरीबांधव, बिजोत्पादक, भागधारक, महाबीज अधिकृत विक्रेते आणि महाबीज अधिकारी/कर्मचारी यांचे मोलाचे योगदान आहे. भविष्यात महाबीज शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी कटिबद्ध राहून उत्तरोत्तर प्रगती करेल हीच या सुवर्ण महोत्सवी पर्वानिमित्त हार्दिक सदिच्छा...




महाराष्ट्र राज्यातील महाबीज विक्रेत्यांची 'स्टार डिलर मिट' १५ - १७ ऑक्टोबर २०१६ मध्ये पेंच (मध्यप्रदेश) येथे घेण्यात आली.



**श्री. अनिल भंडारी** भा.प्र.से.
व्यवस्थापकीय संचालक (२०१८-२०२०)

# शेतकरी बांधवांना सर्वोत्तम सेवा ...

राष्ट्रीय सुरक्षिततेमध्ये अन्नधान्याच्या स्वयंपूर्णतेचे अनन्यसाधारण महत्व असून, त्यादृष्टीने दिनांक २८ एप्रिल, १९७६ स्थापित झालेले महाबीज विविध पिक व वाणांचे गुणवत्तापूर्ण बियाणे शेतकऱ्यांना त्यांच्या गरजेनुसार रास्त दरात उपलब्ध करुन देत आहे. महामंडळ राज्य व केंद्र शासनाच्या विविध संकल्पना, सवलती व योजना यशस्वीरित्या राबवून राज्यातील शेतकरी बांधवांना सर्वोत्तम सेवा देण्याचा अविरत प्रयत्न करत आहे व हेच महाबीजच्या यशाचे गमक आहे. महाबीजने बियाण्यासोबतच दर्जेदार जैविक उत्पादने, ऊती संवर्धित रोपे यासारख्या उच्च दर्जाच्या कृषी निविष्ठा रास्त दरात उपलब्ध केल्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्नात वाढ होऊन त्यांचा महाबीजप्रती विश्वास अधिक दृढ झाला आहे. महाबीजच्या व्यवस्थापकीय संचालक पदावर कार्यरत असताना जालना येथे स्वतंत्र बीज परीक्षण प्रयोगशाळेची स्थापना, ई-गर्व्हनन्स थोरणांतर्गत राज्य शासनाच्या महत्त्वकांक्षी ई-ऑफिस प्रकल्पाची महामंडळामध्ये अंमलबजावणी, कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे दुर्देवी मयत झालेल्या महामंडळाच्या नियमीत कर्मचाऱ्यांच्या वारसांना रु. २० लक्ष सानुग्रह रक्कमेस मंजूरात असे महत्वपूर्ण निर्णय महामंडळाच्या कर्मचाऱ्यांकरिता घेण्यात आलेत. एम.आय. डी.सी. शिवणी जि. अकोला येथे १०,००० क्विं. साठवणूक क्षमतेचे सौर उर्जेवर चालणारे वातानुकूलीत गोदाम उभारण्यात आले. याचदरम्यान Agriculture Today, Delhi या समुहातर्फे अकोला येथील महाबीज बीज परीक्षण प्रयोगशाळेस सार्वजनिक क्षेत्रातील 'सर्वोत्कृष्ट प्रयोगशाळा' या पुरस्काराने सन्मानीत केल्या गेले.

खरीप २०२० हंगामात महामंडळामार्फत राज्यातील शेतकरी बांधवांना पेरणीकरिता पुरवठा करण्यात आलेल्या प्रमाणित बियाणेच्या नैसर्गिक कारणांमुळे आलेल्या गुणवत्ता विषयक तक्रारींची त्वरीत दखल घेऊन शेतकऱ्यांचे हित लक्षात घेऊन त्यांना पुर्नपेरणीकरीता बियाणे उपलब्ध करुन दिले. कोरोनाच्या अभूतपूर्व संकटात, बियाणे निर्मिती ते वितरण या प्रत्येक पातळीवरील अडचणींवर महामंडळाच्या कर्मचाऱ्यांनी समर्थपणे मात करुन खरीप, रब्बी आणि उन्हाळी हंगाम यशस्वीपणे पार पाडले.

आजच्या आधुनिक युगात कृत्रिम बुद्धिमत्ता, ड्रोन, रोबोट्स आणि सेंसर यांचा कृषी क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर वापर होत आहे. परिणामी शेतकऱ्यांना हवामानासह अचूक माहिती वेळेत मिळून पिक व्यवस्थापन, पिक संरक्षण, खत व पाणी व्यवस्थापन योग्य रीतीने करण्यास मदत होवून त्यांचे उत्पन्नात निश्चितच वाढ होत आहे. या तंत्रज्ञानांचा वापर करुन दर्जेदार कृषि निविष्ठा महामंडळाच्या माध्यमातून महाबीज बिजोत्पादक तसेच राज्यातील शेतकऱ्यांना उपलब्ध झाल्यास त्यांचे आर्थिक जीवनमान उंचावण्यास निश्चितच मदत होईल हीच सदीच्छा व्यक्त करुन महाबीज परीवारास सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा.



श्री. सचिन कलंत्रे भा.प्र.से.
व्यवस्थापकीय संचालक (२०२२-२०२४)

# शेतकऱ्यांच्या समृद्धीचा सुवर्णपथ ...

महाराष्ट्रातील शेतक-यास सक्षम करण्याच्या उद्देशाने दिनांक २८ एप्रिल, १९७६ रोजी स्थापन झालेली संस्था म्हणजेच महाबीज. मागील पाच दशकापासून अविरतपणे बियाणे क्षेत्रात बदलत्या व्यावसायिक स्पर्धेमध्ये समर्थपणे उभं राहून महाबीज या संस्थेने बियाणे दरावर रास्त नियंत्रण ठेवून महाराष्ट्रातील शेतक-यांसाठी एक सकारात्मक विश्वास स्थापित केला आहे. त्यामुळेच महाबीज ही देशातील कृषी व बियाणे क्षेत्रातील एक अग्रगण्य संस्था म्हणून ओळखली जाते. हवामान बदलाच्या परिस्थितीचा आणि शेतकऱ्यांच्या गरजांचा विचार करून महाबीज दर्जेदार बियाणे वाजवी दरात उपलब्ध करून देण्यासोबत लागवडीबाबत तांत्रिक मार्गदर्शन देण्याचे कार्य शेतकऱ्यांच्या बांधावर करीत आहे. केवळ बियाण्यापुरते मर्यादित न राहता, महाबीजने जैविक उत्पादने, ऊती संवर्धन व रोपवाटिका या सारख्या उपक्रमांतही महाबीजने स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. महाबीजच्या जळणघडणीत व दमदार वाटचालीत भागधारक, बिजोत्पादक, अधिकृत विक्रेते, शेतकरी ग्राहक, संचालक मंडळ व सर्व अधिकारी व कर्मचारी यांचा सिंहाचा वाटा आहे. व्यवस्थापकीय संचालक या पदावर रुजू होतांना महाबीजची एकूण बियाणे उपलब्धता व आर्थिक उलाढाल यामध्ये मोठे आव्हान निर्माण झाले होते. त्यामुळे भागधारक, बिजोत्पादक व अधिकृत विक्रेते यामध्ये योग्य संवाद व समन्वय साधन्याची अंत्यत आवश्यकता निर्माण झाली होती. यासाठी "महाबीज आपल्या दारी" या नाविण्यपूर्ण संकल्पनेद्वारे प्रत्येक जिल्हयात शेतकरी/बिजोत्पादकांची कार्यशाळा आयोजीत करून त्यांच्या समस्या जाणून घेउन त्यांचे निराकरण करण्यात आले. महाबीज अधिकृत विक्रेत्यांच्या जिल्हानिहाय सभा आयोजीत करुन त्यांच्या समस्या व प्रलंबीत प्रश्न सामंजस्याने निकाली काढण्याचा प्रयत्न करण्यात आला. पर्यायाने बियाणे व जैविक खतांच्या विक्रीमध्ये मोठया प्रमाणात वाढ होउन आर्थिक उलाढाल वाढण्यास मदत झाली. तसेच बिजोत्पादकांच्या बाबतीत धोरणात्मक निर्णय घेतल्यामुळे बिजोत्पादकास उत्साह व आपुलकीची भावना वृद्धींगत झाली. तसेच केंद्र शासनाकडे तीन वर्षापासून प्रलंबित असलेले विविध योजनेतील अनुदान प्राप्त् करुन बिजोत्पादकांना अदा करण्यात आले. महामंडळाच्या कर्मचाऱ्यांचे प्रलंबित प्रश्न त्वरेने निकाली काढल्यामुळे कर्मचाऱ्यांच्या कामकाजात गुणवत्ता, गतिमानता व पारदर्शकतेमुळे सकारात्मक परिणाम दिसून आला. सन २०२३-२४ या वर्षात बियाण्याची उपलब्धता वाढीसोबत महाबीज जैविक खते, ऊती संवर्धीत केळी, पपई, इत्यादींचे विक्रीमध्ये विक्रमी वाढ झाल्यामुळे आणि इतर धोरणात्मक निर्णय घेतल्यामुळे आर्थिक उलाढाल ३८८ (२०२२-२३) कोटीवरुन ५३७ कोटींवर पोहचविण्यात यश मिळाले. महाबीज सुवर्ण महोत्सव साजरे करत असतांना बदलत्या आव्हानांचा विचार करुन भविष्यात निश्चितच यशस्वी वाटचाल करेल हीच सदिच्छा व्यक्त करुन महाबीजच्या सुवर्णमहोत्सवी वाटचालीस हार्दिक शुभेच्छा!



श्री. अंकुशराव माने
संचालक, महाराष्ट्र राज्य बीज प्रमाणिकरण यंत्रणा, अकोला

# अमूल्य योगदानाची अनुभूती ...

महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित, अकोला अर्थात महाबीज ही संस्था सुवर्ण महोत्सवी वर्षांकडे गौरवशाली वाटचाल करत असताना या संस्थेला प्रथमतः सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने त्यांना मन:पूर्वक शुभेच्छा देतो. या सुवर्ण क्षणाचा साक्षीदार होत असताना महाबीजच्या निस्सीम गुणवत्ता आणि नाविन्यपूर्णतिने शेती क्षेत्रावर उमटवलेल्या अमूल्य योगदानाची अनुभूती सातत्याने आलेली आहे.

महाराष्ट्र राज्य बीज प्रमाणिकरण यंत्रणेचे (MSSCA) संचालक या नात्याने महाबीजच्या गुणवत्तेच्या कटिबध्दतेचा मी साक्षीदार राहिलो आहे. आमची संस्था राज्यभरातील बियाणे उत्पादनाच्या काटेकोर प्रमाणिकरणाचे पालन करुन उत्कृष्ट बियाणे दर्जा सुनिश्चित करण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावते आणि महाबीजने या निकषांची सातत्याने काळजी घेतली आहे. त्यांच्या उच्च गुणवत्ता व दर्जेदार बियाण्याने शेतकऱ्यांना यशस्वीतेसाठी आवश्यक साधने उपलब्ध करुन दिली आहेत. महाबीजच्या प्रत्येक बियाण्यावरचा लेबल हा अनुवांशिक शुध्दता आणि उच्च गुणवत्तेचे प्रतिक ठरला आहे.

आमच्या या सामायिक प्रवासातील एक महत्त्वपूर्ण कामगिरी म्हणजे साथी (Seed Authentication, Traceability and Holistic Inventory) या भारत सरकारच्या महत्त्वकांक्षी प्रकल्पाची यशस्वी अंमलबजावणी होय. महाराष्ट्र राज्य बीज प्रमाणिकरण यंत्रणा या डिजिटल परिवर्तनात अग्रगण्य असून या प्रकल्पाच्या उद्दिष्टांची पूर्तता करण्यात महाबीजच्या सहकार्यपूर्ण भूमिकेमुळे हे शक्य झाले आहे. अशा पारदर्शक डिजिटल प्रणालींच्या समावेशामुळे, आम्ही महाबीजचे बीदवाक्य "विश्वासाचे बियाणे" याला खऱ्या अर्थाने साकारत आहोत.

बियाणे उत्पादन हे विशेषत: महाराष्ट्रासारख्या कृषिप्रधान राज्यात केवळ एक प्रक्रिया नसून ती देशाच्या अन्न सुरक्षेची जबाबदारी आहे. महाबीज आपल्या विस्तृत बियाणे उत्पादन नेटवर्क, सुदृढ गुणवत्ता नियंत्रण प्रणाली आणि पिकांच्या उत्पादनशक्तीत सुधारणा करण्यासाठी केलेल्या प्रयत्नांमुळे या जबाबदारीचे निर्वहन करत आहे. शेतकऱ्यांबरोबर असलेली त्यांची सहकार्याची भावना, प्रोत्साहन योजना आणि ग्राम बिजोत्पादन योजना यासारख्या उपक्रमाव्दारे महाबीज केवळ शेतीत नव्हे तर ग्रामीण भागाच्या सामाजिक आणि आर्थिक विकासातही मोठा वाटा उचलत आहे. महाबीज सुवर्ण महोत्सवी वर्षाकडे वाटचाल करत असतांना मला खात्री आहे की, ते भविष्यातही बियाणे उद्योगातील नाविन्य आणि विश्वासाचे नवीन मापदंड प्रस्थापित करतील. महाराष्ट्र राज्य बीज प्रमाणिकरण यंत्रणेच्या वतीने मी महाबीजला यशस्वी भविष्यासाठी मन:पूर्वक शुभेच्छा देतो. महाबीजचा प्रवास जितका सुवर्ण आहे. तितकेच त्यांचे भवितव्यही सुवर्णमयी राहो, हिच ईश्वचरणी प्रार्थना.



सबसे खास
महाबीज कपास
सबसे खास
महाबीज-१२४ बीजी २
महाबीज कपास
कालावधी : १४५ ते १५० दिवस
बोंडाचे वजन : ५.० ते ५.५ ग्रॅम
उत्पादन : २४ ते २५ क्विं/हे
झाडाच्या फांद्यामधील कमी अंतर
कोरडवाहू क्षेत्राकरिता शिफारस
महाबीज®
महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित
महाबीज भवन, कृषी नगर, अकोला - ४४४१०४
माहितीस्तव
स्कॅन करा

# महाबीज वार्ता

**खालील क्यूआर कोड स्कॅन करा आणि कृषी विषयावरील तज्ज्ञांचे नाविन्यपूर्ण लेख व अनुषंगिक कृषी माहिती मिळवा**

# भागधारकांचे मनोगत



## श्री. प्रकाश काकड

रा. सांगळुद ता. जि. अकोला

मी, महाबीजचा भागधारक असून बिजोत्पादकसुध्दा आहे. महाबीज स्थापन झाल्यापासुन खरीप व रब्बी हंगामात प्रामुख्याने सोयाबीन, मुग, उडीद, तूर, हरभरा, करडई, जवस व ज्वारी या पिकांचे नवीन संशोधित वाणांचा बिजोत्पादन कार्यक्रम राबवत असून यातून तयार होणारे गुणवत्तापूर्ण कच्चे बियाणे महाबीजकडे सुपूर्त करणे आजतागायत सुरु आहे व यापुढेही असेच सुरु राहिल. यांचे मुख्य कारण म्हणजे महाबीज संस्था, महाबीज व्यवस्थापन आणि अधिकारी/कर्मचारी यांचेवर असलेला विश्वास व आस्था.

महाबीज ही शेतकऱ्यांची संस्था बाजारामध्ये समर्थपणे टिकून असल्यामुळे बाजारातील बियाणे दर नियंत्रणात आहे अन्यथा इतर खाजगी कंपन्यांनी शेतकरी बांधवांची लूट करुन त्यांची दयनीय अवस्था करण्यास कारणीभूत ठरले असते.

महाबीज मार्फत संशोधीत सं. कापूस महाबीज-१२४ बीजी-२ हे वाण अजित-५ या वाणास चांगला पर्याय असून सदर वाणाचे बियाणे महामंडळाने लवकर उपलब्ध करावे. त्यासोबतच महाबीज पैलपाडा प्रक्षेत्रावर दरवर्षी खरीप व रब्बी शिवारफेरीमध्ये विविध पिक व वाणांचे पीक प्रात्यक्षिक राबविण्यात येतात. ज्यामुळे शेतकरीबांधवांना एकाचवेळी एकाच ठिकाणी सर्व वाण पहायला मिळाल्यामुळे पुढील हंगामात पेरणी करावयाच्या वाणाची निवड करणे सोपे झाले आहे. तसेच महाबीजव्दारे सर्व भागधारक / बिजोत्पादकांना शेती उपयोगी वस्तु/साहित्य वाटप करण्यात येते.

महाबीजला सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा...



## श्री. रामचंद्र भोसले

रा. राऊळगांव ता. बार्शी जि. सोलापूर

मी महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळाचा सभासद असून मी १९९४ पासून आजपर्यंत महाबीजचा खरीप हंगामात सोयाबीन, तूर, उडीद व रब्बी हंगामात ज्वारी व हरभरा या पिकांचा बिजोत्पादन कार्यक्रम राबवित आहे. महामंडळाकडून आम्हाला चांगल्या प्रतीचे मुलभूत व पायाभूत दर्जाचे बियाणे मिळते. सदर बियाण्यापासून आम्हाला इतर पिकांपेक्षा सहज जास्त उत्पादन मिळते आणि बाजार भावापेक्षा २५ टक्के वाढीव दरासोबतच अनुदान सुध्दा मिळत असते. मी महाबीजचा सभासद असल्यामूळे प्रत्येकवर्षी माझेकडे असलेल्या शेअर्स भागावर कुपन देण्यात येउन त्यामूळे बियाण्यावर २०० टक्के सुट मिळत आहे.

महामंडळाकडून ५० टक्के अनूदानावर ताडपत्री, चाळणी, फवारणीपंप हया शेतीपयोगी वस्तु मिळाल्या आहेत. याशिवाय बॅटरी, छत्री, घडयाळ व बॅग इत्यादी भेट म्हणून देण्यात येत आहेत.

महाबीजची स्थापना झाल्यामूळे बियाणे किंमती नियंत्रणामध्ये आल्यात. अन्यथा खाजगी कंपन्यांकडून शेतक-यांना अवास्तव दराने बियाणे खरेदी करणे भाग पडले असते. एकंदरीत महाबीजमुळे आम्हां शेतकरी बांधवांचा फार मोठया प्रमाणात फायदा झालेला असून भविष्यात सुध्दा होईल यात तिळमात्र शंका नाही.

आता महाबीज आपल्या ५० व्या वर्षात पदार्पण करीत असल्यामूळे महाबीजच्या या सुवर्ण महोत्सवी वर्षाकरिता माझ्याकडून हार्दिक शुभेच्छा.



२१ डिसेंबर २०२४ रोजी पीडीकेव्ही अकोला येथे वार्षिक आमसभेत श्री. प्रकाशजी काकड यांचा सत्कार करतांना कृषी आयुक्त व इतर मान्यवर



श्री. रामचंद्र भोसले यांच्या प्रक्षेत्रावर ग्राम बिजोत्पादन योजनेअंतर्गत ज्वारी - फुले सुचित्रा पीक प्रात्यक्षिक कार्यक्रम आयोजित

# भागधारकांचे मनोगत



## श्री. सुनिल देशमुख

म. पो. साळपूरी ता.जि. परभणी

मी महामंडळाचा बिजोत्पादक व भागधारक असून, गेल्या १५ ते २० वर्षांपासून सातत्याने बिजोत्पादन कार्यक्रम राबवत आहे. या कार्यामध्ये महाबीजकडून पुरविण्यात येणाऱ्या पायाभूत आणि प्रमाणित बियाण्याची गुणवत्ता अत्यंत उत्कृष्ट असते. पेरणीपूर्वी महाबीजकडून बियाण्यावर बुरशीनाशक प्रक्रिया केली जाते, त्यामुळे उगवण क्षमता वाढते आणि बुरशीजन्य रोगांपासून पिकांचे संरक्षण होते.

महाबीजच्या बियाण्यांमध्ये कोणत्याही प्रकारची भेसळ नसते. आम्ही दरवर्षी महाबीजचे नवे वाण वापरतो, त्यामुळे उत्पादनात वाढ तर होतेच, शिवाय महामंडळाकडून बोनस देखील प्राप्त होतो. या नव्या वाणांची तांत्रिक माहिती आम्हाला महाबीजमार्फत आयोजित करण्यात येणाऱ्या शिवार फेरीद्वारे मिळते, त्यामुळे आधुनिक शेतीच्या दृष्टीने मार्गदर्शन मिळते आणि शेती अधिक परिणामकारक बनते.

आम्ही बियाणे महामंडळाकडे सुपूर्त करताच, अग्रीम रक्कम त्वरित प्राप्त होते, ज्यामुळे आमच्यासारख्या शेतकऱ्यांना दिवाळी साजरी करणे सहज शक्य होते. हे आर्थिक नियोजन आमच्या घरगुती खर्चासाठी आणि पुढील हंगामाच्या तयारीसाठी उपयुक्त ठरते. महाबीजमधील अधिकारी आणि कर्मचारी वर्ग अत्यंत सहकार्यशील आणि शेतकरीहितैषी आहे. वेळोवेळी ते मार्गदर्शन करतात व आवश्यक ती मदत करतात. त्यांच्या सहकार्यामुळेच आम्ही गेली अनेक वर्षे यशस्वीपणे बिजोत्पादन करीत आहोत. महाबीजच्या आगामी वाटचालीस आणि सुवर्ण महोत्सवी वर्षातील प्रगतीस मनःपूर्वक शुभेच्छा!



श्री सुनिल देशमुख मौजे साळापुरी ता जि परभणी येथे सोयाबीन कच्चे बियाणे मोहोरबंद करताना



## श्री. प्रविण कुळकर्णी

रा. आशिव ता. औसा जि. लातूर

मी व्यवसायाने बीएससी (कृषी) पदवीधारक शेतकरी असून, महाबीजचा भागधारकही आहे. गेल्या वीस वर्षांपासून मी महाबीजचा नियमित बिजोत्पादक आहे. महाबीजने मला दरवर्षी दर्जेदार पायाभूत व प्रमाणित बियाण्यांचे बिजोत्पादन कार्यक्रम राबविण्याची संधी दिली, त्यामुळे प्रत्येक वर्षी मला आर्थिक लाभ होत गेला आणि उत्पन्नात सातत्याने वाढ झाली.महाबीजचा आर्थिक व्यवहार अत्यंत प्रामाणिक व पारदर्शक असल्यामुळे आजपर्यंत कोणतीही अडचण अनुभवावी लागली नाही. विशेष म्हणजे महाबीजचे अधिकारी व कर्मचारी हे शेतकरी आणि बिजोत्पादक यांचा आदरपूर्वक सन्मान करतात आणि आवश्यक त्या सर्व गोष्टींसाठी मार्गदर्शनही करतात. त्यांच्या सहकार्यामुळेच माझ्या शेतीच्या कामकाजात सुटसुटीतपणा आला.बियाणे प्रक्रियेपासून ते पिक काढणीपर्यंत महाबीजद्वारे उत्पादित जैविक खतांचा (रायझोबियम, पीएसबी, अॅझोटोबॅक्टर, केएमबी) व ट्रायकोडर्मा बुरशीनाशकाचा योग्य वापर केल्यामुळे माझ्या उत्पादनात १५ ते २० टक्के वाढ झाली आहे. हे केवळ उत्पादनातच नव्हे तर दर्जामध्येही स्पष्ट दिसून येते. दरवर्षी महाबीजमार्फत खरीप व रब्बी हंगामात शिवारफेरीचे आयोजन करण्यात येते. महाबीज ही शेतकऱ्यांचीच संस्था असून ती शेतकऱ्यांच्या सर्वांगीण हितासाठी कार्यरत आहे. तिच्या कार्यामुळे माझी आर्थिक प्रगती झाली आणि मानसिक समाधानही लाभले. महाबीजच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त मी संस्थेला मनःपूर्वक शुभेच्छा देतो आणि तिची अशीच यशस्वी वाटचाल चालू राहो, हीच अपेक्षा!



श्री. प्रविण कुळकर्णी यांचा महाबीज शिवारफेरी दरम्यान सत्कार करतांना मा. व्यवस्थापकीय संचालक श्री. योगेश कुंभेजकर

# भागधारकांचे मनोगत



## श्री. सुरेश देशमुख

रा. कांडली ता. कळमनुरी जि. हिंगोली

मी गेल्या ४० वर्षांपासून महाबीजचा बिजोत्पादक व भागधारक असून, माझ्या कुटुंबातील सर्व सदस्य तसेच आमच्या संपूर्ण गावामध्ये सन १९८५ पासून खरीप व रब्बी हंगामात सातत्याने बिजोत्पादन कार्यक्रम राबवले जात आहेत. या उपक्रमामुळे आम्हाला दरवर्षी बाजारभावापेक्षा अधिक दर मिळतो आणि अनुदान व बोनस स्वरूपात वर्षभर आमच्या हाती आर्थिक लाभ येत असतो. त्यामुळे आमचे आर्थिक स्थैर्य अधिकच बळकट झाले आहे.

महाबीजकडून होणाऱ्या बियाण्याच्या खरेदीसाठी बँकांमार्फत शोधन व्यवहार होत असल्यामुळे आमची पत बँकेत वाढली आहे. यामुळे आम्हाला बँकेकडून कर्ज सुविधा सहज मिळते, जी शेतीच्या विकासासाठी अत्यंत उपयुक्त ठरते.

महाबीज संस्थेमुळेच बियाण्यांच्या बाजारातील किंमतींवर नियंत्रण राहिले आहे. याचा थेट लाभ शेतकऱ्यांना मिळतो. बाजारातील खाजगी कंपन्यांच्या बियाण्यांच्या तुलनेत महाबीजचे बियाणे अधिक दर्जेदार, विश्वासार्ह आणि योग्य किमतीत उपलब्ध असल्यामुळे शेतकरीवर्ग महाबीजकडे अधिक प्रमाणात वळला आहे.

महाबीजमुळे आमच्या कुटुंबाचीच नव्हे तर गावातील अनेक शेतकऱ्यांचीही आर्थिक प्रगती झाली आहे, याबाबत मला कोणतीही शंका नाही. आमच्या सर्व यशामध्ये महाबीजचा मोठा वाटा आहे. महाबीजची अशीच उत्तरोत्तर प्रगती व्हावी, हीच मनःपूर्वक सदिच्छा व्यक्त करतो. सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने महाबीज परिवारास हार्दिक शुभेच्छा!



महाबीजचे तिळ वाण पीकेव्ही एनटी-११ वाणा बाबत समाधान व्यक्त करतांना श्री. सुरेश देशमुख



## श्री. राधेश्याम मंत्री

मु. पो. जांभरुन परांडे ता.जि. वाशिम

मी, जांभरून परांडे येथील रहिवासी असून महाबीजच्या स्थापनेपासून भागधारक आणि बिजोत्पादक आहे. माझ्या मते, महाबीज ही खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांची कंपनी आहे, कारण तिची स्थापनाच शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी झाली आहे.

महाबीजच्या स्थापनेपासुन आजपर्यंत खरीप आणि रब्बी हंगामात आयोजित विविध पिकांचे नवीन व अधिक उत्पादनशील वाणांच्या बिजोत्पादन कार्यक्रमामध्ये मी सक्रिय सहभाग घेत आहे. कारण माझा महाबीजच्या दर्जेदार बियाणेवरील व पर्यायाने महाबीजवरील विश्वास आजही कायम आहे. बिजोत्पादन कार्यक्रमातील तयार होणाऱ्या कच्चे बियाण्यास कृषी उत्पन्न बाजार समितीच्या दरापेक्षा २५ ते ३० टक्क्यांपर्यंत अधिक मोबदला मिळतो. यामुळे, मला माझ्या शेतीमालाच्या विक्रीसाठी बाजारपेठेवर अवलंबून राहण्याची गरज राहिलेली नसून यातून माझी आर्थिक प्रगती होऊन माझ्या घरात समृध्दी नांदत आहे. माझ्या आतापर्यंतच्या अनुभवानुसार, महाबीज उच्च दर्जाचे आणि बीज प्रमाणीकरणाच्या सर्व मानकांमध्ये पात्र झालेले प्रमाणित बियाणे शेतकरी बांधवांना रास्त दरात व वेळेवर उपलब्ध करून देत असल्यामुळे राज्यातील व पर्यायाने देशातील बियाणे किमती स्थिर ठेवण्यात महाबीजचा मोलाचा वाटा असल्यामुळे महाबीज खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी कार्यरत आहे. या संस्थेचा भागधारक असल्याचा मला सार्थ अभिमान आहे. महाबीजची प्रगती निरंतर होत राहो! महाबीजच्या सुवर्णमहोत्सवी वर्षाच्या निमित्ताने महाबीजशी जोडलेल्या सर्वांना माझ्याकडून मनःपूर्वक शुभेच्छा!



श्री. राधेश्यामजी मंत्री वाशिम यांचा सत्कार करताना श्री. गजानन देशमुख विभागीय व्यवस्थापक महाबीज अकोला

# भागधारकांचे मनोगत



**श्री. मनोहर जाधव**
मु. पो. अतीत ता. जि. सातारा

"शुद्ध बीजापोटी फळे रसाळ गोमटी" या जगदगुरू संत शिरोमणी श्री तुकाराम महाराज यांच्या उक्तीप्रमाणे, महाबीजचे बियाणे पेरल्यानंतर पीक जोमदार येते आणि भरघोस उत्पन्न मिळते. मागील ४९ वर्षांचा अनुभव पाहता, हे प्रत्येक शेतकऱ्याने प्रत्यक्ष अनुभवलं आहे, यात तिळमात्र शंका नाही. महाबीज ही खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांची बियाणे कंपनी म्हणून ओळखली जाते आणि अशा संस्थेचा मी स्थापनेपासून भागधारक व बिजोत्पादक असल्याचा मला सार्थ अभिमान आहे.माझ्या गावात माझ्यासह जवळपास १४ शेतकरी भागधारक असून, तेही महाबीजच्या बिजोत्पादन उपक्रमात सक्रीय सहभाग नोंदवत आहेत. महाबीजने २०२० ते २०२३ या कालावधीत ज्वारीच्या नवीन वाणांसाठी 'पौष्टिक तृणधान्य योजना' अंतर्गत अनुदान उपलब्ध करून दिले. त्यामुळे शेतकऱ्यांचा कल ज्वारी उत्पादनाकडे वाढला आहे. त्याचबरोबर महाबीजने भावफरक अनुदानही देऊन शेतकऱ्यांना आधारभूत किंमतीचा लाभ मिळवून दिला आहे.महाबीजमार्फत भागधारकांना दरवर्षी वितरित कूपनांवर प्रति कूपन ₹२०० इतकी सवलत बियाणे, जैविक उत्पादने व रोपवाटिका खरेदीसाठी मिळते. महाबीजने संशोधन क्षेत्रात मोठी प्रगती केली असून, 'सं. ज्वारी महाबीज-७०४' व 'सं. चारा ज्वारी महाबीज-७५३' हे वाण आमच्या प्रक्षेत्रावर प्रात्यक्षिकांतून सादर करण्यात आले. महाबीज सुवर्ण महोत्सवी वर्षात पदार्पण करत आहे. दरवर्षी शेतकऱ्यांना दर्जेदार बियाणे माफक दरात उपलब्ध करून देणाऱ्या या महामंडळाच्या पुढील वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा!



श्री. मनोहर जाधव यांचे प्रक्षेत्रावर परभणी शक्ती ज्वारी बियाणे प्रक्षेत्र तपासणी दरम्यान महाबीज अधिकारी व शेतकरी



**श्री. स्वरुप शिंदे**
रा. टाकळी ता. जि. बुलढाणा

मी महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित, अकोला या संस्थेचा भागधारक तथा बिजोत्पादक शेतकरी आहे. महाबीजचे भागधारक या नात्याने मी महाबीजचे बिजोत्पादन धोरणामध्ये सक्रिय सहभाग घेत असून महाबीजकडून भागधारकांच्या सुचना स्विकारुन अडचणी समजून घेतल्या जातात याचा मला सार्थ अभिमान वाटतो. महाबीजच्या स्थापनेपासून माझ्या शेतात माझे वडीलांपासून महाबीजचा पायाभूत तथा प्रमाणित दर्जाचा बिजोत्पादन कार्यक्रम राबविण्यात येत असुन यामध्ये विद्यापीठाने विकसित केलेल्या नविन वाणांचा समावेश आहे. तसेच यापासून अधिक दर मिळत असल्यामूळे आम्ही महाबीजशी जुळलो व आमची आर्थिक उन्नती झालेली आहे.

त्याचप्रमाणे गावातील इतर शेतक-यांनी सुध्दा महामंडळाचा बिजोत्पादन कार्यक्रम राबवून आर्थिक प्रगती केलेली आहे. सोबतच महामंडळामार्फत महाबीज जैविक खते व बुरशीनाशक ट्रायकोडर्मा किफायतशीर दरामध्ये उपलब्ध करुन दिल्यामुळे पिकाची वाढ जोमदार होऊन गावातील प्रक्षेत्रावर बुरशीजन्य रोगांवर नियंत्रण करणे शक्य झाले आहे. याशिवाय महाबीज संशोधित विविध वाणांचा पिक प्रात्याक्षिक कार्यक्रम होत असल्यामुळे शेतक-यांच्या उत्पादनामध्ये वाढ झालेली आहे. भविष्यात महाबीजची सर्वांगीण प्रगती होण्याकरिता माझे सदैव सहकार्य असून महाबीजच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाकरिता माझ्याकडून हार्दिक शुभेच्छा.



महाबीजच्या वर्धापन दिनानिमित्त श्री. स्वरूप पंडितराव शिंदे उत्कृष्ट बिजोत्पादक / भागधारक यांचा सत्कार करण्यात आला

# भागधारकांचे मनोगत



## श्री. हरिभाऊ येवले

महिमळ, ता. चिखली जि. बुलढाणा

मी मागील ३० वर्षापासून मी महाबीजचा संकरीत व सुधारित पिकवाण्यांचा बिजोत्पादन कार्यक्रम घेत आहे. या कार्यक्रमामध्ये सहभागी झाल्यामुळे मला अनेक आर्थिक आणि तांत्रिक फायदे मिळाले आहेत. महाबीजच्या माध्यमातून उत्पादित केलेल्या प्रमाणित व पायाभूत दर्जाच्या बियाण्यांना बाजारभावाच्या तुलनेत २५ ते ३५ टक्के अधिक प्रोत्साहनपर रक्कम मिळते. त्यासोबतच शासनाकडून मिळणाऱ्या अनुदानामुळे माझ्या कुटुंबातील पाल्यांचे उच्च शिक्षण, लग्न समारंभ, स्थावर मालमत्तेचे व्यवहार अशा अनेक गोष्टींसाठी आर्थिक नियोजन सुलभ झाले आहे.

यासोबतच उच्चतम अनुवांशिक शुद्धतेचे वाण, तसेच पायाभूत बियाणे मिळत असल्यामुळे माझ्या उत्पादनात सातत्याने वाढ होत आहे. विद्यापीठाचे शास्त्रज्ञ, बीज प्रमाणीकरण अधिकारी व महाबीज अधिकारी वेळोवेळी भेट देत असल्याने तांत्रिक मार्गदर्शन मिळते. तसेच, महाबीजकडून दिले जाणारे बुरशीनाशक व जीवाणुखते पिकांवरील रोग नियंत्रणासाठी प्रभावी ठरले आहेत, ज्यामुळे उगवणशक्ति चांगली राहून उत्पादन वाढीस मदत झाली आहे.सर्वात महत्त्वाचे म्हणजे, अंतिम पात्र बियाणे शोधनासाठी व देय अनुदानाची रक्कम वेळेवर माझ्या खात्यात जमा होते, त्यामुळे कार्यालयात धावपळ करण्याची गरज भासत नाही. महाबीज बिजोत्पादन कार्यक्रम माझ्यासाठी आर्थिक संजीवनी ठरली आहे. महाबीजची उत्तरोत्तर प्रगती व्हावी, हीच माझी मनःपूर्वक सदिच्छा आहे.



## श्री. गजानन कृपाळ

रा. जानेफळ ता. मेहकर जि. बुलढाणा

मी महाबीजचा भागधारक असून, गेल्या अनेक वर्षापासून सक्रिय बिजोत्पादकही आहे. महाबीजची स्थापना झाल्यापासून खरीप व रब्बी हंगामात सोयाबीन, मुग, उडीद, तूर, हरभरा, करडई, जवस व ज्वारी या प्रमुख पिकांचे नवीन सुधारित वाणांचा बिजोत्पादन कार्यक्रम मी सातत्याने राबवत आहे. या कार्यक्रमांतून तयार होणारे गुणवत्तापूर्ण कच्चे बियाणे मी नियमितपणे महाबीजकडे सुपूर्त करीत आहे आणि हे कार्य भविष्यातही सुरू ठेवणार आहे.या दृढ संबंधामागचे मुख्य कारण म्हणजे महाबीज संस्थेवर असलेला माझा विश्वास, संस्थेचे पारदर्शक व्यवस्थापन आणि अधिकारी-कर्मचाऱ्यांची शेतकरी हिताची सकारात्मक भूमिका. महाबीज ही खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांची संस्था आहे. ती बाजारात टिकून राहिल्यामुळे बियाण्याचे दर नियंत्रणात आहेत. अन्यथा, खाजगी कंपन्यांच्या मनमानीमुळे शेतकरी आर्थिकदृष्ट्या अडचणीत आले असते.महाबीजमार्फत विकसित केलेले "संशोधित संकरित कापूस महाबीज-१२४ बीजी-२" हे वाण 'अजित-५' या वाणाचा उत्कृष्ट पर्याय ठरत आहे. महामंडळाने याचे बियाणे शेतकऱ्यांना लवकरात लवकर उपलब्ध करून द्यावे, अशी अपेक्षा आहे.दरवर्षी महाबीजच्या पैलपाडा प्रक्षेत्रावर खरीप व रब्बी हंगामातील शिवारफेरीत विविध पिकांच्या वाणांचे प्रात्यक्षिके सादर केली जातात. यामुळे शेतकऱ्यांना एका ठिकाणी सर्व वाण पाहून पुढील हंगामासाठी योग्य वाणांची निवड करणे सुलभ होते. यासोबतच महाबीजकडून भागधारक व बिजोत्पादकांना शेतीसाठी उपयुक्त साहित्याचे वाटपही केले जाते.महाबीजच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त मी संस्था, व्यवस्थापन व सर्व कर्मचाऱ्यांना मनःपूर्वक शुभेच्छा देतो!



श्री. वल्लभराव देशमुख, संचालक, महाबीज याचे कडून प्रगतिशील शेतकरी श्री. हरिभाऊ येवले यांचा सत्कार करण्यात आला



खरीप हंगाम अंतर्गत शेती कार्यशाळेमध्ये श्री. गजानन कृपाळ यांचा सत्कार करतांना श्री. गजानन देशमुख, विभागीय व्यवस्थापक, अकोला

महाबीज®

# महाबीज सोयाबीन

महाबीज बियाणं दमदार
पीक येईल जोमदार...

## सोयाबीनच्या यशस्वी लागवडी करीता खालील चतुःसूत्री चा अवलंब करा !



# महाबीज विक्रेता मनोगत



## श्री. श्रीकांत लव्हाळे

लव्हाळे कृषी सेवा केंद्र, कारंजा लाड जि. वाशिम

मी महाबीजचा सन १९९५ पासून अधिकृत विक्रेता असून, वाशिम जिल्ह्यातील शेतकरी बांधवांचा महाबीजवरील दृढ विश्वास यामुळे माझा बियाणे व्यवसाय इतरांच्या तुलनेत अधिक आहे. मागील ४० वर्षांच्या अनुभवातून हे स्पष्ट होते की, शेतकरी महाबीज बियाण्यांना प्रथम पसंती देतात. या विश्वासामुळेच माझ्या व्यवसायाची आर्थिक उलाढाल वर्षानुवर्षे वाढत आहे.

राज्यातील शेतकऱ्यांना दर्जेदार, गुणवत्तापूर्ण आणि योग्य दरात बियाणे वेळेत उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने 'महाबीज'ची स्थापना करण्यात आली. महामंडळाने बियाण्याच्या गुणवत्तेबाबत कधीही तडजोड केली नाही, यामुळेच गेल्या अनेक दशकांपासून शेतकऱ्यांचा विश्वास टिकून आहे.

बियाणे व्यवसायातील वाढती स्पर्धा लक्षात घेता, महाबीजने शेतकऱ्यांच्या गरजा आणि बदलत्या हवामानाचा विचार करून उत्पादनक्षम, रोगप्रतिरोधक वाणांचे संशोधन केले आहे. ही वाणे शेतकऱ्यांना अधिक उत्पादन देणारी असून, त्यांच्या आर्थिक स्थैर्याला हातभार लावणारी आहेत.विशेष म्हणजे, खाजगी कंपन्यांकडून होणाऱ्या फसवणुकीपासून शेतकऱ्यांचे संरक्षण व्हावे, यासाठी महाबीजने बियाण्यांच्या किमती स्थिर राहाव्यात याकडे लक्ष दिले आहे. त्यामुळेच महाबीज ही संस्था शेतकऱ्यांच्या विश्वासास पात्र ठरली आहे. महाबीजच्या सुवर्ण महोत्सवी वर्षात पदार्पणाच्या पार्श्वभूमीवर, येत्या ४९व्या वर्धापन दिनानिमित्त महाबीज परिवारास आणि सर्व संबंधितांना मनःपूर्वक शुभेच्छा!



श्री. श्रीकांत लव्हाळे,कारंजा यांचा सत्कार करतांना
जिल्हा व्यवस्थापक, वाशिम



## श्री. हरिश्चंद्र अंगद केंद्रे

किसान ट्रेडर्स, अंबाजोगाई, जि. बीड

मी महाबीजचा सन १९९२ पासून अधिकृत विक्रेता असून बीड जिल्हयात शेतकरी बांधवांचा महाबीजवर असलेल्या विश्वासामुळे माझा महाबीज बियाण्याचा सर्वाधिक व्यवसाय आहे. मागील ४९ वर्षाचे अनूभवावरुन बियाणे बाजारात शेतक-यांचा महाबीजवर असलेला विश्वास लक्षात घेता महाबीज बियाण्यास प्रथम पसंती असते त्यामुळे आमची आर्थिक उलाढाल दरवर्षी वाढत आहे.

राज्यातील शेतकऱ्यांना गुणवत्तापूर्ण व दर्जेदार बियाणे रास्त दरात वेळेवर उपलब्ध करुन देण्याचे उद्येशाने महाबीजची स्थापना झालेली आहे. महामंडळाच्या स्थापनेपासून बियाणे गुणवत्तेबाबत कोणत्याही प्रकारची तडजोड न केल्यामुळेच गेल्या ४८ वर्षापासून राज्यातील शेतकऱ्यांचा महाबीजप्रती विश्वास कायम आहे.

बियाणे व्यवसायातील स्पर्धेमध्ये टिकून राहण्याकरिता महाबीजने शेतकऱ्यांची पसंती व गरज विचारात घेऊन बदलत्या वातावरणास अनुकूल असलेले व उत्पादनक्षम विविध वाणांचे संशोधन केले आहे. विशेष महत्त्वाची बाब म्हणजे खाजगी कंपन्यांकडून शेतकऱ्यांची फसवणूक होऊ नये म्हणून बाजारातील बियाण्यांच्या किंमती स्थिर राहण्याकरिता महाबीजची भूमिका नेहमीच शेतक- यांच्या बाजूने असल्यामुळे शेतक-यांचे हित जोपासले आहे. महाबीज सुवर्ण महोत्सवी वर्षाकडे वाटचाल करीत असून आगामी ४९ व्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा.



श्री. हरिश्चंद्र केंद्रे यांचा महाबीज विक्रेता सभेमध्ये सत्कार करतांना
श्री. सचिन कलंत्रे, मा. व्यवस्थापकीय संचालक, महाबीज

# महाबीज विक्रेता मनोगत



## श्री. नंदकुमार देशमुख

शिवा ॲग्रो एजन्सीज, कंझरा, जि. अकोला

मी अकोला जिल्ह्यातील रहिवासी असून सन-१९८५ पासून आजतागयात महाबीजचे विविध पीक/वाणांचे बिजोत्पादन कार्यक्रम राबवित असून त्यामाध्यमातून महाबीजशी जोडला गेलेलो आहे. महाबीजमधील अधिकारी व कर्मचारी यांचा कामाप्रती असलेला प्रमाणिकपणा व प्रेरणा आणि महामंडळातील पारदर्शक कारभार पाहून मी १९९१ मध्ये मुर्तिजापूर येथे शिव ॲग्रो एजन्सीज या नावाने कृषि सेवा केंद्र स्थापन करुन महाबीजचा विक्रेता झालो.

सुरुवातीला माझी उलाढाल फारच कमी होती. परंतु महाबीजचा विक्रेता झाल्यानंतर माझी उलाढाल मोठ्या प्रमाणावर वाढली. कारण कृषी विद्यापिठाव्दारे विकसित करण्यात आलेले नवीन वाण महाबीजव्दारे शेतकरीबांधवांना उपलब्ध करण्यात येतात आणि त्यामुळेच शेतकरी महाबीजकडे आकर्षित होतात.

महामंडळाव्दारे गुणवत्तापूर्ण व दर्जेदार बियाणे उपलब्ध केल्या जाते. त्यामुळे सुवर्ण महोत्सवी वर्षाकडे वाटचाल करत असतांना महाबीज ने शेतकऱ्यांच्या विश्वासाची कंपनी हे ब्रीद योग्य ठरविले आहे. यासोबतच महाबीज अधिकारी/ कर्मचारी यांचे वेळोवेळी मार्गदर्शक व कामाप्रती असलेले समर्पन यामुळे मला नेहमीच बियाणे विक्रीमध्ये मदत झालेली आहे. त्यामुळेच माझी उलाढाल ५ लाखापासून आज १.५ कोटीपर्यंत पोहोचली आहे. महाबीजची सुवर्ण महोत्सवी वर्षास शुभेच्छा देतो.



## श्री. अरुण कट्टू

आनंद कृषी सेवा केंद्र, बडनेरा जि. अमरावती

महामंडळाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त या संस्थेबाबत मनोगत व्यक्त करतांना आज मला विशेष आनंद होत आहे. मी आनंद कृषी सेवा केंद्र, बडनेरामार्फत मागील ४० वर्षापासून महाबीज तसेच इतर खाजगी कंपन्यांकरिता बियाणे व्यवसाय करीत आहे. मागील ३५ वर्षांत महाबीज सोबत व्यवसाय करत असतांना बरीचशी स्थितंतरे आणि चढ-उतार अनुभवले आहेत. असे असतांनाही महाबीज सर्मथपणे महाबीज विक्रेत्यांच्या समर्थपणे पाठीशी ठामपणे उभे राहिले आहे त्यामुळे महाबीजशी व्यवसाय करतांना नेहमीच सुरक्षेची भावना राहिली आहे.

महामंडळाने शेतकरी बांधवांना केंद्रस्थानी ठेऊन विविध पिक व वाणांचे बियाणे रास्त दरात व योग्य वेळी उपलब्ध करुन दिले आहेत. यामध्ये नवीन संशोधित व अधिक उत्पादनशील वाण तसेच महाबीज उत्पादित जैविक खते आणि जैविक बुरशीनाशक ही गुणवत्तापूर्ण उत्पादने शेतकरी बांधवांना उपलब्ध होत असल्यामुळे आमच्या व्यवसायामध्ये दिवसेदिवस वाढ होत आहे. पर्यायाने महाबीज विक्रेत्यांचा व्यवसाय वृद्धींगत होण्यास मदत झाली असून त्याबाबत महाबीजचा मी मनापासून ऋणी आहे.

महाबीजची उत्तरोत्तर अशीच प्रगती व व्यवसायवृध्दी व्हावी अशी भावना महाबीजच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त व्यक्त करतो.



महाबळेश्वर येथे झालेल्या तारांकीत विक्रेता सभेत श्री. नंदकुमार देशमुख यांनी यांचा दहावा क्रमांक पटकावल्याबद्दल मा. संचालकांच्या हस्ते सत्कार.



श्री. अरुण कट्टू यांचा महाबीज विक्रेता सभेध्ये सत्कार करतांना श्री. प्रकाश ताटर, उप-महाव्यवस्थापक, विपणन, महाबीज

# महाबीज विक्रेता मनोगत



## श्री. राजेश अग्रवाल

महाराष्ट्र बीज भंडार, खामगांव जि. बुलढाणा

मी महाराष्ट्र बीज भंडार या नावाने कृषी केंद्र चालवत असून, मागील ३५ वर्षापासून महाबीजचे बियाणे विक्री व्यवसायात कार्यरत आहे. महाबीजकडून खरीप व रब्बी हंगामात शेतकऱ्यांना विविध पिकांच्या वाणांचे प्रमाणित बियाणे अनुदानित दराने उपलब्ध करून दिले जाते. त्यामुळे माझ्या कृषी केंद्राशी जिल्ह्यातील अनेक उपविक्रेते व शेतकरी जोडले गेले आहेत.महाबीजच्या बियाण्यांची गुणवत्ता उत्कृष्ट असल्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पादनात लक्षणीय वाढ झाली असून, आर्थिक प्रगतीस चालना मिळाली आहे. त्यामुळे महाबीजबाबत शेतकऱ्यांमध्ये प्रचंड विश्वास निर्माण झाला आहे. अनेक शेतकरी हे महाबीजकडे एका कुटुंबातील सदस्यासारखा विश्वास ठेवून व्यवहार करतात. शेतकरी बांधवांकडून बियाण्याच्या गुणवत्तेबद्दल नेहमीच सकारात्मक प्रतिसाद मिळतो.

महाबीजकडून दरवर्षी ९ टनांहून अधिक प्रमाणित बियाणे उपविक्रेते आणि कृषी केंद्रांमार्फत गावोगाव पोहोचवले जाते. यामुळे शेतकऱ्यांना वेळेवर व चांगल्या गुणवत्तेचे बियाणे सहज उपलब्ध होते. विशेषतः कोरडवाहू भागातील आर्थिकदृष्ट्या कमकुवत शेतकऱ्यांना महाबीजच्या योजनांचा मोठा लाभ मिळत असून, त्यामध्ये सहानुभूतीने व्यवहार केल्याने व्यवसायात वाढ झाली आहे.महाबीजकडून देयके वेळेवर आणि पारदर्शक पद्धतीने मिळतात. तसेच, माझ्या केंद्रावर जैविक खते, बुरशीनाशके यांचीही विक्री केली जाते. त्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पादनात वाढ होत असून, माझा व्यवसाय अधिक मजबुत व शाश्वत झाला आहे. महाबीजमुळे माझा व्यवसाय यशस्वी व फायदेशीर ठरला आहे.



खरीप हंगाम विक्रेता सभा २०२४ मध्ये विक्रेत्यांचा सन्मान करताना मा. व्यवस्थापकीय संचालक श्री सचिन कलंत्रे



## श्री. सतिष पाटील

कृषि पदवीधर संघ, धुळे

मी जिल्हा धुळे येथील रहिवासी असून कृषि पदवीधर संघ, धुळे येथे चेअरमन पदावर कार्यरत असून कृषि पदवीधर या नावाने आम्ही १९८५ सालापासून महाबीजचे अधिकृत विक्रेते आहोत. यापूर्वी मी साधारणत: दहा वर्ष बीज प्रमाणीकरण यंत्रणा, धुळे येथे कृषि अधिकारी म्हणून कार्यरत होतो.

त्यामुळे बियाणेच्या सर्व तांत्रिक बाबींविषयीची मला माहिती आहे. महाबीजमार्फत बीज प्रमाणीकरण यंत्रणा तसेच शासनाच्या सर्व मानकांचे पालन केले जात असून सर्व प्रकारच्या चाचण्यांमध्ये पात्र झालेले बियाणेच शेतकरी बांधवांना उपलब्ध करून दिले जाते. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये महाबीजच्या बियाण्याविषयी दृढ विश्वास आहे. याशिवाय महाबीज मार्फत मागील ३-४ वर्षांपासून शेतकरी बांधवांच्या मागणीनुसार रायझोबियम, पीएसबी, केएमबी ही द्रवरूप जैविक खते तसेच बुरशीनाशक ट्रायकोडर्मा ही गुणवत्तापूर्ण जैविक उत्पादने माफक किमतीमध्ये उपलब्ध करून दिली जात आहेत. ही उत्पादने अतिशय उपयुक्त व पर्यावरणपूरक असल्यामुळे शेतकऱ्यांच्या पसंतीस उतरली असून दरवर्षी त्यांच्या मागणीमध्ये वाढ होत आहे. याशिवाय विक्रेता म्हणून आमच्या समस्यांचे निराकरण देखील महाबीजव्दारे तात्काळ करण्यात येते. शेतकरी बांधवांच्या प्रगतीत तसेच बियाणे व्यवसायातून आमच्या आजपर्यंतच्या यशस्वी वाटचालीत महाबीजची मोलाची भूमिका राहिली आहे. महाबीजच्या या योगदानाबद्दल मन:पूर्वक आभार तसेच महाबीजच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त खूप खूप शुभेच्छा...!



महाबीज विक्रेता सभेत श्री. सतीश पाटील, धुळे यांचा सत्कार श्री. साई प्रकाश नवोद, विभागीय व्यवस्थापक, जळगांव

# महाबीज विक्रेता मनोगत



## पवन लखोटिया

पवन फर्टिलायझर्स, नवा मोंढा जि. नांदेड

ग्राहक हे दैवत असते, तो आनंदी झाला तर मला एक विक्रेता या नात्याने फार आनंद होईल. जिवनात पैसाच कमाविणे हे सर्वस्वी नसून थोडी फार समाजाची सेवा करणं हे सुध्दा आपलं कर्तव्य असतं. अशी सेवा मला प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे महाबीजमूळे घडते. मी मागिल ३५ वर्षापासून महाबीजचा विक्रेता असून माझ्या दुकानाची महाबीजचे दुकान म्हणून शेतकऱ्यांना ओळख निर्माण झालेली आहे. बियाण्यासोबतच माझेकडे महाबीज जैविक खते, बुरशीनाशके उपलब्ध असल्यामूळे ग्राहक परत जात नाही. बरेचवेळा महाबीजचे बियाणे अनुदानावर मिळत असून गुणवत्तापूर्ण, रास्त दरात व केव्हाही उपलब्ध असल्यामूळे महाबीज ब्रॅन्ड म्हणून शेतकऱ्यांचा पुर्णपणे विश्वास बसलेला आहे. महाबीजमुळे माझे व्यवसायात भरभराट झालेली असून माझी गावा-गावात ओळख निर्माण झालेली आहे. महाबीजच्या दारी, सुख समृध्दी नांदेल आपल्या घरी. खुप खुप धन्यवाद व सुवर्ण महोत्सवी वर्षाकरिता हार्दिक शुभेच्छा.

महाबीजच्या क्षेत्रीय अधिकाऱ्यांकडून प्रत्येक हंगामात गुणवत्ता तसेच विविध उत्पादनांबाबत मार्गदर्शन करण्यात येते. महाबीजचे बियाणे व्यवसायसोबतच गुणवत्तापूर्ण जैविक खते व जैविक बुरशीनाशक विक्रीस उपलब्ध होत असल्यामुळे विक्रीमध्ये तथा शेतक-यांच्या उत्पादन वाढीस फायदा झालेला आहे. महामंडळ लवकरच सुवर्ण महोत्सवी वर्षात पर्दापण करत आहेत त्यानिमित्ताने महाबीजच्या पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा.



## श्री. बद्रीनारायण अग्रवाल

गोदावरी सिड्स कंपनी, अंबड जि. जालना

मी मागील ३५ वर्षापासून महाबीजचा विक्रेता आहे. महाबीज कंपनीचे सर्व प्रकारचे बियाणे, जैविक खते तसेच हिरवळीची खते आम्ही माध्यमातून विक्री करतो. महाबीज ही एक शेतकरी वर्गाची हितचिंतक कंपनी आहे. शासनाच्या विविध योजनेंगर्तत महाबीजचे बियाणे शेतकऱ्यांना अनुदानावर वाटप करण्यात येते. महाबीज म्हणजेच गुणवत्तेचे बियाणे याची हमी शेतकऱ्यांना असल्यामुळे तसेच खाजगी कंपन्यांपेक्षा महाबीजचे बियाणे स्वस्त किंमतीत मिळत असल्यामुळे शेतकऱ्यांची पहिली पसंती महाबीजच्या बियाण्यास असते. महाबीजच्या उत्पादनांची अतिशय चांगली विक्री होत असल्यामुळे आमच्या व्यवसायात वाढ होऊन आमची प्रगती होत आहे. शेतकऱ्यांना विक्री केलेल्या महाबीज बियाणेच्या सहसा तक्रारी येत नसल्यामुळे शेतकरीदेखील समाधान व्यक्त करतात. महाबीज कंपनीचे प्रतिनिधी आम्हाला चांगल्या प्रकारे मार्गदर्शन करतात. याशिवाय महाबीजमार्फत आयोजित करण्यात येणाऱ्या विक्रेता सभेच्या माध्यमातून आमच्या अडीअडचणी सोडविल्या जातात. महाबीजचे अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनामुळे आम्हाला विक्रीसाठी चांगली मदत होते. सुरुवातीला मर्यादित असणारा आमचा बियाणे व्यवसाय आज मोठ्या प्रमाणावर विस्तारला असून या आर्थिक प्रगतीस महाबीजची महत्वपूर्ण भूमिका राहिली आहे. शेतकरी तसेच आमच्या विक्रेत्यांच्या हिताचे काम करणाऱ्या महाबीजच्या स्थापनेस ५० वर्ष पूर्ण होत असल्याचा आनंद आहे. यानिमित्ताने महाबीज परिवारास आमच्याकडून खूप खूप शुभेच्छा.



पवन फर्टिलायझर्स, यांना महाबीज बॅग्ज उपलब्ध करुन देतांना जिल्हा व्यवस्थापक, नांदेड



श्री. चेतन बद्रीनाथ अग्रवाल मे. गोदावरी सीड कंपनी अंबड महाबीज वर्धादिनाच्या कार्यक्रमामध्ये मनोगत व्यक्त करतांना

# महाबीज विक्रेता मनोगत



## श्री. गजानन कोषटवार

सुदर्शन कृषी सेवा केंद्र, आर्णी जि. यवतमाळ

"बियाणे अनेक, अस्सल मात्र एक" या ब्रीदवाक्याने ओळखली जाणारी महाबीज, शेतकऱ्यांना गुणवत्तापूर्ण बियाण्यांचा पुरवठा करणारी महाराष्ट्रातील एक सर्वोत्तम संस्था आहे. महाबीजच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त आम्हा सर्व विक्रेत्यांकडून मनःपूर्वक शुभेच्छा! माझा व्यवसाय अधिक वाढावा आणि जास्तीत जास्त शेतकरी बांधवांना सेवा देता यावी, या उद्देशाने १९८९ मध्ये मी महामंडळाचा अधिकृत विक्रेता म्हणून नोंदणी केली. महाबीज म्हणजे विश्वासाचे बियाणे, अशी ख्याती अनेक वर्षांपासून आहे आणि महाबीज तीच गुणवत्ता टिकवून दर्जेदार बियाण्यांचा पुरवठा करत आहे. महाबीजचे अधिकृत विक्रेता पद मिळाल्यानंतर, किरकोळ विक्रीतून सुरुवात करून घाऊक विक्रेता म्हणून नावारूपास येण्यासाठी मला महाबीज परिवाराची मोलाची साथ लाभली.

महाबीजमार्फत सोयाबीन, तूर, संकरित ज्वारी, हरभरा, गहू आणि भाजीपाला बियाण्यांच्या पुरवठ्यासोबतच जैविक खते व बुरशीनाशकांचा पुरवठा करणे ही उल्लेखनीय बाब आहे. त्याचप्रमाणे, महाबीजने इतर पिकांप्रमाणे संकरित कापूस बियाण्यांच्या क्षेत्रातही इतर कंपन्यांशी स्पर्धा करत अधिक उत्पादनक्षम वाणांचे बियाणे उपलब्ध करून द्यावे, अशी आमची अपेक्षा आहे. महाबीजने गेल्या ४९ वर्षांपासून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना नवनवीन आणि उच्च प्रतीच्या विविध वाणांच्या बियाण्यांचा पुरवठा करून योग्य सेवा पुरवली आहे. तसेच, आम्हां विक्रेत्यांना व्यवसायवृद्धीसाठी प्रोत्साहन दिले त्याबद्दल महाबीजचे मनःपूर्वक आभार आणि महाबीजला सुवर्ण महोत्सवी हार्दिक शुभेच्छा.



महाबळेश्वर तारांकित विक्रेता सभेत श्री. गजानन कोषटवार यांचा राज्यात दुसऱ्या क्रमांकाची विक्री केल्याबद्दल सत्कार करण्यात आला.



## श्री. आर. एस. वानखेडे

सुधीर ॲग्रो सर्व्हिस सेंटर, सिंदी (रेल्वे), जि. वर्धा


आपल्या देशात बियाणे उद्योगाची सुरुवात सहाव्या दशकात झाली. त्याचाच एक भाग म्हणून राष्ट्रीय बियाणे महामंडळाची स्थापना १९ मार्च, १९६३ रोजी झाली व त्या पाठोपाठ राष्ट्रीय बियाणे प्रकल्पा अंतर्गत महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळाची स्थापना दि. २८ एप्रिल, १९७६ रोजी झाली. आपले महामंडळाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे हे बाब खरोखरच अति आनंददायी आहे.

मी १९७० चा कृषी पदवीधर असून १९७५ मध्ये सिंदी (रेल्वे) येथे सुधिर ॲग्रो सर्व्हिस सेंटर सुरू केले. मी महाबीजसोबत ४९ वर्षे सलोख्याने व्यवहार केला आणि आजही २०२४ मध्ये करत आहे. या ५० वर्षात महाबीज या संस्थेशी व्यवसाय करून मी माझ्या कुटुंबासाठी एक स्थिर अर्थव्यवस्था उभी करुन व त्यातून माझ्या मुला-मुलींच्या शिक्षणावर विशेष लक्ष देऊन त्यांना उच्चशिक्षीत केले यामध्ये महाबीजचा मोलावा वाटा असल्याचे मला अभिमानाने सांगावेशे वाटते. महाबीजशी असलेल्या सलोख्याच्या आणि सहानुभूतीच्या संबंधामुळे मला प्रेरणा मिळाल्यामुळे मी महाबीजला माझे कुटुंब मानतो. महाबीज उत्पादनांची माहिती जास्तीत जास्त शेतकऱ्यांना होण्यासाठी महाबीज अतिशय चांगले उपक्रम राबविते जसे की शेतकरी तसेच विक्रेता सभा, माहिती पत्रके, महाबीज वार्ता त्रैमासिक अंक, डायरी, कॅलेंडर, या सारख्या माध्यमातून महाबीज जास्तीत जास्त शेतकऱ्यांपर्यंत पोहचले आहे. महाबीजची पुढील वाटचाल भरभराटीची आणि समृद्धीची होवो, याबद्दल मी शुभेच्छा व्यक्त करतो.



खरीप हंगाम विक्रेता सभा २०२४ नागपूर, महाबीज विक्रेत्यांचा सत्कार करताना मा. व्यवस्थापकीय संचालक महाबीज व इतर

# महाबीज विक्रेता मनोगत



## श्री. नंदलाल मुंदडा

मामा कृषी सेवा केंद्र, सेनगांव ता. जि. हिंगोली

मी १९८२ पासून महाबीजचा अधिकृत विक्रेता म्हणून कार्यरत आहे. गेल्या चार दशकांपासून मी बियाणे विक्री व्यवसायात कार्यरत असून, माझ्या एकूण विक्रीपैकी ५५ टक्के वाटा महाबीज बियाण्यांचा आहे. महाबीजचे बियाणे वेळेवर आणि पुरेशा प्रमाणात उपलब्ध होत असल्यामुळे माझा एकही ग्राहक निराश होऊन परत जात नाही. त्यामुळे ग्राहकांचा माझ्यावर आणि महाबीजवर विश्वास अधिक बळकट झाला आहे. महाबीजकडून सोयाबीन, तूर, उडीद, ज्वारी, हरभरा व गहू या पिकांचे जुने व नविन वाण सातत्याने उपलब्ध करून दिले जातात.

शासकीय संस्था असूनही महाबीज वेळोवेळी प्रात्यक्षिके, शेतकरी मेळावे व गाव पातळीवरील सभा आयोजित करते. यामुळे बियाण्यांविषयी जागरूकता वाढते व प्रचार-प्रसार प्रभावीपणे होतो. याचा थेट फायदा विक्रेत्यांना आणि शेतकऱ्यांना होतो.महाबीजच्या बियाण्यांचे दर शेतकऱ्यांच्या आवाक्यात असून गुणवत्ता उत्तम आहे. त्यामुळे शेतकरी समाधानाने महाबीजची बियाणे विकत घेतात. याच विश्वासामुळे महाबीजने शेतकऱ्यांच्या मनात आपली वेगळी ओळख निर्माण केली असून ती केवळ एक संस्था न राहता, शेतकऱ्यांची स्वतःची कंपनी बनली आहे.

महाबीजच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा! महाबीजची अशीच यशस्वी वाटचाल पुढेही सुरू राहो, आणि संस्था नव्या उंचीवर पोहोचो, हीच मन:पूर्वक सदिच्छा!



## श्री. प्रदिप इन्नानी

मे. इन्नाणी कृषी केंद्र, वाशिम

मी, मे. इन्नाणी कृषी केंद्र, १९९९ सालापासून वाशिम जिल्ह्यात बी-बियाणे विक्री व्यवसाय करत आहे. गेली दोन दशके आमच्या कृषी सेवा केंद्रामार्फत महाबीजसह विविध नामांकित खाजगी कंपन्यांचे बी-बियाणे, जैविक व रासायनिक खते तसेच विविध कृषी निविष्ठांची विक्री केली जात आहे.

शेतकऱ्यांपर्यंत दर्जेदार उत्पादने पोहोचवण्याचा आमचा नेहमीच प्रयत्न राहिला आहे. माझ्या मते, शेतकऱ्यांना उच्चतम दर्जाचे बी-बियाणे वाजवी दरात उपलब्ध होणे हा त्यांचा हक्क आहे. महाबीज ही शासकीय कंपनी असून ती गुणवत्ता मानकांचे काटेकोर पालन करत विविध हंगामांमध्ये – खरीप, रब्बी व उन्हाळी विविध पिकांचे बियाणे वेळेवर व रास्त दरात उपलब्ध करून देते.

महाबीजकडील बी-बियाणे उत्तम उगमशक्तीचे व उत्पादनक्षम असल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये याला मोठी मागणी आहे.महाबीजद्वारे उत्पादित जैविक खते, सूक्ष्म अन्नद्रव्ये व जैविक बुरशीनाशके देखील अत्यंत दर्जेदार असून, या उत्पादनांची विक्री दिवसेंदिवस वाढत आहे. महामंडळामार्फत शेतकऱ्यांना मिळणारी उत्पादने विश्वासार्ह, गुणवत्तापूर्ण व परवडणाऱ्या दरात असल्यामुळे शेतकरी वर्गाची मागणी वाढत आहे, आणि त्याचा सकारात्मक परिणाम आमच्या व्यवसाय व आर्थिक उलाढालीवरही होत आहे.महाबीजच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त मनःपूर्वक शुभेच्छा! भविष्यातही महाबीजची अशीच यशस्वी वाटचाल सुरू राहो व शेतकऱ्यांचा विश्वास अधिक दृढ होवो, हीच सदिच्छा!




महाबीज पीक प्रात्यक्षिक कार्यक्रमामध्ये मामा कृषी सेवा केंद्राचे संचालक श्री. नंदलाल भुतडा व इतरांचा उत्स्फूर्त सहभाग



इन्नानी कृषी सेवा केंद्राचे संचालक श्री. प्रदीप इन्नानी यांचा सत्कार करतांना जिल्हा व्यवस्थापक महाबीज, वाशिम व इतर न्यवर

# महाबीज विक्रेता मनोगत




## श्री. रामेश्वर शेंडगे
प्रसाद कृषि सेवा केंद्र, धाराशिव


मी मागील १३ वर्षापासून महाबीजचा अधिकृत विक्रेता आहे. या काळात महाबीज माझ्यासाठी केवळ एक बियाणे पुरवठादार नव्हता, तर तो एक विश्वासार्ह व प्रेरणादायक भागीदार ठरला आहे.

महाबीजच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाचा साक्षीदार होण्याचा मला अतिशय आनंद व अभिमान आहे. व्यवसाय सुरू करताना शेतकऱ्यांमध्ये महाबीजबद्दल असलेला विश्वास मी स्वतः अनुभवला. "महाबीजचं बियाणं म्हणजे गुणवत्ता आणि खात्री" ही भावना त्यावेळी होती आणि आजही तितक्याच दृढतेने टिकून आहे. शेतकऱ्यांच्या याच विश्वासामुळे माझ्यासारख्या अनेक कृषी सेवा विक्रेत्यांना आपला व्यवसाय सशक्तपणे उभारता आला.

महाबीजने केवळ बियाण्यांचे उत्पादनच नव्हे, तर तंत्रज्ञान, संशोधन आणि नवकल्पनांमधून शेतकऱ्यांपर्यंत आधुनिक कृषी साधनं पोहोचवण्याचे कार्य केले आहे.

गुणवत्तापूर्ण जैविक खते, बुरशीनाशके, ऊती संवर्धित रोपे यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ झाली आहे. आम्हा विक्रेत्यांना वेळोवेळी मिळालेले प्रशिक्षण व मार्गदर्शन हे देखील आमच्या सेवा दर्जात सातत्य राखण्यास उपयुक्त ठरले आहे. आज महाबीज ५० वर्षांचा यशस्वी प्रवास पूर्ण करत आहे, हे केवळ संस्थेचं नव्हे, तर महाराष्ट्रातील शेतकरी बांधवांचं आणि आमच्यासारख्या विक्रेत्यांचंही यश आहे. "शेतकरी प्रथम" हा दृष्टिकोन टिकवून ठेवणाऱ्या महाबीजला पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा!



खरीप हंगाम विक्रेता सभेत श्री. रामेश्वर शेंडगे यांचा सत्कार करतांना श्री. डी. डी. कान्हेड विभागीय व्यवस्थापक, परभणी




## श्री. अनुप गुप्ता
वरुण सिड्स ॲण्ड फर्टिलायझर्स, सेलु, जि. परभणी


मी गेली अनेक वर्षे महाबीजचा अधिकृत विक्रेता आहे. आमच्या सेवा केंद्रामार्फत महाबीजचे सोयाबीन, तूर, मूग, उडीद, गहू, हरभरा, ज्वारी व करडई या पिकांचे विविध वाणांचे गुणवत्तापूर्ण बियाणे शेतकरी बांधवांना शासकीय योजनेअंतर्गत व सर्वसामान्य विक्रीद्वारे पुरवले जाते.

महाबीजने गेल्या काही वर्षात शेतकऱ्यांसाठी जैविक खते व ट्रायकोडर्मा उपलब्ध करून दिले असून त्यांची गुणवत्ता उत्तम असल्यामुळे या उत्पादनांना शेतकऱ्यांकडून मोठी मागणी आहे. "महाबीज म्हणजे गुणवत्तेची हमी" हे समीकरण शेतकऱ्यांच्या मनात दृढ झाले आहे. त्यामुळेच ते नेहमी महाबीजची बियाणे व जैविक उत्पादने प्राधान्याने मागवतात.

महाबीज ही शासकीय संस्था असल्यामुळे ती वाजवी दरात आणि मोठ्या प्रमाणावर बियाणे उपलब्ध करून देते. त्यामुळे बाजारात खाजगी कंपन्यांच्या मनमानी दरांवर मर्यादा येते आणि शेतकऱ्यांना एक विश्वासार्ह व किफायती पर्याय उपलब्ध होतो. ही बाब कृषी क्षेत्रासाठी अत्यंत सकारात्मक ठरते. माझ्या कृषी सेवा केंद्राच्या वाढीत महाबीजचा सिंहाचा वाटा आहे.

त्यांच्या गुणवत्तापूर्ण उत्पादनांमुळे आणि वेळोवेळी मिळालेल्या मार्गदर्शनामुळे मी शेतकऱ्यांचा विश्वास संपादन करू शकलो. यामुळे माझा व्यवसायही यशस्वीपणे विकसित झाला. महाराष्ट्राच्या कृषी विकासात मोलाचा वाटा उचलणाऱ्या महाबीजला सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या मनःपूर्वक शुभेच्छा! "उत्तम बियाणे, समृद्ध शेत" हे ध्येय आम्हा विक्रेत्यांनाही सदैव प्रेरणा देत राहो, हीच अपेक्षा.



आगामी खरीप हंगाम-२०२५ संदर्भात विक्रेता श्री. अनुप गुप्ता यांचेशी चर्चा करतांना जिल्हा व्यवस्थापक, महाबीज, परभणी

# महाबीज विक्रेता मनोगत



## श्री. श्याम राठोड

महाराष्ट्र ॲग्रो एजन्सी, अहिल्यानगर

मी मागील ४० वर्षांपासून महाबीजचा अधिकृत विक्रेता आहे. या दीर्घ कालावधीत महाबीजसोबत काम करताना मला नेहमीच अभिमान वाटला आहे. महाबीज ही संस्था केवळ बियाणे पुरवणारी कंपनी नसून, शेतकरी वर्गाची खरी हितचिंतक संस्था आहे. खाजगी कंपन्यांच्या बियाण्यांच्या दरावर वचक राहावा, यासाठी महाबीज नेहमीच कार्यरत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना उच्च प्रतीचे व गुणवत्तापूर्ण बियाणे रास्त दरात उपलब्ध होण्यास मदत होते. महाबीजच्या बियाण्यांवर शेतकऱ्यांचा मोठा विश्वास आहे. त्यामुळे दरवर्षी या बियाण्यांची मागणी झपाट्याने वाढताना दिसते. ही बाब केवळ महाबीजसाठीच नव्हे, तर आम्हा विक्रेत्यांसाठीही अभिमानास्पद आहे. महाबीजकडून राबविण्यात येणाऱ्या विविध अनुदान योजनांमुळे अल्पभूधारक शेतकरी आणि बागायतदार शेतकरी यांना देखील बियाणे परवडणाऱ्या दरात उपलब्ध होते, हे विशेष उल्लेखनीय आहे. महाबीज फक्त बियाण्यांपुरतेच सीमित राहिलेले नाही, तर त्यांनी हिरवळीचे खते, ट्रायकोडर्मा बुरशीनाशक, केएमबी, पीएसबी इत्यादी जैविक खतांचे उत्पादन आणि प्रसारदेखील मोठ्या प्रमाणावर केला आहे. या सर्व उत्पादनांना शेतकऱ्यांकडून चांगला प्रतिसाद मिळत असून त्यांच्या शेतीच्या उत्पादनात व दर्जात वाढ होत आहे. या दर्जेदार उत्पादनांमुळे शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यास मदत होत आहे. एक महाबीज विक्रेता म्हणून मला नेहमीच अभिमान वाटतो की, मी अशा संस्थेशी जोडलेलो आहे जी शेतकऱ्यांच्या हितासाठी सातत्याने कार्यरत आहे. महाबीजचे मी मनःपूर्वक आभार मानतो.



## सौ. गायत्री गाढवे

बसवेश्वर कृषी सेवा केंद्र, सोलापूर

शेतकऱ्यांच्या हिताची नाळ जोडलेली, शेतकऱ्यांच्या प्रत्येक घरापर्यंत पोहोचलेली, विश्वासाचे प्रतीक असलेल्या महाबीज कंपनीला माझा मनापासून नमस्कार. मी सौ. गायत्री विठ्ठल गाढवे, प्रोप्रा. बसवेश्वर कृषी केंद्र, सोलापूर. माझ्या कृषी सेवा केंद्राला यंदा २० वर्षे पूर्ण होत आहेत. या दोन दशकांच्या वाटचालीत महाबीज ही माझ्यासाठी केवळ एक बियाणे कंपनी नव्हे, तर एक विश्वासू भागीदार ठरली आहे.

माझ्या दुकानाच्या पहिल्याच दिवशी जेव्हा शेतकऱ्यांनी महाबीजचे बियाणे मागितले, तेव्हाच मी समजले की या संस्थेवर शेतकऱ्यांचा किती प्रचंड विश्वास आहे. खरीप, रब्बी आणि उन्हाळी अशा सर्व हंगामांत मी सोयाबीन, बाजरी, तुर, उडीद, कांदा, करडई, ज्वारी, हरभरा आणि गहू या पिकांचे महाबीजचे गुणवत्तापूर्ण बियाणे विक्रीस ठेवले आहे. शेतकऱ्यांची मागणी आणि समाधान लक्षात घेता ही सेवा मी पुढेही अखंडपणे सुरू ठेवणार आहे.

महाबीजच्या गुणवत्तेच्या बियाण्यांमुळे माझ्या दुकानातील विश्वासार्हता वाढली असून, महाराष्ट्र, कर्नाटक व लगतच्या जिल्ह्यांमधील शेतकऱ्यांमध्ये "शेती म्हणजे बियाणे आणि बियाणे म्हणजे महाबीज" हे ब्रीदवाक्य खऱ्या अर्थाने रुजले आहे. महाबीजने माझ्या कृषी सेवा केंद्राला आणि मला शेती सेवा करण्याची जी संधी दिली त्याबद्दल मी मनःपूर्वक आभार मानते. भविष्यातही महाबीजसोबत हे नाते अधिक दृढ व्हावे, हीच अपेक्षा.



अहिल्यानगर येथे महाबीज विक्रेता सभेत श्री. श्याम राठोड यांचा भाजीपाला बियाणे विक्रीबद्दल सत्कार करतांना उप-महाव्यवस्थापक (विपणन)



बसवेश्वर कृषी सेवा केंद्राचे संचालक यांचा विक्रेता सभा खरीप हंगाम २०२४ मध्ये श्री. प्रकाश टाटर उप-महाव्यवस्थापक (विपणन) सत्कार करतांना

# महाबीज विक्रेता मनोगत



## श्री. बाळासाहेब लाकाळ पाटील

तिरुपती कृषी सेवा केंद्र, लातूर

मी बाळासाहेब लाकाळ पाटील, तिरुपती कृषी सेवा केंद्र, लातूर या नावाने सन १९८४ पासून केवळ महाबीज बियाण्याची विक्री करत आहे. महाबीजच्या अर्धशतकपूर्ती निमित्त मला माझे मनोगत व्यक्त करण्याची संधी दिल्याबद्दल महाबीज व्यवस्थापनाचे व लातूर येथील जिल्हा व्यवस्थापक यांचे मनःपूर्वक आभार.माझ्या कृषी सेवा केंद्राची सुरुवात खरीप १९८४ पासून झाली. सुरुवातीला कोणतीही एजन्सी नसतानाही मी महाबीजकडून बियाणे घेत शेतकऱ्यांना पुरवत होतो. सातत्यपूर्ण सेवा व शेतकऱ्यांशी सुसंवाद यामुळे मला १९८४ मध्ये अधिकृत महाबीज विक्रेत्याचे मानांकन मिळाले. त्या दिवसापासून आजपर्यंत मी इतर कोणत्याही कंपनीचे बियाणे विकले नाही ही गोष्ट मला अभिमानाने सांगावीशी वाटते. महाबीजच्या सर्व योजनांमध्ये मी सक्रीय सहभाग घेत असून, उच्च दर्जाचे वाण मोठ्या प्रमाणावर वितरीत करतो. माझ्या माध्यमातून जिल्ह्यातील सुमारे १२० ते १५० उपविक्रेते कार्यरत आहेत.

शेतकऱ्यांचा विश्वास कायम राखण्यासाठी मी महाबीजच्या अधिकाऱ्यांशी सातत्याने समन्वय ठेवतो. महाबीजच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचे, विशेषतः श्री. अनुपकुमार साहेब, श्री. विनोद काळबांडे साहेब व श्री. शहाणे साहेब यांचे वेळोवेळी मिळालेल्या सहकार्याबद्दल मी ऋणी आहे. भविष्यातही महाबीजच्या यशस्वी वाटचालीसाठी मी कटिबद्ध राहून महाबीजला सुवर्ण महोत्सवी वर्षानिमीत्त मंगलमयी शुभेच्छा !



## श्री. नेमलाल बोढाळे

कृषी सेवा केंद्र, काटोल जि. नागपूर

सन १९७२ मध्ये "कृषी सेवा केंद्र, काटोल" या नावाने मी माझा कृषी व्यवसाय सुरू केला. त्याकाळी शासनाने कृषी पदवीधरांसाठी एक विशेष योजना राबवली होती, ज्याअंतर्गत कृषी केंद्र स्थापन करून शेतकऱ्यांपर्यंत आधुनिक कृषी तंत्रज्ञान पोहोचविण्याचा उद्देश होता. या योजनेअंतर्गत माझ्या दुकानाची स्थापना झाली आणि आजही मी या व्यवसायात सक्रिय आहे.मागील १५ वर्षांपासून मी महाबीजचा अधिकृत वितरक म्हणून कार्यरत आहे. या कालावधीत महाबीजने बियाणे क्षेत्रात केलेली प्रगती आणि संशोधनकार्य खरोखर वाखाणण्याजोगे आहे.

महाबीज आणि कृषी विद्यापीठांनी शेतकऱ्यांच्या गरजा ओळखून, वेळोवेळी नवनवीन आणि दर्जेदार वाणांची निर्मिती केली असून, हे वाण शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्याचे महत्त्वाचे काम मी करत आलो आहे.महाबीजचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे शेतकऱ्यांच्या हितासाठी कार्य करण्याची त्यांची तळमळ. बियाण्यांच्या किंमती शक्य तितक्या वाजवी ठेवून, उच्च गुणवत्तेचे वाण शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्याचा महाबीजचा प्रयत्न कौतुकास्पद आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचा विश्वास महाबीजवर सदैव राहिलेला आहे.

महाबीज ही संस्था केवळ एक बियाणे उत्पादक संस्था नसून ती शेतकऱ्यांच्या समृद्धीची आधारस्तंभ आहे. यापुढेही महाबीजची वाटचाल यशस्वी, भरभराटीची आणि कृषी क्षेत्राला दिशा देणारी ठरो, हीच माझी मनःपूर्वक शुभेच्छा !



श्री. प्रशांत पागृत, महाव्यवस्थापक (प्र. व अ.), महाबीज यांची तिरूपती कृषी सेवा केंद्र, लातूर येथे सदिच्छा भेट



श्री. बोढाळे यांचा महाबीज विक्रेता सभेमध्ये सत्कार करतांना श्री. प्रकाश ताटर, उप-महाव्यवस्थापक (विपणन),

# महाबीज ऊती संवर्धित

# केळी ग्रँडनैन



- महाबीज – महाराष्ट्र शासनाचा अंगीकृत उपक्रम
- केंद्र शासनाच्या DSIR विभागाची मान्यता
- NCS-TCP प्रमाणित विषाणु विरहीत गुणवत्तापूर्ण रोपे
- Virus Indexing व Genetic Fidelity चाचणीमध्ये पात्र रोपे
- एकाचवेळी काढणीस सारख्या आकाराची फळे
- पॉलिथीन पिशवीत गाळाच्या मातीमध्ये सुयोग्य वाढ झालेली रोपे
- वाजवी दर तसेच विक्रीपश्चात तांत्रिक मार्गदर्शन







DSIR RECOGNIZED

NCS-TCP

Department of Biotechnology (DBT)
Ministry of Science & Technology
Government of India



श्री. पंजाबरावजी बोचे
मु.पो. पणज, ता. अकोट, जि. अकोला
मो. 9763608181


महाबीज®

## महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित

## महाबीज जैव तंत्रज्ञान केंद्र, तेलंखेडी, नागपूर

+918669642748 mbc@mahabeej.com

# बिजोत्पादकांचे मनोगत



## श्री. अनिल पाटील

मु. पो. जवळगाव, ता. नेर, जि. यवतमाळ

नमस्कार! मी, १९८५ पासून शेती व्यवसाय करीत असून मी गेल्या ३५ वर्षांपासून महाबीजचा नियमित बिजोत्पादक असून आम्ही वडीलांपासून बिजोत्पादन कार्यक्रम घेतो. माझे क्षेत्रावर मी दरवर्षी सोयाबीन, तूर व ज्यूट या पिकांचा बिजोत्पादन कार्यक्रम घेत असतो. मागिल दोन वर्षांपासून महाबीज ऊती संवर्धित केळी ग्रँड नैन व संकरित पपई रेड लेडी (तैवान-७८६) ची लागवड करीत आहे. या दोन्ही रोपांची गुणवत्ता अतिशय चांगली असून फळांचा आकार एकसारखा तसेच फळ जास्त वजनाचे, निरोगी असल्यामुळे त्यांचे लागवडीपासून मला चांगला नफा मिळत आहे. यापूर्वी आम्ही पेरणीपूर्वी बीज प्रक्रिया करीत नव्हतो. परंतु महाबीज मार्फत बिज प्रक्रिया करण्याकरिता शेतकरी बांधवांना प्रोत्साहित करण्यात येत असून याअंतर्गत मी महाबीजव्दारे उत्पादित जैविक खते तसेच जैविक बुरशीनाशक ट्रायकोडर्मा यांची पेरणीपूर्वी बिज प्रक्रिया करीत असल्यामुळे बियाणेची उगवण चांगली होऊन पिकांची वाढ अधिक जोमाने होते. पर्यायाने उत्पादनात सुद्धा वाढ झाली आहे.

खरीप तसेच रब्बी हंगामात लागवड करण्यात येणाऱ्या पिकांचे लागवडीबाबत महाबीजमार्फत वेळोवेळी तांत्रिक मार्गदर्शन करण्यात येते त्यामुळे महामंडळाविषयी शेतकरी बांधवांचा विश्वास अधिक दृढ होत आहे. महाबीजच्या स्थापनेस ५० वर्ष पूर्ण होत असून याकरिता महामंडळास हार्दिक शुभेच्छा तसेच पुढील वाटचालीस मन:पूर्वक शुभेच्छा...!



## श्री. मदन व्यवहारे

मु. पो. वरुड तोफा, ता. रिसोड, जि. वाशिम

मी मागील वीस वर्षांपासून नियमितपणे महाबीजच्या बिजोत्पादन कार्यक्रमामध्ये सहभागी होत आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून मला केवळ दर्जेदार बियाणेच नव्हे तर उत्पन्नवाढीचा आत्मविश्वासही मिळाला आहे.

गुणवत्तापूर्ण बियाण्यांचा पुरवठा, बीज प्रक्रियेसाठी प्रोत्साहन, वेळोवेळी तांत्रिक मार्गदर्शन, नविन तंत्रज्ञानाचा वापर व बाजारभावापेक्षा जास्त दर मिळाल्यामुळे महाबीजचा कार्यक्रम अत्यंत फायदेशीर ठरतो. त्यामुळे उत्पादनात सातत्याने वाढ होत असून आर्थिकदृष्ट्या मी स्थिर झालो आहे.

खरीप २०२४ हंगामात मी ३० एकर क्षेत्रावर फुले दुर्वा या सोयाबीन वाणाचा बिजोत्पादन कार्यक्रम राबवला. महाबीजच्या अधिकाऱ्यांनी मार्गदर्शन केल्यानुसार मी पारंपरिक पद्धतीऐवजी "बेडवर टोकण" ही सुधारित पद्धत स्वीकारली. एकरी १५ ते १६ किलो बियाणे वापरून पेरणी केली. पेरणीपूर्वी महाबीजच्या जैविक खतांनी बियाण्याची प्रक्रिया केली. यामुळे उगवण आणि वाढ अतिशय चांगली झाली.या बिजोत्पादनातून मला एकरी १२ क्विंटल या प्रमाणे एकूण ३६० क्विंटलचे उत्पन्न मिळाले.

फुले दुर्वा वाण इतर वाणांच्या तुलनेत अधिक उत्पादनक्षम व हवामानसापेक्ष ठरले आहे. त्यामुळे इतर शेतकरी बांधवांनी देखील या वाणाची निवड करावी, असा माझा अनुभवावर आधारित सल्ला आहे.महाबीजच्या माध्यमातून शेतकऱ्यांपर्यंत आधुनिक तंत्रज्ञान व दर्जेदार बियाणे पोहोचत असून त्यामुळेच आम्हाला चांगले उत्पन्न मिळते. महाबीजची अशीच प्रगती व्हावी, हीच शुभेच्छा!



गहू पीडीकेव्ही सरदार या वाणाच्या बीजोत्पादन प्रक्षेत्रास मा. योगेश कुंभेजकार, व्यवस्थापकीय संचालक महाबीज यांची भेट



श्री. मदन व्यवहारे यांच्या शेतावरील गहू - फुले समाधान बीजोत्पादन क्षेत्राची तपासणी करतांना महाबीजचे अधिकारी

# बिजोत्पादकांचे मनोगत



## श्री. हर्षल पाटील

रा. चहार्डी ता. चोपडा जि. जळगाव

मी चोपडा येथील रहिवासी आहे. मी गेल्या १५ वर्षांपासून महाबीजचा नियमित बिजोत्पादक आहे आणि यापूर्वी माझे वडीलही बिजोत्पादन कार्यक्रमात सहभागी होत होते.

महाबीजमार्फत बिजोत्पादन कार्यक्रमाकरिता अतिशय दर्जेदार व उत्तम प्रतीचे बियाणे प्राप्त होत असल्यामुळे आमच्या उत्पन्नावरही त्याचा अतिशय सकारात्मक परिणाम झालेला आहे.

शुद्ध बियाण्यांबरोबरच महाबीजची जैविक उत्पादने, जसे की ट्रायकोडर्मा, पीएसबी, केएमबी आणि महाजैविक, ही उत्पादने सुद्धा अतिशय उपयुक्त आहेत आणि त्यांचा पिकांवरील परिणामही चांगला आहे. त्यामुळे उत्पन्न वाढीबरोबरच जमिनीचा पोतही सुधारला आहे.

बिजोत्पादन कार्यक्रमाच्या माध्यमातून मी महाबीजशी जोडलो गेलो आहे आणि या कार्यक्रमांतर्गत पिकांना चांगला भावसुद्धा मिळतो. याशिवाय बाजारभावातील फरकाची रक्कम, अनुदानाची रक्कम आणि बोनस यांसारख्या बाबींमुळे शेतकऱ्यांना चांगल्या उत्पन्नाची हमी मिळते आणि त्यामुळे आमची आर्थिक परिस्थितीदेखील सुधारली आहे.

त्यामुळे सर्व शेतकरी बांधवांना मी व्यक्तिशः विनंती करतो की, पेरणीकरिता महाबीजचे बियाणे तसेच महाबीजची जैविक उत्पादने वापरावी, जेणेकरून आपण पारंपरिकतेकडून आधुनिकतेकडे वळू आणि आपला आर्थिक दर्जाही नक्कीच सुधारेल.



## श्री. संजय दुतोंडे

रा. उसरण ता. मेहकर जि. बुलढाणा

मी रब्बी हंगाम २०२३-२४ मध्ये कांदा पिकाचा एक एकर क्षेत्रावर बिजोत्पादन कार्यक्रम घेतला होता. कांदा लागवड केल्यानंतर ४५ दिवसांनी मी कांदा पिकास महाबीजचे महाजैविक हे जैविक खत ठिबक सिंचनाच्या माध्यमातून प्रति एकर २ लिटरप्रमाणे वापर केल्याने मला कांदा पिक जोमाने वाढताना दिसत होते. तसेच कांदा पिकाची पात हिरवीगार व फुटव्यांची संख्या सुध्दा अधिक दिसली. त्यामुळे पिक पक्वतेच्या अवस्थेत येइपर्यंत मी महाजैविक हे प्रत्येकी १५ दिवसाच्या अंतराने कांदा पिकास दिले. त्यामुळे मला एकरी ४.५० क्विं. बियाण्याचे उत्पादन प्राप्त झाले.

मागील तीन वर्षांपासुन मी महाबीजचे जैविक खत व जैविक बुरशीनाशक वापरत असल्यामुळे या जैविक उत्पादनांचा माझे उत्पादन वाढीकरिता चांगला फायदा झाला. शिवाय दरवर्षी होणाऱ्या रासायनिक खताची बचतही झाली. या उत्पादनांवर माझा विश्वास असल्यामुळे मी महाबीजची महाजैविक व ट्रायकोडर्मा ही उत्पादने प्रत्येक पिकासाठी वापरत आहे.

महाबीजचे महाजैविक हे खत जमिनिस पोषक असून मातीवर कोणताही दुष्परिनाम होत नाही व रासायनिक खतावर होणाऱ्या खर्चात बचत तर होतेच पण त्याशिवाय उत्पादनात सुध्दा चांगली वाढ होते. त्यामुळे मी सर्व शेतकरी बांधवांना महाजैविक व ट्रायकोडर्मा ही जैविक उत्पादने वापरण्याकरिता आवाहन करतो व महाबीच्या सुचर्ण वर्षानिमित्त शुभेच्छा देतो.




पैलपाडा येथे आयोजित शिवारफेरी दरम्यान जळगांव विभागातील शेतकरी बांधव सोयाबीन पिकाविषयी माहिती जाणून घेतांना



श्री. संजय दुतोंडे यांच्या पीबीएनएस-१२ करडई क्षेत्राची तपासणी करतांना जिल्हा व्यवस्थापक, बुलढाणा व इतर

# बिजोत्पादकांचे मनोगत



## श्री. गजानन वैद्य

रा. धानोरा वैद्य ता. मुर्तिजापूर जि. अकोला

मी अकोला जिल्ह्यातील रहिवाशी असून व्यवसायाने शेतकरी आहे. गेल्या ३० वर्षांपासून मी महाबीजद्वारे आयोजित करण्यात येणाऱ्या विविध पिकांच्या वाणांचे पायाभूत दर्जाचे बिजोत्पादन कार्यक्रम यशस्वीरित्या राबवित आहे. या कार्यक्रमातून मला नेहमीच समाधानकारक उत्पन्न मिळाले असून त्यामुळे मी अत्यंत समाधानी आहे. बियाणे प्रक्रियेपासून ते पीक काढणीनंतरच्या टप्प्यापर्यंत महाबीजच्या अधिकाऱ्यांकडून वेळोवेळी मिळणाऱ्या तांत्रिक मार्गदर्शनामुळे हे यश शक्य झाले.

महाबीज उत्पादित जैविक खतांचा जसे की पीएसबी, रायझोबियम, अॅझोटोबॅक्टर, केएमबी तसेच जैविक बुरशीनाशक ट्रायकोडर्मा यांचा वापर केल्याने माझ्या उत्पादनात सुमारे १५ टक्क्यांनी वाढ झाली आहे. आजपर्यंत मी खरीप हंगामात नर-मादी कापूस, सोयाबीन, ज्युट व तूर आणि रब्बी हंगामात हरभरा, गहू व करडई यांसारख्या पिकांचे बिजोत्पादन घेतले आहे. या सर्व पिकांमधून मला बाजारभावापेक्षा सरासरी २५ ते ३५ टक्के जास्त दर मिळाल्यामुळे माझ्या उत्पन्नात मोठी वाढ झाली.

मागील ५० वर्षांपासून महाबीज संस्था राज्यातील शेतकऱ्यांचा कणा बनून उभी आहे. दर्जेदार बियाण्यांचा पुरवठा, नावीन्यपूर्ण तंत्रज्ञान व सातत्यपूर्ण मार्गदर्शनामुळे अनेक शेतकऱ्यांच्या जीवनात आमूलाग्र सकारात्मक बदल झाला आहे. या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त महाबीज परिवारास मनःपूर्वक शुभेच्छा देतो आणि त्यांच्या पुढील वाटचालीस भरभरून यश लाभो, हीच प्रार्थना!



रब्बी विक्रेता सभेमध्ये श्री. गजानन वैद्य यांचा सत्कार करतांना
मा. व्यवस्थापकीय संचालक श्री. योगेश कुंभेजकर



## श्री. सर्जेराव पाटील

मु. पो. किसरुळ ता. पन्हाळा जि. कोल्हापूर

कोल्हापूर जिल्हा हा महाराष्ट्रातील सुजलाम-सुफलाम, संपन्न आणि प्रगतशील जिल्हा म्हणून प्रसिद्ध आहे. या जिल्ह्याच्या कृषी विकासामध्ये राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे योगदान अत्यंत मोलाचे राहिले आहे. त्यांनी शेतकऱ्यांच्या हितासाठी अनेक समाजहितैषी सुधारणा राबवून शेतीला विकासाचा नवा आयाम दिला. या समृद्ध परंपरेला पुढे नेत महाबीज संस्था देखील गेली अनेक दशके शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी अविरत कार्यरत आहे.महाबीजने भात या जिल्ह्यातील प्रमुख पिकाच्या विविध वाणांचे बिजोत्पादन सुरू करून शेतकऱ्यांना बाजारभावापेक्षा दीड ते दोनपट दर देण्याचे महत्त्वाचे कार्य केले आहे. त्यामुळे या भागातील शेतकऱ्यांना चांगले आर्थिक उत्पन्न मिळू लागले आहे. महाबीजने केवळ पारंपरिक पिकांपुरतेच कार्य मर्यादित न ठेवता, सन २०२३ या तृणधान्य वर्षानिमित्त कृषी आयुक्तालयाच्या सहकार्याने नाचणी व वरी या कोरडवाहू भागात घेता येणाऱ्या पोषणमूल्यांनी भरपूर पिकांचे बिजोत्पादन कार्यक्रम राबवले. यामुळे अल्पभूधारक शेतकऱ्यांनाही नवे उत्पादनक्षेत्र उपलब्ध झाले.

महाबीजच्या या उपक्रमांमुळे अनेक शेतकरी आर्थिकदृष्ट्या सक्षम झाले आहेत. त्यांनी महाबीजच्या दर्जेदार बियाण्यांवर व मार्गदर्शनावर विश्वास ठेवला असून, तो विश्वास महाबीजने नाविन्यपूर्ण उपक्रमांद्वारे कायम राखला आहे. दर्जा, पारदर्शक व्यवहार आणि वेळेवर सेवा हे महाबीजच्या यशाचे खरे गमक आहे.आज या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त, मी महाबीजच्या प्रदीर्घ आणि समर्पित कार्याची साक्ष देतो आणि त्यांच्या भावी वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा देतो.



श्री. सर्जेराव पाटील यांच्या नाचणी व वरी प्रक्षेत्रावर
मा. राहुल रेखावार, व्यवस्थापकीय संचालक यांची भेट

# बिजोत्पादकांचे मनोगत



## श्री. किशोर काकडे

रा. वाघलगाव ता. फुलंब्री, जि. छ. संभाजीनगर

शेतकऱ्यांना पेरणीकरिता चांगले बियाणे मिळावे तसेच त्यांच्या मालास चांगला बाजारभाव मिळावा ही सामान्य शेतकऱ्यांची अपेक्षा असते. महाबीजव्दारे कायमच शेतकऱ्यांना चांगल्या प्रतीचे बियाणे खाजगी कंपन्यांच्या तुलनेत कमी किंमतीत उपलब्ध करुन दिल्या जाते. महाबीजच्या बियाण्याबद्दल शेतकऱ्यांमध्ये विश्वास असल्यामुळेच खात्रीशिर उत्पादनाकरिता महाबीजच्या बियाण्यास आमची पसंती असते.

मी २०१७ पासून पेरणीकरिता महामंडळाच्या बियाण्यांचा वापर करीत आहे. २०१७ मध्ये मी महाबीजच्या जॅकी-९२१८ या हरभरा वाणाची ३ एकर क्षेत्रावर लागवड केली होती. त्यावर्षी दुष्काळाची परिस्थिती असताना देखील मला एकरी १२ क्विंटल याप्रमाणे ३ एकर क्षेत्रामधून ३६ क्विंटल एवढे विक्रमी उत्पादन मिळाले आणि माझ्या गावात सर्वाधिक उत्पादन घेणारा मी अव्वल ठरलो होतो. महाबीजच्या गुणवत्तापूर्ण बियाण्यामुळेच विपरीत परिस्थती असताना देखील मला अतिशय चांगले उत्पादन मिळाले.

या वर्षी मी आले पिकांसाठी महाबीजचे जैविक ट्रायकोडर्मा बुरशीनाशक, पीएसबी (PSB), केएमबी (KMB),अॅझोटोबॅक्टर यांचा वापर केला असून त्याचे परिणम देखील अतिशय चांगले मिळाले आहेत. यामुळे रासायनिक खतांच्या खरेदीवरच्या खर्चात मोठी बचत झाली आहे. महाबीज गुणवत्तापूर्ण बियाणे आणि जैविक खतांमुळे आमच्या शेतकऱ्यांच्या उत्पादनात वाढ झाली आहे मी त्याबद्दल महाबीजचे आभार व्यक्त करतो.



## श्री. प्रकाश कुकडकर

रा. खुशिपार ता. जि. भंडारा

सुरुवातीला माझे वडील श्री. महादेवराव कुकडकर हे बिजोत्पादन कार्यक्रमात सक्रिय होते. त्यांचे नंतर ही परंपरा कायम ठेवत जवळपास इ.स. १९९५ पासून मी स्वतः विविध मुलभूत व पायाभूत पिक/वाणांचा बिजोत्पादन कार्यक्रम घेत आहे.

महाबीजमुळेच मला चांगली शेती करण्याची प्रेरणा मिळाली. महाबीजच्या बिजोत्पादन कार्यक्रमामुळे मला भरघोस उत्पन्न मिळते आणि बाजाराभावापेक्षा २० टक्के जास्त दर मिळत असल्याने आर्थिक लाभ होतो. यामुळे माझ्या जीवनाची गुणवत्ता सुधारली आहे. जिल्ह्यात एक उत्कृष्ट शेतकरी म्हणून मला पुरस्कार देखील मिळाला आहे. बिजोत्पादन कार्यक्रमातून प्राप्त बियाणे बीज प्रक्रिया केंद्रावर वेळेत पोहच केल्यानंतर त्वरीत शोधन होत असल्यामुळे आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत नाही. बिजोत्पादन कार्यक्रमामधून उत्पादित शुद्ध बियाणे महामंडळास देत असल्यामुळे बाजारात चांगल्या प्रतीचे बियाणे शेतकऱ्यांकरिता उपलब्ध करुन देण्याचे समाधान प्राप्त होत आहे. महाबीज या संस्थेतील अधिकारी व कर्मचारी वर्ग यांचे नेहमीच शेतकरी बांधवांना योग्य मार्गदर्शन, कर्तव्यदक्षता व पारदर्शकर्ता यामुळे शेतकरीबांधवांचा महाबीज वरील विश्वास अबाधित आहे. मी महाबीजसोबत ५० वर्षापासून जोडलेला असून महाबीजमधील अधिकारी आणि कर्मचारी चांगला प्रतिसाद देतात आणि कोणत्याही प्रकारचे राजकारण न होता पारदर्शकता दिसून येते. महाबीजच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा!



श्री. किशोर काकडे यांच्या अद्रक प्लॉटला भेट देताना जगदीश जी. खोकड विभागीय व्यवस्थापक महाबीज जालना



जिल्हा कार्यालय, महाबीज, भंडारा द्वारे एमटीयु-११५३ भात वाणाचे आयोजीत पिकप्रात्यक्षिक कार्यक्रमस उपस्थित मान्यवर

# बिजोत्पादकांचे मनोगत



## श्री. संदीप परगणे

सवंसर, ता. कोपरगाव जि. अहिल्यानगर

मी गेल्या १५ वर्षांपासून महाबीजचा नियमितपणे बिजोत्पादन कार्यक्रम घेत आहे. बिजोत्पादनाव्यतिरिक्त, मी कांदा, हरभरा आणि गहू या पिकांचे बियाणे पेरणीसाठी घेत असतो. सध्या सर्वत्र बोगस आणि निकृष्ट दर्जाचे बियाणे शेतकऱ्यांच्या माथी मारून त्यांचे नुकसान केले जात आहे. परंतु अशा परिस्थितीतही महाबीजने आपली विश्वासार्हता जपली आहे. महाबीजमार्फत शेतकरी बांधवांना गुणवत्तापूर्ण आणि दर्जेदार बियाणे उपलब्ध करून दिले जात असल्यामुळे महाबीजबद्दल शेतकऱ्यांना आपुलकी आहे. मी दरवर्षी खरीप व रब्बी हंगामात महाबीजचा बिजोत्पादन कार्यक्रम घेतो आणि त्याकरिता महाबीजद्वारे सोयाबीन, गहू, हरभरा व तूर पिकांच्या नवीन वाणांचे चांगले बियाणे उपलब्ध करून दिले जाते. बिजोत्पादन कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी महाबीजच्या अधिकाऱ्यांमार्फत वेळोवेळी प्लॉटची पाहणी करून मार्गदर्शन केले जाते. मुख्य म्हणजे, बाजारभावापेक्षा किमान २५ टक्के अधिक दर मिळत असल्यामुळे बिजोत्पादन कार्यक्रम आर्थिक दृष्ट्या अतिशय फायदेशीर ठरत आहे. कृषी सेवा केंद्रामधून देखील परमिटवर बियाणे वेळोवेळी उपलब्ध होते. महाबीजमार्फत सध्या जे जैविक उत्पादने शेतकऱ्यांना उपलब्ध करून दिली जात आहेत, ती देखील दर्जेदार व किफायतशीर आहेत. मी सदर उत्पादने शेतीमध्ये वापरत असून उत्पादनात वाढ होण्यासाठी या जैविक उत्पादनांचा अत्यंत फायदा झाला आहे. महाबीज आहे म्हणूनच महाराष्ट्रातील शेतकरी टिकून आहे. याकरिता महाबीजचे खूप खूप धन्यवाद व पुढील वाटचालीस शुभेच्छा!



## श्री. लक्ष्मीकांत पाटील

रा. कवठा ता. औसा जि. लातूर

मी गेल्या ३० वर्षांपासून महाबीजचा विश्वासू बीजोत्पादक म्हणून कार्यरत आहे. महाबीजने मला दर्जेदार पायाभूत व प्रमाणित बीजोत्पादन कार्यक्रमात सहभागी होण्याची संधी दिल्यामुळे प्रत्येक हंगामात मला चांगला आर्थिक लाभ मिळतो आहे. महाबीजचे आर्थिक व्यवहार अत्यंत पारदर्शक आणि प्रामाणिक असल्यामुळे आजपर्यंत कोणतीही अडचण निर्माण झालेली नाही.

महाबीजचे सर्व कर्मचारी, शेतकरी व बीजोत्पादकांशी सन्मानपूर्वक व आदराने वागत असतात आणि वेळोवेळी योग्य मार्गदर्शनही देतात. बीजप्रक्रियेपासून ते पिक हाती येईपर्यंत महाबीजमार्फत जैविक खते व बुरशीनाशकांचा वापर केल्यामुळे माझ्या उत्पादनात १५ ते २० टक्क्यांनी लक्षणीय वाढ झाली आहे.

प्रत्येक खरीप व रब्बी हंगामात महाबीजमार्फत आयोजित केल्या जाणाऱ्या शिवारफेरीतून नव्या वाणांची माहिती, तांत्रिक मार्गदर्शन व अनुभवसिद्ध ज्ञान मिळते. यामुळे माझ्या जमिनीच्या पोतानुसार योग्य वाणांची निवड करता आली आणि त्यामुळे उत्पादनक्षमता वाढली.

एकूणच महाबीजमुळे माझ्या आर्थिक प्रगतीला गती मिळाली असून, त्यामुळे मला मानसिक समाधानही लाभले आहे. शेतकऱ्यांसाठी शेतकऱ्यांनी स्थापन केलेली अशी महाबीज संस्था शेतकऱ्यांचे सर्वांगीण हित जोपासत आहे. महाबीजच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त मन:पूर्वक शुभेच्छा! महाबीजची अशीच यशस्वी वाटचाल सुरू राहो, हीच सदिच्छा.



ग्राम बीजोत्पादन कार्यक्रम अंतर्गत शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रमात श्री. संदीप परगणे यांचा सत्कार करतांना



जिल्हा कार्यालय, महाबीज लातूर द्वारे करडई परभणी - ८६ पिक प्रात्यक्षिकाचा कार्यक्रम लक्ष्मीकांत पाटील यांच्या शेतावर आयोजित

# बिजोत्पादकांचे मनोगत



## श्री. राजेंद्र खिर्डीकर

रा. खिर्डी ता. खुलताबाद जि. छ. संभाजीनगर

मी गेली २० वर्षे महाबीजच्या बियाण्याचे उत्पादन कार्यक्रमात सहभागी आहे. या कार्यक्रमाची माहिती मला आमच्या तत्कालीन कृषी अधिकाऱ्यांमार्फत मिळाली आणि त्यानंतर मी महाबीज कार्यालयाशी संपर्क साधून बियाण्याचे उत्पादन घेण्यास सुरुवात केली.

या कार्यक्रमातून मला चांगला अनुभव आणि आर्थिक फायदा झाला. मी हा अनुभव माझ्या गावातील इतर शेतकरी बांधवांसोबत शेअर केला. त्यांनीही माझं म्हणणं मान्य करत बियाण्याचे उत्पादन घ्यायला सुरुवात केली. आज माझ्या गावातील सुमारे ७० टक्के शेतकरी महाबीजच्या बियाणे उत्पादन कार्यक्रमात सहभागी आहेत, ही अत्यंत समाधानाची बाब आहे. महाबीजचे अधिकारी व कर्मचारी शेतकऱ्यांशी प्रेमळ व सहकार्याची वागणूक ठेवतात, त्यामुळे आमचा या संस्थेवर विश्वास दृढ आहे. महाबीजचा सेवा भाव आणि शेतकऱ्यांप्रती असलेली बांधिलकी यामुळे आम्ही गेली दोन दशके या कार्यक्रमात सातत्याने सहभागी आहोत. बियाणे उत्पादन कार्यक्रमामुळे आमच्या शेतमालाला बाजारात विशेष ओळख मिळाली. हमीभाव मिळाल्यामुळे बाजारातील चढ-उतारांपासून संरक्षण मिळाले. या माध्यमातून मला आणि माझ्या गावाला आर्थिक स्थैर्य व प्रगतीचा मार्ग मिळाला. महाबीजच्या या सहकार्याबद्दल मी मनःपूर्वक आभारी आहे. माझ्या आर्थिक प्रगतीमध्ये महाबीजचा मोलाचा वाटा आहे आणि यासाठी मी महाबीजचे मनःपूर्वक आभार मानतो. भविष्यातही हे नाते असेच दृढ राहो, हीच माझी अपेक्षा आहे.



श्री. राजेंद्र खेडेकर सोयाबीन फुले दूर्वा
पीक परिस्थिती बाबत समाधान व्यक्त करताना



## श्री. विनोद महाकाळकर

केळझर ता. सेलू जि. वर्धा

मी २० वर्षांपासून महाबीजचा बिजोत्पादक शेतकरी आहे. शेती ही आमची जीवनशैली आहे. पेरणीपासून कापणीपर्यंत आमचा प्रत्येक श्वास मातीशी जोडलेला असतो. चांगले उत्पादन घेण्यासाठी चांगल्या बियाण्याची गरज असते, आणि यासाठी महाबीज ही आमची पहिली पसंती आहे.

महाबीज ही केवळ बियाण्याची कंपनी नाही, तर आमच्या मेहनतीवरचा विश्वास आहे. त्यांच्या बियाण्यांमध्ये उगवणशक्ती, रोगप्रतिकारशक्ती आणि दर्जा उत्कृष्ट असल्यामुळे आमचं पीक बहरतं. मी माझ्या शेतात महाबीजची सोयाबीन, चना, गहू, तुर यासारखी बियाणं वापरत असून प्रत्येक वेळी चांगलं उत्पादन मिळालं आहे.

महाबीज बियाण्यांबाबत आर्थिक व्यवहारही पारदर्शक आणि वेळेवर असतात. बियाणे जमा केल्यानंतर ७० टक्के रक्कम मिळते, तर उर्वरित रक्कम ग्रेडिंगनंतर मिळते. याशिवाय महाबीज मार्केट भावापेक्षा २०% जास्त दर देते आणि गरजेच्या वेळी बोनसही देते, त्यामुळे आर्थिक अडचणी दूर होतात.


पूर्वी आम्ही रासायनिक खतांवर अवलंबून होतो, पण आता महाबीजकडून मिळालेल्या जैवखतांचा वापर करून शेतीमध्ये नवे परिवर्तन घडवून आणले आहे. मातीची सुधारलेली गुणवत्ता आणि वाढलेलं उत्पादन यामुळे आमचा आत्मविश्वास वाढला आहे.

महाबीजचे अधिकारी वेळोवेळी भेटी देऊन मार्गदर्शन करतात, संवाद साधतात, ही गोष्ट अत्यंत महत्त्वाची आहे."बियाणे असेल दर्जेदार, तर पिक येईल जोमदार!"जय महाबीज!



मा. श्री. योगेश कुंभेजकर व्यवस्थापकीय संचालक महाबीज
यांची श्री विनोद महाकाळकर यांच्या प्रक्षेत्रात भेट

# शेतकऱ्यांचे मनोगत



## श्री. प्रल्हाद धांडे

रा. सागवन ता.जि. बुलढाणा

मी मागील ३०-३५ वर्षांपासून महाबीजच्या विविध पिकांच्या वाणांचे बिजोत्पादन कार्यक्रम घेत आहे. या कार्यक्रमामुळे मला महाबीजकडून दोन टप्प्यांमध्ये पैसे मिळत असल्यामुळे वर्षभराचे आर्थिक नियोजन सुकर झाले आहे.

यामुळे माझ्या कुटुंबाचा आर्थिक स्तर उंचावला असून, मुला-मुलींच्या उच्च शिक्षणासाठी मदत झाली आहे.महाबीजच्या बिजोत्पादन कार्यक्रमामुळे आम्हाला विद्यापीठाने विकसित केलेल्या नव्या वाणांचे बियाणे मिळतात, ज्यामुळे उत्पादनात मोठी वाढ होते. शिवाय, महाबीजकडून स्त्रोत बियाण्यांसोबत मिळणारी गुणवत्तापूर्ण जैविक खते आणि बुरशीनाशके यामुळे आमच्या शेतात बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव कमी होतो आणि उगवणशक्ती चांगली राहते.याशिवाय, महाबीजकडून मिळणारे बियाणे १००% अनुवांशिक शुद्धतेचे असल्यामुळे उत्पादनात सातत्याने वाढ होत आहे. विद्यापीठ व बीज प्रमाणीकरण यंत्रणेचे शास्त्रज्ञ व अधिकारी शेतावर नियमित भेट देतात आणि त्यांच्याकडून मिळणारे तांत्रिक मार्गदर्शन खूप उपयुक्त ठरते.महाबीजकडून मिळणारे अनुदान थोडा उशीराने मिळते, पण त्याच्या मोठ्या रकमा वेळेवर मिळाल्याने आमचं संपूर्ण आर्थिक चित्रच बदलले आहे.

कुटुंबातले कार्यक्रम देखील चांगल्या प्रकारे पार पाडता आले.महाबीजची ही योजना माझ्यासाठी आर्थिक संजीवनी ठरली आहे. भविष्यातही माझ्यासोबत महाबीजची प्रगती होवो, हीच माझी सदिच्छा.



श्री.प्रल्हाद धांडे यांच्या गहू-लोकवन वानाच्या उत्कृष्ट बीजोत्पादनासाठी तपासणी वेळी सत्कार करण्यात आला



## सौ. सुनिता नाईकनवरे

रा. हिंगलजवाडी ता. जि. धाराशिव


नमस्कार शेतकरी बांधवांनो !मी दरवर्षी महाबीजच्या नवनवीन वाणांची लागवड करतो आणि त्या वाणांच्या उत्पादन व गुणधर्माबाबत अनुभव घेतो. मागील रब्बी हंगामात पिक फेरपालट करण्याच्या हेतूने करडई एसएसएफ-७०८ या वाणाची लागवड दिड एकर क्षेत्रावर केली. या वाणाच्या लागवडीपासून ते पिक कापणीपर्यंत महाबीज धाराशिव येथील क्षेत्र अधिकारी यांनी वेळोवेळी भेट देऊन ओलीताचे नियोजन, पिक व्यवस्थापन आणि पिकाचे संरक्षण याबाबत सखोल मार्गदर्शन केले. यामुळे, या केवळ दिड एकर क्षेत्रात १३.५० क्विंटल उत्पादन मिळाले, जे माझ्या दृष्टीने अत्यंत समाधानकारक आणि लाभदायक ठरले.महाबीजच्या गुणवत्तापूर्ण बियाण्यामुळे माझ्यासह अनेक शेतकरी बांधवांच्या आर्थिक परिस्थितीमध्ये मोठ्या प्रमाणात सुधारणा झाली आहे.

महाबीजच्या बियाण्यांची गुणवत्ता आणि शेतकऱ्यांना दिलेले मार्गदर्शन यामुळे शेतकरी अधिक उत्पादन घेत आहेत आणि त्यांची आर्थिक स्थिती अधिक स्थिर होऊ लागली आहे. महाबीजने आपले उत्पादन अधिक उत्कृष्ट बनवले असून, त्याचा लाभ अनेक शेतकऱ्यांना होत आहे.महाबीजच्या गुणवत्तापूर्ण बियाणे निर्माण करण्याच्या सामाजिक हेतूसाठी माझ्या हार्दिक शुभेच्छा आहेत. तसेच, महाबीजच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त महाबीज परिवारास मन:पूर्वक शुभेच्छा!महाबीजच्या भविष्याला वेलकम आणि उज्वल भविष्याची शुभेच्छा!



सौ सुनिता नाईकनवरे यांच्या प्रक्षेत्रावर आयोजीत करडई-एस एस एफ-७०८ वाणाचा पीक प्रात्यक्षिक आयोजन करण्यात आला

# शेतकऱ्यांचे मनोगत



## श्री. पिराजी मोरे

रा. देवगाव खवणे, ता. मंठा जि. जालना

महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ, अर्थात महाबीज ही संस्था शेतकरी हितासाठी सतत कार्य करणारी संस्था असल्यामुळे या संस्थेबद्दल शेतकऱ्यांच्या मनात आपुलकी आहे, जी कुठल्याही अन्य संस्थेबद्दल नाही. मी महाबीजचा नियमित बिजोत्पादक असून मागिल ३० वर्षांपासून महाबीजच्या बिजोत्पादन कार्यक्रमामध्ये नियमितपणे सहभाग घेत आहे.

राज्यातील शेतकऱ्यांसाठी महाबीज ही अत्यंत महत्वाची संस्था आहे कारण विविध पिकांचे बियाणे खाजगी कंपन्यांच्या तुलनेत कमी दरात महाबीज उपलब्ध करते याशिवाय पिकांच्या बाजारभावातील अनिश्चिततेपासून शेतकऱ्यांचे संरक्षण होते. बिजोत्पादन कार्यक्रमा अंतर्गत बाजारभावापेक्षा किमान 20% अधिक दर महाबीजव्दारे देण्यात येतो. याशिवाय लाभांश, शासकिय अनुदान, बोनस या बाबींमुळे शेतकऱ्यांना आर्थिक फायदा होत आहे. याशिवाय महाबीजने स्वस्त दरात बाजारात नव्याने उपलब्ध केलेले जैविक खते व बुरशीनाशके यांच्या वापराचा बिजप्रक्रियेकरिता तसेच पिकांची वाढ व त्यांची उत्पादकता वाढविण्यास मदत होते आहे. यामुळे आमचा रासायनिक खतांवर होणाऱ्या अनावश्यक खर्चात बचत होते आहे.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे महाबीज सेवाभाव या भावनेने शेतकऱ्यांसाठी कार्य करीत असल्यामुळे शेतकऱ्यांना या संस्थेबद्दल जिव्हाळा आहे. त्यामुळेच महाबीजचा बिजोत्पादक असल्याचा मला अभिमान आहे. महाबीजला सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्ताने माझ्याकडून हार्दिक शुभेच्छा.



## श्री. शामकांत पाटील

रा. गोवर्धन, ता. अंमळनेर जि. जळगांव

महामंडळाच्या स्थापनेपासून ते आजपर्यंत आम्ही पेरणीकरिता महाबीजचे बियाणेच वापरतो. आमचे कुटुंब तीन पिढ्यांपासून महाबीजशी जोडले गेले आहोत. आज बियाणे व्यवसायामध्ये मोठ्या प्रमाणावर खाजगी कंपन्या उतरल्या आहेत. परंतु या कंपन्यांच्या तुलनेत महाबीजने स्वत:ची विश्वासार्हता जपली असून महाबीज म्हणचे खात्रीचं बियाणं अशी आमच्या शेतकऱ्यांची भावना आहे. याशिवाय आम्ही पेरणीकरिता महाबीजच्या नवीन वाणांची लागवड देखील करत असून त्यापासून आम्हाला चांगले उत्पादन मिळत आहे. 'शुद्ध बीजापोटी फळे रसाळ गोमटी'. या उक्तीप्रमाणे महाबीजचे बियाणे दर्जेदार असल्यामुळे त्यापासून मिळणारे उत्पादनदेखील गुणवत्तापूर्ण असते. पर्यायाने उत्पादित बियाण्यास तुलनेने चांगला बाजारभाव मिळत असल्याने आर्थिक प्रगतीस हातभार लागत आहे. याशिवाय आम्ही बीज प्रक्रियेकरिता महाबीजची जैविक खते तसेच ट्रायकोडर्मा यांचा नियमित वापर करीत आहोत. यामुळे उगवणशक्ती खूप चांगल्या प्रमाणात होऊन पीकाची वाढ जोमाने होते. गेल्या दोन वर्षापासून आम्ही हरभरा या पिकात महाबीजच्या ट्रायकोडर्मा या जैविक बुरशीनाशकाचा उपयोग करत असून त्यामुळे हरभरा हे पीक मर रोगाला बळी पडले नाही. त्यामुळे उत्पादनदेखील अतिशय चांगले येत आहे. रास्त किंमत, गुणवत्तेची हमी आणि हमखास उत्पादन या प्रमुख बाबींमुळे आम्ही महाबीजच्या सेवेबद्दल अतिशय समाधानी आहोत. या वर्षी महाबीजला ५० वर्षे पूर्ण होत असल्याचा आनंद होत असून त्याबद्दल महाबीजला मन:पूर्वक शुभेच्छा!



श्री. मोरे यांच्या जीडब्ल्यू - ४९६ बिजोत्पादन प्रक्षेत्राची तपासणी करतांना श्री. दीपक यादव, कृषी क्षेत्र अधिकारी



श्री विवेक ठाकरे, महाव्यवस्थापक (उत्पादन) यांची जळगाव येथील शेतकऱ्यांच्या बीजोत्पादन कार्यक्रमास भेट

# शेतकऱ्यांचे मनोगत



## श्री. श्रीकांत कुलकर्णी

रा. हिंगणी ता. जि. बीड

मी मागील पाच वर्षांपासून महाबीजच्या पायाभूत व प्रमाणित बियाण्यांच्या बिजोत्पादन कार्यक्रमात सहभागी आहे. खरीप २०२० पासून मी महाबीज बीड कार्यालयाशी संपर्क साधून सोयाबीन, तूर, उडीद, हरभरा, गहू, ज्वारी आणि राजमा या पिकांचे बिजोत्पादन माझ्या शेतावर सुरू केले.

सुरुवातीला कृषी क्षेत्र अधिकाऱ्यांकडून संपूर्ण माहिती मिळाल्यानंतर हा निर्णय घेतला.

बिजोत्पादन कार्यक्रमात सहभागी होण्यापूर्वी मी बाजारातील विविध खाजगी कंपन्यांची बियाणे वापरत होतो. मात्र त्यात अनेकदा भेसळ, कमी दर्जा आणि वाणातील एकसंधता नसल्यामुळे अपेक्षित उत्पादन मिळत नव्हते. महाबीजकडून मात्र केवळ संशोधन संस्थांनी शिफारस केलेल्या वाणांचेच बियाणे दिले जाते, त्यामुळे दर्जा आणि विश्वास कायम राहतो.

बिजोत्पादन साखळीत सहभागी झाल्यामुळे महाबीज माझ्या उत्पादनास सरासरी बाजारभावाच्या तुलनेत २५% अधिक दर देते. त्यामुळे उत्पादन खर्च सहज निघतो आणि माझ्या कुटुंबाचे आर्थिक स्थैर्य वाढले आहे. महाबीजच्या जैविक खतांचा – ट्रायकोडर्मा, केएमबी, पीएसबी नियमित वापर केल्यामुळे उत्पादनात २५–३०% वाढ झाली. तूर, हरभरा आणि भाजीपाला पिकांवर जमिनीतून पसरणाऱ्या रोगांवरही नियंत्रण मिळाले म्हणूनच मी अभिमानाने म्हणतो की महाबीज ही केवळ संस्था नसून शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी कार्य करणारा एक विश्वासू आधार आहे. महाबीज सुवर्ण महोत्सवी वर्षानिमीत्त हार्दिक शुभेच्छा!



श्री. योगेश कुंभेजकर, व्यवस्थापकीय संचालक, महाबीज यांच्या बीड भेटी दरम्यान स्वागत करतांना श्री. श्रीकांत कुळकर्णी



## श्री. संजय लव्हाळे

मु. पो. शिराळा ता. जि. अमरावती

नमस्कार शेतकरी बांधवांनो!खरीप-२०२४ हंगामात मी माझ्या शेतावर महाबीज संशोधित, अधिक उत्पादनक्षम संकरित कपाशी वाण – महाबीज-१२४ बीजी-२ याची पेरणी दिनांक २५ जून २०२४ रोजी एक एकर क्षेत्रावर केली. पेरणीपूर्वी बियाण्यावर महाबीज उत्पादित महाजैविक जैविक खत आणि ट्रायकोडर्मा या जैविक बुरशीनाशकाची बीजप्रक्रिया केली. यामुळे बियाण्याची उगमशक्ती चांगली झाली आणि पिकाची वाढ सशक्त व जोमदार झाली. या वाणाचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे बोंडांतील अंतर कमी असताना बोंडांची संख्या इतर वाणांपेक्षा जास्त आहे. याशिवाय, हा वाण कीड व रोगांना तुलनेने कमी बळी पडतो, ज्यामुळे फवारणीसाठी लागणाऱ्या खर्चात लक्षणीय बचत झाली. पेरणी केल्यानंतर अवघ्या १५० दिवसांत कापसाचे पीक परिपक्व होऊन काढणीसाठी तयार झाले.या एका एकर क्षेत्रामधून मला १२.९० क्विं. इतके भरघोस उत्पन्न मिळाले. हे पाहून मी या वाणाच्या कार्यक्षमतेबाबत अत्यंत समाधानी आहे. कमी कालावधीत पीक निघाल्यामुळे त्याच क्षेत्रामध्ये हरभऱ्याची पेरणी लवकर करू शकलो, ज्यामुळे हंगाम वाया न जाता माझ्या आर्थिक सुबत्तेतही वाढ झाली.या वाणाबाबत माझे ठाम मत आहे – "सबसे खास महाबीज कपास". त्यामुळे सर्व शेतकरी बांधवांनी या वाणाची आपल्या शेतात मोठ्या प्रमाणात पेरणी करावी. हे वाण तुमच्या शेतातही चांगले परिणाम देईल आणि तुम्हाला उच्चतम उत्पादन मिळवता येईल.महाबीजच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त महाबीज परिवारास हार्दिक व मंगलमय शुभेच्छा!




महाबीज संशोधीत संकरीत कपाशी महाबीज - १२४ बीजी-२, पाहणी करतांना मा. व्यवस्थापकीय संचालक व इतर

# ऋ । ण । नि । र्दे । श

सुवर्ण महोत्सवी विशेषांक साकार करताना आम्हाला अनेक मान्यवर व्यक्तींचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. महाबीजचे आदरणीय अध्यक्ष तथा सन्माननीय संचालक मंडळ ज्यांनी आपल्या दूरदृष्टीने व प्रेरणादायी नेतृत्वाने आम्हाला सदैव दिशा दिली, त्यांचे मनःपूर्वक आभार. महाबीजचे माजी मा. अध्यक्ष तथा मा. व्यवस्थापकीय संचालक यांनी आपल्या शुभेच्छा देऊन या अंकाची गरीमा वाढविली त्याबद्दल त्यांचे आभार तसेच मा. व्यवस्थापकीय संचालक यांच्या सक्रिय सहभागाने आणि योग्य मार्गदर्शनाने आम्हाला सुवर्ण महोत्सवी विशेषांक अधिक समृद्ध व अभिजात होऊ शकला. त्याबद्दल त्यांचे विशेष आभार.

महाबीजचे सर्व भागधारक, बीजोत्पादक व शेतकरी बंधू-भगिनी, ज्यांनी महाबीजच्या सुवर्णमयी वाटचालीत अतूट विश्वास ठेऊन भक्कम पाठींबा दिला त्यांच्याप्रती आम्ही कृतज्ञता व्यक्त करतो. विक्रेता मंडळींनीही महाबीजच्या बीजांची गुणवत्ता व विश्वासार्हता प्रत्येक शेतकऱ्यापर्यंत पोहोचवण्याचे कार्य उत्तम प्रकारे पार पाडले आहे, याबद्दल त्यांचेही मनःपूर्वक आभार. श्री. मनोज देशमुख, म्हैसांग ता. जि. अकोला, श्री. रामभाऊ खानापुरे, बोरगांव (मंजू ) ता.जि. अकोला, कु. कविता देवळे, कृ. क्षे. अ. यांचे विशेष आभार ज्यांनी स्वानुभवातून महाबीज उत्पादनांचा प्रचार व प्रसारात संक्रीय सहभाग घेतला.

महाबीजचे अधिकारी व कर्मचारीवृंद, ज्यांनी आपल्या कार्यकुशलतेने, निष्ठेने व चिकाटीने संस्थेचा पाया भक्कम केला आहे, त्यांचे विशेष कौतुक. विशेषांकाच्या निर्मितीमध्ये संपादकीय मंडळाने घेतलेले परिश्रम व दाखवलेली गुणवत्ता यामुळेच हा अंक दर्जेदार स्वरूपात साकारता आला आहे. सर्वांच्या सामूहिक प्रयत्नांमुळेच महाबीजचा सुवर्णमहोत्सवी अंक साकार करता आला. आम्ही या सर्वांचे मनःपूर्वक ऋणी आहोत व भविष्यकाळातही अशाच सहकार्याची अपेक्षा बाळगतो.


महाबीज संशोधीत भाजीपाला बियाणं
भरघोस उत्पादनाची हमी, नाही सत्वाची कमी
संकरीत शिरी दोडका
ऐश्वर्या
संकरित चोपडा दोडका
दिव्यांका
संकरीत वांगे
यशवंत
संकरित दुधी भोपळा
ईश्वर
संकरीत वांगे
जयंत
चवळी
पार्वती
संकरित भेंडी
तन्वी
गवार
गौरी
महाबीज®
महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित
महाबीज भवन, कृषी नगर, अकोला - ४४४१०४
माहितीस्तव
स्कॅन करा


महाबीज उत्पादीत दर्जेदार
जैविक उत्पादने
ट्रायकोडर्मा विरिडी
महाजैविक
जैविक खते महाजैविक व पीके
जैविक बुरशीनाशक ट्रायकोडर्मा
महाबीज®
महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित
महाबीज भवन, कृषी नगर, अकोला - ४४४१०४
माहितीस्तव
स्कॅन करा